





# મૉડર્ન

## महाविद्यालय





## ૧૯૮૭-૮૮



**प्रा. मधुकर तोडरमल**
कलामंडळ पारितोषिक वितरण करीत असताना

**श्री. पु. स. पाळंदे**
शैक्षणिक पारितोषिके देत असताना



**जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने पुण्यस्मरण**

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक

आणि

मॉडर्न हायस्कूलचे पहिले मुख्याध्यापक

(१९३४-१९४७)



# कै. श्री. शंकरराव कानिटकर



# अभिनंदन

आमचे माजी प्राचार्य
**प्रा. डॉ. शं. ना. नवलगुंदकर**
यांची पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू
म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन

**हार्दिक स्वागत**
**प्रा. प. स. चिरपुटकर**
यांची प्राचार्यपदी नियुक्ती





**प्रा. एम. आर. मराठे**
उपप्राचार्यपदी नियुक्ती



**प्रा. मुकुंद महाजन**
पुणे विद्यापीठात प्रौढ निरंतर
शिक्षण विभागाचे
संचालक म्हणून नियुक्ती



**प्रा. प्रमोद पारखी**
कॉसमॉस बँकेच्या कार्याध्यक्षपदी
तिसऱ्यांदा निवड



डॉ. सौ. प्रमिला मल्ल्या
पीएच्. डी. पदवी प्राप्त



श्री. किरण शं. लागू
( मास्टर इन फिजिकल एज्युकेशन )



दुःखद निधन
डॉ. भीमराव कुलकर्णी



दुःखद निधन
कै. बाळ गोविंद चिनकटे (सेवक)

## कनिष्ठ महाविद्यालय आंतर शालेय व आंतर विभागीय बॅडमिंटन स्पर्धा विजेता संघ (१९८७–८८)



बसलेले डावीकडून उजवीकडे

**श्री. नितीन गांधी :**

**श्री. जगदीप यारगोप**

उभे डावीकडून उजवीकडे

**श्री. हेमंत देसाई :**

**अभिजीत कुलकर्णी**



जागतिक अजिंक्यपद बुद्धिबळ स्पर्धा

१६ वर्षाखालील

भारतातील ३ रा अग्रमानांकित

११ वी सी

**जयंत गोखले**



**वरिष्ठ महाविद्यालय**
आंतर महाविद्यालयीन बास्केट बॉल विजयी संघ

आंतर महाविद्यालयीन बॉल बॅडमिंटन उपविजेता संघ
**वरिष्ठ महाविद्यालय**





**राष्ट्रीय सेवा योजना**

**कनिष्ठ महाविद्यालय**

आंतर राज्य व्हॉलीबॉल स्पर्धा उपविजेता संघ





कला मंडळ

क्रीडा संघटना





वादविवाद मंडळ

कला मंडळ
विविध स्पर्धातील
विजेते स्पर्धक





**सुरेश गायकवाड**
द्वि. व. कला
आय्. सी. एस्. आर्.
व्हॉलिबॉल भारतीय विद्यापीठ स्तरावर निवड
पश्चिम विभाग युवक संघात निवड
राष्ट्रीय खेळाडू



**मेधा फडके**
तृ. व. वाणिज्य
आय्. सी. एस्. आर्.



**सुनील सांडभोर**
द्वि. व. वाणिज्य
विद्यापीठ विद्यार्थी प्रतिनिधी
यू. आर.



**मकरंद टिल्लू**
द्वि. व. वाणिज्य
१९८७–८८ सर्वोत्तम विद्यार्थी



**अतुल कुलकर्णी**
तृ. व. वाणिज्य
आंतर विद्यापीठ बुद्धिबळ



**धनश्री पोळ**
प्र. व. वाणिज्य
राष्ट्रीय खेळाडू – खो खो



**राजेंद्र कदम**
एम्. कॉम्.
विद्यापीठ व्हॉलीबॉल संघाचा कप्तान
आणि भारतीय सराव शिबिरासाठी निवड



**विनिता अवसरीकर**
एम्. कॉम्.
आणि बॉलबॅडमिंटन–विद्यापीठस्तर



**सुधीर पालांडे**
प्र. व. कला
राष्ट्रीय आणि विद्यापीठ खेळाडू-व्हॉलीबॉल



**स्वाती भोसले**
द्वि. व. वाणिज्य
राष्ट्रीय खेळाडू–खो खो



**गायत्री भोपटकर**
प्र. व. वाणिज्य
विद्यापीठ खेळाडू–कबड्डी



**कैलास बागल**
प्र. व. वाणिज्य
२०० कि. मी. ३ रा
१० हजार मी. २ रा
१५ हजार मी. ३ रा



**राजाराम खेडेकर**
एम्. कॉम्.–पार्ट–१
आंतर विद्यापीठ बास्केटबॉल–जोधपूर



**वामन परांजपे**
तृ. व. वाणिज्य
मल्लखांब आंतरविद्यापीठ विजेता



**संतोष शिवरकर**
१२ वी वाणिज्य
राष्ट्रीय खेळाडू–व्हॉलीबॉल



**अनिता केसार**
१२ वी वाणिज्य
राष्ट्रीय खेळाडू–कबड्डी



**नंदिनी भोसले**
११ वी वाणिज्य
महाराष्ट्र कबड्डी संघात निवड



**मनीषा नातू**
११ वी वाणिज्य
कनिष्ठ महाविद्यालय
सर्वोत्तम विद्यार्थी ८७–८८



विजया धुमाळ
कबड्डी



अनिल बहिरट
तृ. व. कला
नियतकालिक चिटणीस



संदीप गोखले
विद्यार्थी प्रतिनिधी–ग्रंथालय



रमाकांत देशपांडे
द्वि. व. कला
मॉम ' चिटणीस



फैयाज शेख
प्र. व. वाणिज्य
कलामंडळ चिटणीस



उमेश कामत
वादविवाद मंडळ चिटणीस



किशोर ढमाले
प्र. व. कला
वक्तृत्व विशेष नैपुण्य



राजेश साळवी
द्वि. व. वाणिज्य
बॉलबॅडमिंटन–चिटणीस

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे

## मॉडर्न महाविद्यालय, पुणे ५

# ' मॉडर्न ' नियतकालिक

## १९८७–१९८८

**संपादन समिती :**

अध्यक्ष : प्राचार्य प. स. चिरपुटकर

**सदस्य :**

डॉ. माधवी मित्र

प्रा. सौ. आशा परुळेकर

प्रा. कु. सुरेखा परब

प्रा. सुहास घैसास

**संपादक :**

डॉ. वि. भा. देशपांडे

**विद्यार्थी प्रतिनिधी :**

अनिल बहिरट

तृ. व. कला

**मुखपृष्ठ संकल्पना आणि आविष्कार–प्रा. सुहास घैसास**

१९८७ हे वर्ष आंतरराष्ट्रीय निवारा वर्ष. या पार्श्वभूमीवर या वर्षात ज्या महत्त्वाच्या व्यक्तींच्या संदर्भात काही विशेष घडले त्यांची छायाचित्रे वापरली आहेत. नटसम्राट बालगंधर्व, श्रेष्ठ गणिती रामानुजन, नोबेल पारितोषिक विजेते सर सी. व्ही. रामन् या तीन महान व्यक्तींची जन्मशताब्दी, तपोवृद्ध पक्षीनिरीक्षक डॉ. सलीम अली यांचे निधन आणि जागतिक कीर्तीचा क्रिकेटपटू श्री. सुनील गावसकर याची सन्मानीय निवृत्ती अशा व्यक्तींचा गौरव आपणही करावा ही भूमिका.

**प्रकाशक** : प्राचार्य प. स. चिरपुटकर
मॉडर्न महाविद्यालय
शिवाजीनगर, पुणे ४११००५

**मुद्रक** : श्री. दिलीप माजगावकर
साप्ताहिक मुद्रण
१०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

# संपादकीय / डॉ. वि. भा. देशपांडे

१९८७–८८ हे शैक्षणिक वर्ष आपल्या महाविद्यालयाच्या दृष्टीने सुखदु:खमिश्रित असे गेले. काही आनंदाच्या घटना घडल्या तर काही दु:खद स्वरूपाच्या. त्याच्याच बरोबरीने अनेक लहान–मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागले. त्यामुळे निरनिराळ्या संदर्भात हे वर्ष स्मरणात राहील.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे आद्यसंस्थापक कै. कानिटकर यांची जन्मशताब्दी या वर्षात साजरी झाली. त्यांच्या निरलस सेवावृत्तीमुळे, शैक्षणिक दूरदृष्टीमुळे आपल्या संस्थेची स्थापना झाली. तिचा विस्तार आणि विकास झाला. त्यांचे स्मरण आपणा सर्वांनाच स्फूर्ती देणारे आहे.

महाविद्यालयाचे माजी प्राचार्य प्रा. डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांची नियुक्ती पुणे विद्यापीठाचे प्र–कुलगुरू पदावर झाली याचा आम्हाला आनंद वाटतो. कारण विद्यापीठातील इतक्या उच्च पदावर जाण्याचा मान या महाविद्यालयातील प्राध्यापकाला प्रथमच मिळत आहे. त्याबद्दल डॉ. नवलगुंदकर यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

डॉ. नवलगुंदकर पुणे विद्यापीठात गेल्याने प्राचार्यपदी प्रा. प. स. चिरपुटकर यांची नियुक्ती झाली. ते गणित आणि संख्याशास्त्र या दोन्ही विषयांतले नाणावलेले शिक्षक आहेत. त्यांच्या विषयात त्यांनी पुस्तकरूपाने विपुल लेखन केलेले आहे. त्यांच्या सखोल ज्ञानाचा आणि दीर्घ अनुभवाचा फायदा महाविद्यालयाला निश्चितच मिळेल यात शंका नाही. प्राचार्यपदी ते आल्याबद्दल त्यांचे स्वागत आणि अभिनंदन. असेच दीर्घकाळ सेवा केलेले पदार्थविज्ञान विभागाचे प्रमुख प्रा. मराठे यांची उपप्राचार्यपदी नेमणूक झाली. त्यांचेही मन:पूर्वक स्वागत आणि अभिनंदन.

शिक्षणक्षेत्रात शिक्षकांनी अभ्यास–संशोधन करावे, नवे प्रकल्प हाती घ्यावेत असे नेहमीच म्हटले जाते. याही संदर्भात आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापक आघाडीवर आहेत. डॉ. अशोक पाथरे, डॉ. एस्. वाय्. परांजपे, डॉ. द. दि. पुंडे या तीन प्राध्यापकांनी आपापले संशोधन–प्रकल्प विद्यापीठ अनुदान मंडळाला सादर केले. त्यांना त्या कामासाठी भरघोस अर्थसाह्य प्राप्त झाले असून ते आपल्या संशोधनात कार्यरत आहेत. आमचे एक ज्येष्ठ सहकारी प्रा. प्रमोद पारखी हे त्यांच्या विषयाच्या संदर्भात भारतात आणि परदेशी काही चर्चासत्र-परिषदांमध्ये सहभागी होण्यासाठी जाऊन आले. डॉ. मल्ल्या यांनी पीएच्. डी. पदवी प्राप्त केली, तर प्रा. लागू यांनी एम्. पी. एड्. ची पदवी मिळवली. या व्यतिरिक्त पुढील प्राध्यापकांनी डी. एच्. ई. मिळवली– (१) कु. सुलोचना चव्हाण (गणित) (२) श्री. द. कृ. दातरंगे (पदार्थविज्ञान) (३) कु. नीता मा. कांबळे (इंग्रजी) (४) श्री. अनिल म. व्हनकळस (रसायनशास्त्र) (५) सौ. सुनीता नि. गोसावी (वाणिज्य) (६) श्री. झगडे (भूगोल) या सर्व प्राध्यापकांनी केलेली शैक्षणिक कामगिरी ही त्यांना व्यक्तिगत पातळीवर जितकी सार्थ अभिमानाची आहे तितकीच संस्थेलाही आहे. ज्यांना विशेष पदवी मिळाली त्यांचे अभिनंदन आणि ज्यांनी शैक्षणिक प्रकल्प हाती घेतले आहेत त्यांना सुयश चिंतितो.

शैक्षणिक क्षेत्रात जशी उल्लेखनीय कामगिरी काही प्राध्यापकांनी केली तशीच शिक्षणेतर गोष्टींमध्येही अतिशय उत्साहाने भाग घेतला. विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे आपल्या महाविद्यालयातील सेवक, कर्मचारी, प्राध्यापक आदी सर्वांनी मिळून एक स्नेहसंमेलन संपन्न केले. या सम्मेलनात विविध खेळांच्या स्पर्धा झाल्या, विविध गुणदर्शनाचा तीन तासांचा भरगच्च कार्यक्रम झाला. मुख्य म्हणजे अतिशय मेहनत घेऊन 'प्रेमा तुझा रंग कसा ?' या नाटकाचा प्रयोग प्राध्यापक–कलावंतांनी पेश केला. या निमित्ताने आपल्या सहकाऱ्यांमध्ये असलेल्या अनेक कला–क्रीडागुणांची माहिती सर्वांना झाली. असेही ध्यानात आले की, यातले काही कलावंत केवळ हौसेचे, कौतुकाचे नाहीत तर ते बाहेरच्या क्षेत्रात स्वतंत्रपणे काही कला–क्रीडा प्रदर्शन करू शकतील इतक्या क्षमतेचे आहेत. महाविद्यालयीन स्तरावर असे सम्मीलित होणे आणि गुणप्रदर्शित करणे विराळा असल्याने या आम्हा सर्व प्राध्यापक कलावंतांचे मनःपूर्वक अभिनंदन. हा उपक्रम असाच उत्साहाने प्रतिवर्षी चालू राहो ही सदिच्छा.

पण प्राध्यापकांच्या जीवनात याहीपेक्षा आणखी काही वेगळे घडू शकते हे या वर्षात लक्षात आले. ती गोष्ट म्हणजे ज्येष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांचा संप. हा संप भारताच्या स्तरावर मोठ्या प्रमाणात आणि दीर्घकाळाचा झाला. प्राध्यापक–वर्गाच्या आर्थिक, शैक्षणिक, सेवाशर्ती आदी मागण्यांसाठी हा संप होता. याच कारणांसाठी कनिष्ठ प्राध्यापक आणि कर्मचारी–सेवक यांचाही संप होऊ घातला होता. पण वाटाघाटीमुळे तो टळला. या दोन्ही संपांच्या वातावरणामुळे अध्ययन, अध्यापन, दैनंदिन अन्य कामकाज यांवर खूपच परिणाम झाला. वर्षाचे एकूणच वेळापत्रक विस्कळीत होते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. पण अशाही परिस्थितीत प्राध्यापक–वर्गाने नेहमीच्या कामाव्यतिरिक्त सुट्टीच्या काळात काम करून संप काळातील आपले कामकाज पूर्ण केले. सेवक–कर्मचारी यांनी या संदर्भात महत्त्वपूर्ण सहकार्य केले. सर्वांच्या सहकार्यामुळे वर्षाअखेरीस महाविद्यालयाचे वेळापत्रक योग्य दिशेने जात आहे याचा अनुभव आला. या निमित्ताने प्राचार्य आणि अन्य पदाधिकारी यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. पण शिक्षक आणि शिक्षकेतर सहकाऱ्यांनी केलेल्या सहकार्याने विद्यार्थ्यांचे कोणत्याही प्रकारचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, हे सूत्र कटाक्षाने पाळले गेले. त्यामुळे सर्वांनाच समाधान झाले.

महाविद्यालयाच्या परंपरेप्रमाणे यंदाही विविध विषयांची चर्चासत्रे आयोजित करण्यात आली. त्यामध्ये प्राणीशास्त्र, इलेक्ट्रानिक्स, कॉम्प्युटर सायन्स, अर्थशास्त्र, मराठी, इतिहास इत्यादी विभागांनी आपापल्या विषयांची चर्चासत्रे घेतली. यातल्या काही चर्चांमधले निबंधलेखन पुस्तकरूपानेही प्रकाशित होणार आहे.

या वर्षीच्या अनेक अडीअडचणींमधून मार्ग काढण्यासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांप्रमाणेच विद्यार्थ्यांनी दिलेले सहकार्य महत्त्वाचे ठरले. प्रतिवर्षीप्रमाणे स्नेहसम्मेलन आणि अन्य अनेक उपक्रम उत्साहाने, शांततेने पार पडले. कला आणि क्रीडा क्षेत्रात छोटीमोठी अनेक पारितोषिके, सन्मान विद्यार्थ्यांनी मिळवले त्याचा आम्हाला विशेष अभिमान आहे. ११ वी एच् वर्गातील विद्यार्थ्यांनी सहलीच्या वर्गणीतील उरलेली रक्कम 'गरीब विद्यार्थी निधी 'ला देऊन एक 'अर्थ' पूर्ण परंपरा निर्माण केली. त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी आंतर विद्यापीठ, भारतीय स्तरावर यश मिळविले त्यांचेही हार्दिक अभिनंदन.

गेली सतरा–अठरा वर्षे विद्यार्थी संख्येचा विस्तार होतो आहे. त्यामुळे इमारतीचाही विस्तार करावा लागत आहे. यंदाच्या वर्षी सात नवीन वर्ग बांधले गेले त्यामुळे खूपच सोयीचे झाले. तसेच एक मोठा हॉल कम्प्युटर विभागासाठी स्वतंत्रपणाने तयार झालेला आहे. इमारत-विस्ताराबरोबरच काही नवे विषय आरंभित करून ज्ञानकक्षा विकसित करण्याचा यत्न याही वर्षी झाला. अकरावीच्या स्तरावर इलेक्ट्रानिक्स, संगणक शास्त्र हे दोन विषय, तृतीय वर्ष शास्त्र स्तरावर इलेक्ट्रानिक्स आणि द्वितीय वर्ष स्तरावर संगणक शास्त्र इत्यादी विषयांचा त्यात अंतर्भाव आहे. या विषयांचा बरोबरीनेच भावी काळात शिक्षण–उद्योग–व्यवसाय करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शनपर व्याख्यानेही आयोजित केली होती.

महाविद्यालयाच्या अनेक महत्त्वाच्या विस्तार–विकास कार्यासाठी आर्थिक गरज मोठ्या प्रमाणात असते. त्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाकडे अनेक योजना पाठवीत असतो, आर्थिक मागणी करीत असतो. त्या मागणीला

यंदा चांगला प्रतिसाद आला. सातव्या योजनेच्या अंतर्गत सात लाख रुपये आणि अन्य एका उपक्रमाच्या अंतर्गत दीड लाख रुपये अनुदान प्राप्त झाले. या भरघोस अर्थसाह्याबद्दल विद्यापीठ अनुदान मंडळाचे आभार.

हे सारे घडत असताना आमच्या दोन सहकारी मित्रांचे आकस्मित निधन धक्कादायक होते. डॉ. भीमराव कुलकर्णी हे या महाविद्यालयाच्या आरंभापासून बारा वर्षे मराठी विभाग प्रमुख म्हणून काम करीत होते. काही वर्षे उपप्राचार्य म्हणूनही काम करीत होते. मराठीतील एक मान्यवर ललित साहित्यिक, समीक्षक म्हणून त्यांचा लौकिक होता. या लौकिकाचा महाविद्यालयाला मोठ्या प्रमाणात लाभ झाला. गेली चार वर्षे ते मुंबईला श्रीमती नाथीबाई ठाकरसी विद्यापीठात मराठी विभागाचे प्रमुख होते. त्यांनी महाविद्यालयासाठी केलेल्या अनेक चांगल्या गोष्टींचे स्मरण आम्हाला सतत राहील. वनस्पतीशास्त्र विभागातील एक सेवक श्री. चिनकटे यांचे तरुणपणी झालेले आकस्मित निधन तितकेच दुःखदायक आहे. एक प्रामाणिक, कामसू सेवक म्हणून ते सर्वप्रिय होते. डॉ. भीमराव कुलकर्णी आणि चिनकटे यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

अशा या सुखदुःखमिश्रित वर्षात नियतकालिकाचा अंक आम्ही आपल्या हाती देऊ शकलो कारण प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी, कर्मचारी, सेवक आदींचे मनःपूर्वक सहकार्य लाभले. विशेषतः नियतकालिक समितीच्या सर्व सदस्यांनी उत्तम सहकार्य दिले. त्यामध्ये डॉ. माधवी मित्र, प्रा. कु. सुरेखा परब, प्रा. सौ. आशा परुळेकर, प्रा. सुहास घैसास, अनिल बहिरट (विद्यार्थी प्रतिनिधी) हे समिती सदस्य आणि त्या व्यतिरिक्त प्रा. गीताराम गायकवाड, डॉ. स्नेहल तावरे, श्रीमती निर्मला मोने, सौ. मेधा सिधये, प्रा. वाणी, प्रा. माळवे, श्री. वाय्. पी. देशपांडे, श्री. एन्. वाय्. कुलकर्णी, श्री. बापट अशा अनेकांचे सहकार्य लाभले. प्रा. घैसास यांनी नियतकालिकाचे मुखपृष्ठ आत्मीयतेने करून दिले. काही विद्यार्थ्यांनी जाहिराती मिळवून देऊन काहीसा आर्थिक भार हलका केला. अनेक विद्यार्थी, प्राध्यापक मित्रांनी लेखन साह्य केले.

या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

# अनुक्रमणिका

## मराठी विभाग


- नवे शैक्षणिक धोरण : काही आक्षेप : संदीप साकोरे...९
- जी. एं. च्या दोन कथा : रोहिणी वसंत बापट...११
- सर्वोदय संमेलनात आम्ही... : हर्षवर्धन पिंजरकर...१३
- अपुले जीवन अपुल्या हाती : प्रदीप रघुनाथ कुलकर्णी...१६
- लोकप्रिय साहित्य : कल्पना रणपिसे...१९
- ॲलर्जी : विनोद दशरथ कंक...२१
- 'आनंद' : एक आनंद : ज्योत्स्ना रमेशचंद्र शिदोड...२३
- सती–एक धार्मिक पण अमानुष चाल : लीला ढवळे...२५
- मृत्यू नसता तर : ज्योती प्र. देशपांडे...२७
- आठवण (कथा) : देशपांडे आर. एस्....२९
- नृत्य आणि भारतीय माणूस : अभिजित श्री. डांगे...३२
- प्रीत (कविता) : विकास ढवळे...३३
- ताऱ्हुलं (कथा) : कविता देशपांडे...३४
- कुंपण (कविता) : गुट्टे व्यंकट ज्ञानोबा...३६
- संपण्यापूर्वी (कविता) : वंदना शिरुडे...३६
- भारतीय विज्ञान परिषद : डॉ. घाटे...३७
- निसर्गाच्या सहवासात : भास्कर जोशी...३९
- न विसरणारे क्षण महान् क्रिकेटपटूंच्या क्रीडा–जीवनात : प्रा. सुरेश दातार...४२
- बोलायचे तुझ्याशी... : प्रदीप कुलकर्णी...४५
- नकळत : गणेश वडगावकर...४५
- मी व माझे 'मानसशास्त्रीय' विद्यार्थी : प्रा. सौ. आशा परुळेकर...४६
- आठवणी : जयश्री कुलकर्णी...४८
- लक्षद्वीप : एक अनोखा अनुभव : प्रा. चंद्रशेखर/प्रा. घैसास...४९
- नियती : मिलिंद वाईकर...५३
- अलिप्त मी : रत्नाली राजन जाधव...५३

- एक वाऱ्याची सैर : संजीवनी राहाणे...५४
- परिणीता (कविता) : संदीप श. खजुरे...५७
- बंद पापणी (कविता) : कु. छाया साळवे...५७
- 'जी. अें.' च्या दोन कथा : शकुंतला मुकाणे...५८


## हिंदी विभाग


- बेरोजगारी की समस्या : प्रकाश लेखवानी...६३
- फैशन–एक अभिशाप : देवदत्त कांबळे...६५
- आधुनिकता का सामाजिक जीवन पर अनुचित परिणाम : रश्मि रावत...६७
- कबर भी उदास हैं (कविता) : अनिता बाजी...६८
- फर्क सिर्फ इतना हैं (कविता) : एस्. राज...६८
- सेहत का महत्त्व : अनिल यादव...६९
- युवा-शक्ती (कविता) : मोनिका देवधर...७०
- न्याय : सुनीता गौड...७१
- परीक्षा (कविता) : मनिषा मुथियार...७२
- बंदिनी (कविता) : रत्नमाला...७२
- आत्मसंस्कार : यशवंत राठोर...७३
- मेरा देश (कविता) : राजेश भुप्पीड...७४
- क्या आप जानते हैं ? (कविता) : संकलन – मोनिका देवधर...७४
- हृदय परिवर्तन : अंजली पानसरे...७५
- अमरवाणी (संकलन) : मोनिका देवधर...७६


## इंग्रजी विभाग


- A Uuique Feature of Japanese Management : Deepa Parkhi...79
- Some collections : Monica Deodhar...81
- Advances in Botany and Its Impact on Human Welfare : Prof. Zunjarrao R. S....84
- 'Make Way While The Sun Shines' : Monica Deodhar...86
- Happy (Poem) : Rajesh M. Chemate...87
- History of The Newyork Times : Pushkar A. Khedkar...88
- A Love Letter : ...89
- O Lord : S. S. Sudham...89
- Noise Pollution in Pune city : Prof. Walmiki Ahirrao & Prof. Vilas Alhat...90
- Fun Time : K. Leela Madhuri Rao...92
- वार्षिक अहवाल...९३

# मराठी विभाग

# नवे शैक्षणिक धोरण : काही आक्षेप

**संदीप साकोरे**
प्रथम वर्ष शास्त्र 'अ'

ऑगस्ट १९८५ मध्ये केंद्र सरकारने 'शिक्षणाचे आव्हान एक धोरणात्मक दृष्टिक्षेप' या नावाचा मसुदा देशासमोर ठेवून 'नवीन शैक्षणिक धोरण' या नावाने त्याचा प्रचार केला. विरोधी मते न जुमानता मे १९८६ मध्ये आपल्या बहुमताच्या जोरावर ते संसदेत संमत करून घेतले. या धोरणाचे मूळ आपणास मनुस्मृतीमध्ये सापडते. मनुस्मृतीमध्ये असे सांगितले आहे की, स्त्रिया व क्षुद्र यांनी वेद ऐकले तर त्यांच्या कानात तप्त शिसे ओता व पठण केले तर जीभ छासडा. त्याप्रमाणे हे नवे धोरण जुन्या मनुस्मृतीची नवीन आवृत्ती आहे. जुन्याच बाटलीतले हे नवे औषध आहे.

कोठारी आयोगाने सुचवलेल्या १०+२+३ प्रकारचा अभ्यासक्रम ह्या निरक्षरता आणखीनच वाढवणाऱ्या गाळण्या आहेत. जर आपण असे गृहीत धरले की, पहिल्या इयत्तेत १०० मुलांनी प्रवेश घेतला आहे तर त्यापैकी ३७ मुले चौथी पास होतात, केवळ २३ मुले सातवी पास होतात, जेमतेम १२ मुले १० वीं पास होतात. त्यापैकी अवघी ५ मुले कॉलेजचा उंबरा ओलांडतात आणि पदवीचे भाग्य मात्र त्यापैकी २ मुलांच्याच पदरी पडते. ही आहे भारतातील स्वातंत्र्योत्तर शिक्षणाची वाटचाल. १९६० पर्यंत सर्वांना प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे देणार असे जाहीर केले गेले. प्रत्यक्षात १ ली ते ७ वी पर्यंतच्या १७.४% मुलांना प्राथमिक शिक्षणाची गरज असताना सातव्या योजनेत १३.७% मुलांच्या शिक्षणाची तरतूद केली गेली आहे. अशा रीतीने नवे शैक्षणिक धोरण खोटे बोलते आहे.

पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये शिक्षणावर ७.३% खर्च होत असे तो कमी करून सातव्या योजनेत तो २.५% वर येऊन ठेपला आहे. या देशामध्ये ४.४% बालकामगार राबत आहेत. त्यांचाही ह्या धोरणात कोठे उल्लेख नाही, अशा रीतीने प्राथमिक शिक्षणावरचा खर्च कमी, बालकामगारांचा विचार नाही त्यामुळे प्रत्यक्षात येथे हे धोरण कालबाह्य ठरले आहे.

आपल्या भारतात २४% स्त्रिया साक्षर आहेत. त्यात ७% ग्रामीण स्त्रिया साक्षर आहेत, म्हणजे भारतात ७६% स्त्रिया निरक्षर आहेत. त्यात ९३% ग्रामीण स्त्रिया निरक्षर आहेत. बहुजन समाजात ग्रामीण भागात ८८% पुरुष निरक्षर आहेत. तरी सुद्धा स्त्रियांना वसतिगृहाच्या सोयी नाहीत. त्यासाठी वेगळ्या तरतुदी करण्यात आल्या नाहीत. अशा रीतीने छ. शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, धोंडो केशव कर्वे यांचा उदोउदो करणारे सरकार बहुजनांच्या शैक्षणिक धोरणात उदासीनता दाखवते हीच लोकशाहीची शोकांतिका आहे. महात्मा फुले यांनी काळाच्या कड्यावर उभे राहून सार्वत्रिक शिक्षणाचा पुरस्कार केला होता हे सरकारने आठवावे !

सुरतेच्या सेंटर ऑफ सोशल स्टडीजचे डायरेक्टर डॉ. घनश्याम शहा यांनी आपल्या 'मायनॉरिटी अँड नेशन बिल्डीग मध्ये आदिवासी निरक्षरता प्रमाण दिले आहे. त्यात आंध्र प्रदेशात ९५% आदिवासी निरक्षर, महाराष्ट्रात ९२% तर प. बंगालमध्ये ८९% इतक्या मोठ्या प्रमाणावर निरक्षरता डोकावून पाहात असताना सरकार आश्रमशाळांच्या पलीकडे जाण्यास तयार नाही. दलितांमध्ये ७९% निरक्षरता आहे असे असताना शिक्षणायोग्य वातावरण तयार केले जात नाही. शिष्यवृत्तीतही कसलीच वाढ नाही.

असे असताना सार्वत्रिकरणाच्या नावाखाली अनौपचारिक शिक्षण दूरदर्शन, व्हिडीओ, इनसॅट B इ. मार्गांचा वापर सुचवला गेला आहे. प्रत्यक्षात ही परदेशात कालबाह्य ठरलेली योजना अंमलात आणणारे सरकार अंधानुकरण करून आज स्वातंत्र्यानंतर ४० वर्षानंतरही आम्ही परकीयांची मानसिक गुलामगिरी तोडलेली नाही हे दाखवून देते. प्रत्यक्षात दूरदर्शनसमोर किती लोक बसतात याची खोटी व वाढत जाणारी आकडेवारी सरकार देणार व सुशिक्षितांचे सतत उदात्तीकरण करणार. शासनाच्या या सर्व प्रयत्नांचा मूळ अर्थ असा होतो की औपचारिक शिक्षण श्रीमंतासाठी व अनौपचारिक शिक्षण गरीबांसाठी. गरीबांना दूर अंतरावरून शिक्षण देणार याचा अर्थ शिक्षणापासून दूर ठेवणार असाच होतो.

राजीव गांधी ज्या डून स्कूलमधून शिकले त्या धर्तीवर जिल्हानिहाय शाळा काढायच्या. शालेय पातळीवर जसा आदर्श शाळांचा विचार मांडला तसा महाविद्यालयीन पातळीवर गुणवत्ता केंद्र काढायचा. त्यातूनच त्यांना हवे तेवढे मूठभर तंत्रज्ञ तयार करायचे. २ फेब्रुवारी १८३५ आपल्या टिपणीत लॉर्ड मेकॉले असे म्हणतो की, 'रंग व रक्ताने हिंदुस्थानी पण चारित्र्य, बुद्धिमत्ता, मतप्रणाली आणि रसिकता यात वृत्तीने इंग्रजी असा वर्ग निर्माण करायचा व निवडकांना शिक्षण द्यायचे' राजीव सरकार तरी यापेक्षा वेगळे काय सांगते. गरजेपुरते निवडक तंत्रज्ञ त्यांना फक्त निरक्षर जनतेशी संवाद करताना दुवे म्हणून हवे आहे. डोनेशन व कॅपिटेशन फी यांचे निर्लज्ज समर्थन, शिक्षणसंस्थांना निधी उभारण्याचे स्वातंत्र्य, कमवा व शिका योजनेला सोडचिठ्ठी, मुलांच्या ठोसपणातील उदासीनता व दिशाहिनता असे हे धोरण आहे. बाबा आमटे असे म्हणतात की, 'जाणिवेचा पक्षी ज्या शिक्षणातून मुक्त होतो ते खरे शिक्षण होय.'

त्यामुळे असे सांगण्याची वेळ आता आली आहे.

'किती येवोत द्रोणाचार्य, काळ आता डरणार नाही।
नवा एकलव्य येत आहे, दान अंगठ्याचे होणार नाही॥

●


## Skylark Entertainment Club

President
**Satish Kamatkar**

1320 Kasba Peth,
Krishna Kunj Housing Society, Pune

# जी. एं.च्या दोन कथा

**रोहिणी वसंत बापट**
द्वि. व. साहित्य

जी. ए. कुलकर्णीचा 'निळासावळा' हा कथासंग्रह नावाला साजेशा आहे. डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी म्हटले आहे की ह्या कथा एककेंद्रित नाही तशा अनेक केंद्रीही नाहीत. त्या फिरत्या केंद्राच्या कथा आहेत.

ह्या कथासंग्रहात जी. ए. कुलकर्णींनी उजाड. आळसावलेल्या ओसाड वस्तीत दारिद्र्यात राहणाऱ्या लोकांचे वर्णन केले आहे. अशा परिस्थितीत राहून ही लोक आपला छंद कसा जोपासतात हे स्पष्ट करताना त्यांची भाषाशैली त्याच वातावरणाशी निगडीत आहे. त्यामध्ये अती ग्रामीण किंवा नागरी भाषेचा उल्लेख वाचताना जाणवत नाही. तसेच स्वत: आपण काही करू शकलो नाही. स्वत: अज्ञानात राहिलो म्हणून पुढची पिढीही तशीच न राहाता तिला शहाणं करावं म्हणजे दुसऱ्यासाठीही धडपडणारी लोक किंवा व्यक्ती या संग्रहात आहेत.

ह्या संग्रहातील 'चंद्रवळी' ही कथा. या कथेचा नायक सण्णा दरिद्रीच आहे. सतत आजारी पडणारा. म्हणून त्याची प्रेयसी गौरी त्याच्याजवळ लग्न करून एका दिवसातच त्याच्याकडून पळून जाऊन सण्णाचा लहान भाऊ गुंजडा ह्याच्याबरोबर काही काळ संसार करते व ती मरते. चंद्रा ही तमाशात नाचणारी. तिच्यावर सण्णाचा जीव जडतो, पण बिराजदार पाटलाच्या धाकामुळे त्याला चंद्राचा नाद सोडावा लागतो. असा हा सर्व बाजूंनी खचलेला सण्णा छंद म्हणून कबूतर पाळतो. त्याने पद्मजीसारखा कबूतरखाना खोलला नाही तरीसुद्धा त्याला कबुतराच्या प्रत्येक जातीची माहिती आहे. त्याच्याजवळ 'चंद्रावळी' नावाची एक सुंदर मादी आहे. ती मादी म्हणजे सण्णाचं सर्वस्वच आहे. सण्णा पद्मजीजवळ मित्रांच्या सांगण्याने नाईलाजाने पैंज लावतो आणि सोन्यासारख्या चंद्रावळीला पाच रुपयांकरता कायमचा मुकतो.

अशाप्रकारे मनापासून आनंद घ्यावा या आशेने जगणारा सण्णा शेवटपर्यंत एकटा वाटतो. सण्णाच्या भोवती फिरणारा त्याचा मित्र बाळू लहान भाऊ गुंजडा, गौरी, चंद्रा, चंद्रावळी या सर्वांच्या मध्ये सण्णा एकटा वाटत नाही. उदा. ज्यावेळी चंद्रावळी मादी जिंकली म्हणून घोळक्यात एका पायावर उड्या मारणारा सण्णा एकटा वाटत नाही. पण चंद्रावळी परत येत नाही म्हणून लहान मुलाप्रमाणे रडणारा सण्णा एकटा वाटतो. ◻

## 'सांगाडा'

या कथा संग्रहातली 'सांगाडा' ही कथा. या कथेतले चाळीस वर्षापर्यंत स्वत:ला न झेपणारा प्रवास सहन करून आपल्या पुढच्या पिढीला शहाणं करून स्वत:च्या पायावर उभं करताना त्यांनी आपल्यासारखी मास्तरकी करू नये असं वाटतं. पण त्याच शाळेत विद्यार्थी, शिक्षक कोणीच ऐकत नाही. घरीसुद्धा मुलगा वडिलांचं ऐकत नाही. दोन–तीन वेळा गुरूजींचा मुलगा बापू दहावीला नापास होतो. म्हणून गुरुजी

रागात त्याला घर सोडून जायला सांगतात. बापूही रागाच्या भरात विहिरीत उडी मारून जीवनाचा शेवट करतो. त्यावेळी गुरुजी मनात म्हणतात, 'तुझे भाग्य उजळवावे. तू माझ्यासारखी मास्तरकी न करता चांगली नोकरी करावी. म्हणून मी ओरडलो. तू अजून दहा-पंधरा वेळा नापास झाला असतास ना तरी चाललं असतं. पण तू जीव देवून जीवनाचा शेवट करायला नको होतास.'

तसेच गुरूजींची मुलगी कमल वडिलांच्या धाकात वाढलेली, पण शेवटी वडिलांच्या मनाविरुद्ध घरातून पळून जाऊन वडिलांच्या मित्राच्या मुलाबरोबर लग्न करते. वडील राहातात त्याच गावात दुसऱ्या टोकाला कमल राहाते. वाटेत कधी वडिल भेटले तर बोलत नाही. कमलला मुलं झाली. पण तिने गुरुजींना नातवांच्या बारश्यालाही बोलवलं नाही.

गुरूजींना मात्र वाटत असत की आपल्या मुलीनी व जावयाने झालं गेलं विसरून जाऊन म्हातारपणी तरी आपल्याशी बोलावं. आधार द्यावा, पण गुरुजी म्हणजे सायन्स हॉलमध्ये माणसाचा आहे त्याप्रमाणे ते हालता सापळा आहेत.

'सांगाडा' आणि 'चंद्रवळी' या कथांचे नायक गुरुजी व सण्णा हे इतर पात्रांशी निगडित असल्याने एकटे वाटत नाहीत. पण त्यांच्या आशा-आकांक्षा, भावना, छंद ह्या सर्वांपासून ते मनस्वी दुरावले आहेत. त्यांना हवं असलेलं जीवन त्यांच्यापासून दुरावत गेलेलं आहे. आणि इथे मात्र ते एकाकी वाटतात. म्हणजे इथे ह्या कथा एककेंद्री वाटतात.

●


*With Best Compliments from*

**Prashant Motors**

110/17 Shivajinagar, Pune 411 005

AUTHORISED DEALER
FOR

**Industrial Oxygen Co. (P) Ltd.**

Gases Available
Oxygen, Acetylene, Nitrogen,
Medical Oxygen Hydrogen and Argon

Phone : 56300, 56400
Gram : MONOAUTO

**Kadambari Enterprises**

Distributors for
**Cyber Sharp & Multiplex Calculators**

COMMERCIAL SCIENTIFIC
PRINTER, CALCULATORS,
ELECTRONIC TYPEWRITERS
STD LOCKS

526 Sadashiv Peth,
Peruget Road,
Pune 30

Phone : 442304

# सर्वोदय संमेलनात आम्ही...

**हर्षवर्धन पिंजरकर**
द्वि. व. कला

२५ डिसेंबरची मध्यरात्र उलटून गेलेली. तीन मुली अन् आम्ही चार मुलगे पुरते वैतागलेलो.डासांसाठी आमचं रक्तदानही चाललं होतं. येशूने इतरांसाठी जीव ठेवला, आम्हीही थोडंसं तरी करावं म्हणून करत होतो. आमचं रक्त डासांना नक्कीच मानवत असावं ! येशूचे भक्त तिकडे आनंदोत्सव साजरा करीत असतील, आम्ही ह्या पॅसेंजरच्या–अर्थात थांबलेल्या आणि उशीर झालेल्या डब्यात दुःखातही सुख मानावे म्हणून विनोद मारत होतो. आज माझी पाळी होती.

मध्यरात्री साडेतीनला गाडी हलली तेव्हा आम्ही मुंबईला कधी तरी पोहोचणार अशी आशा वाटली. गाडीनं वेग घेतला, एकेकजण हळूच झोपेची शाल ओढू लागला. आमच्या प्रवासाची रॅली ही अशी निघाली होती. सकाळी साडेआठला बोरीवलीहून निघणारी रॅली आम्ही गाठू शकू की नाही, शंकाच होती. रात्री ९.५० ला पुण्याहून सुटणारी ही मनमाड–मुंबई पॅसेंजर मध्यरात्रीनंतर साडेतीनला सुटली होती. त्यातही अनेक अडचणी आलेल्या. नऊच्या दरम्यान बुकिंग–खिडकीवरच्या क्लार्कनं सुनावलं होतं, 'रात्री ११ च्या पुढं तिकिटं घेऊन जा.' 'अडला नारायण' ह्या उक्तीला अनुसरून आम्ही 'का ?' विचारण्याचा मर्खपणा टाळला. रात्री ११ वाजून १ मिनिटांनी आम्ही पुन्हा गेलो. बुकिंग क्लार्क दुसरा होता बहुधा पहिल्याची ड्युटी संपून दुसरा वेळेवर हजर झाला असावा. त्या बिचाऱ्यानं आम्हाला पॅसेंजरचं ५०० कि. मी. च्या कमी अंतराचं कन्सेशन मिळणार नाहीं हे समजावण्याचा असफल प्रयत्न केला. त्यावेळी कॉलेज ते स्टेशन किती हेलपाटे मारले ह्याचाच मी हिशेब किती तरी वेळ करत राहिलो. स्टेशन–उपाधिकक्षाकडे गेलो. तिथून आणखीनच नवीन माहिती मिळाली. ते कन्सेक्शन मंजूर करता येते किंवा अंमलात आणता येते. तिकीट–भाड्यात कन्सेशनही मिळेल, पण मेल–एक्स्प्रेसच्या भाड्याप्रमाणे, शिवाय प्रवास मात्र पॅसेंजरच्या 'स्पेशल' रक्तदानाच्या डब्यातूनच करावयाचा असतो......वगैरे वगैरे ! ह्या मुंबईनं पुण्यापासून ५०० कि. मी. च्या आत असावं आणि नेमकं आपण पॅसेंजरनंच का जायला निघावं असं वाटलं ! खूप–खूप चर्चा करून आम्हाला न पटणारं, न समजणारं, न सिद्ध होणारं उत्तर मिळालं. आम्ही वयाने ज्येष्ठ असलेल्या त्या माणसाचा मान राखून स्वतःच्या मनाचं समाधान मानलं, मात्र त्यांना नक्कीच ह्या 'कालच्या पोरां'ना कसं पटवलं ह्याचंच समाधान झालं असावं !

पॅसेंजरच ती ! नको तेव्हा नको तेवढी थांबणारच ! मागील गाड्यांना साईड देण्याची पादचाऱ्यांप्रमाणेच तिचीही ड्यूटी ! दिवे जंक्शन इथे सकाळी ९–९॥ च्या दरम्यान ती एकादा तास तरी हलणार नाही हे समजले. एवढं सामान उतरवून आम्ही लोकल प्लॅटफॉर्मवर आलो. सगळ्यांना लोकल म्हणजे काय ?' चीज असते हे मी उगीचच पटवून दिलं. प्लॅटफॉर्मवर

गर्दी नव्हती. पण लोकल येताच एकच हुर्रे उडाली. पुणेकरांना—अर्थात आमच्यासारख्यांना ती न मानवणारी गोष्ट ! कसंबसं मुलींना डब्यात कोंबलं. आम्हीही चढलो. मुलींचे श्वास कोंडले गेले तेव्हा लोकल म्हणजे काय चीज असते हे त्यांना कळलं असावं ! मलाही माझी मघाची बडबड व्यर्थ नव्हती हे पटलं. दादरला उतरलो—नाही—खरं तर फेकलो गेलो.

सरांच्या आधीच्याच सूचनेप्रमाणे आवश्यक तेवढं सामान सोबत घेऊन बाकीचं क्लोकरूममध्ये ठेवलं. वेस्टर्न लोकल लाईनवर आलो. एकूणच आमची 'युवा रॅली' वगैरे चुकली होती ! त्याच 'लोकल' नावाच्या दिव्यातून सोन्यासारखे पिवळे होऊन आम्ही बोरीवली स्टेशनवर हजर झालो. बोरीवली (पूर्व) मध्ये आचार्य दादा धर्माधिकारी नगरमधील अखिल भारतीय सर्वोदय समाजाच्या संमेलनाचं ठिकाण पाहून यावयास आमच्यापैकी दोघं गेले. बाकीचे आम्ही थांबलो. दुपारचे साडे–बारा झाले होते. तोंडसुद्धा धुतले नव्हते. पंधराच मिनिटात ती दोघं आली. आम्ही निघालो. उशीर झाला होता. त्यांनी आम्हाला 'स्वयंसेवक' म्हणून सामील करून घेतलं. विनोबा–गांधीजी–जयप्रकाश ह्या तिघांच्या फोटोचे ओळखपत्र प्रत्येकाला मिळाले. त्या दुपारी आम्हाला विश्रांतीसाठी परवानगी होती.

चौकशीअंती कळले, 'युवारैली' निघालीच नव्हती. माझ्या बरोबरीच्या एकाला का असा प्रश्न पडला. पण मला उत्तर लगेच सुचलं, इथे युवक आहेत कुठं ? सगळे म्हातारे, ७०–८०–९० वयाचे. तिथं आम्हीच कॉलेजविद्यार्थी. मग असंही कळलं, पुण्यातल्या आणि इतर भागातल्यासुद्धा कित्येक कॉलेजात त्यांनी निमंत्रण पत्रं पाठविली होती. 'सर्वोदय म्हणजे काय ? ह्याची कल्पना तिथं आली. भारतातल्या प्रत्येक प्रांतातील माणूस तिथं होता. सगळं वातावरण खादीमय, हिंदीमय होतं. कित्येक जण स्वातंत्र्यसैनिक होते. काही जण कुठल्या कुठल्या संस्थानात दिवाण म्हणून काम पाहिलेले होते, तर काही थोडेथोडके तरुणही होते. विदर्भ सोडता महाराष्ट्रातले फारसे कुणीही नव्हते हे पाहून अतिशय वाईट वाटले. कॉलेज तरुण कुणी नाही हे पाहून तर आणखीनच वाईट वाटले. अपवाद थोडे काही अमरावती, पनवेल, जवळपासचे बोरीवली वगैरेचे विद्यार्थी.

२६ तारखेचं आमचं जेवण रात्री ९॥ ला आटोपलं. आम्ही संयोजकांपुढे हजर झालो. त्यांनी पुढील तीन दिवसांचे जेवण—नाश्ता कूपन्स तयार कसे करावयाचे हे आम्हाला समजावून सांगून सगळं साहित्य दिलं. चार हजार कूपन्स तयार करावयाला आम्हाला सकाळचे सहा वाजले. आमची बैठक मध्यरात्री एकदाच उठली होती. सोबत जोक्स होतेच आणि ती रात्रही माझीच होती. कामाची गती राहावी म्हणून ती रात्रही मी चांगलीच निभावली ! आमच्यामध्ये स्वेच्छेने सामील झालेला एक गुजराथी युवक आमच्या कष्टांचा फार मोठा भागीदार बनला. सकाळी जागेवरून उठत येईना, डोळ्यांवर ही झापड ! दुपारी जेवणानंतर झोपता–झोपता मला तर मी रात्रीसारखं 'स्टेप्लींग'च करतोय असं वाटतं राहिलं ! मात्र संयोजकांनी आमची ही चिकाटी पाहून खरोखर तारीफ केली आणि ते आमचे दोस्तच बनले. एवढे की, त्यांनी त्यांचं अंथरूण आमच्या हॉलमध्ये आणलं आणि तीन दिवस ते आमच्याबरोबर होते !

तेव्हाची एक गंमत आठवली. आम्ही दोन हजार कूपन्स मध्यरात्री तीनपर्यंत तयार केली होती. संयोजक शरद विश्व ह्यांनी गोडशा बनारसी हिंदीत ध्वनिक्षेपकावरून सूचना केली. 'जेवण–नाश्ता कूपन्स घेऊन जावे. दोन–तीन मिनिटांत दोघं–तिघं शिबिरार्थी–अर्थात वयस्क हजर झाले. खाण्याच्या कूपनसाठी त्यांनी केलेली तत्परता आम्हाला अतिशय आवडली. मला तर त्यांना काही तरी बक्षिसच द्यावंसं वाटलं होतं, खरं सांगतो !

२७ च्या संध्याकाळी आम्ही नॅशनल पार्क पाहावयास परवानगी काढली. तिकडून संध्याकाळी ७॥ ला परतलो, तेव्हा विश्वजींनी आम्हाला त्यांच्या मानलेल्या बहिणीकडे–घाटकोपरला येण्याचे आमंत्रण दिले. आमच्यातल्या विद्यार्थिनींच्या उत्साहाकडे दुर्लक्ष करून मी त्यांना आदरपूर्वक नकार दिला, कारण लोकलमध्ये तेही सायंकाळी ८ वाजता होणारे हाल मी कल्पनेनेच जाणले. त्यांना ह्याची कल्पना नसावी म्हणून त्या रागावल्याही ! मग आमच्यापैकी दोघा मुलांना विश्वजीसोबत पाठविले आणि त्यामुळे त्यांनाही बरे वाटले. प्रवासातले हाल नंतर त्या दोघांकडून कळलेच म्हणा !

२८ च्या सकाळी नाश्त्यानंतर आम्ही पुस्तकांच्या

स्टॉल्सकडे लक्ष दिले. तसेच आम्ही कितीतरी पुस्तकं खपवून दिली. आमची ग्राहकांशी बोलण्याची तऱ्हा बघूनही विश्वजी खूष झाले. २९ च्या दुपारीदेखील आमच्याकडे स्टॉल्सकडे पाहण्याचेच काम आले. त्यामुळे चालणारी व्याख्यानं मात्र आम्हाला ऐकता आली नाहीत. कधीतरी व्याख्यानाच्या मंडपात पाच मिनिटं भाषण ऐकू शकलो, एवढंच ! श्रोत्यातील कित्येक लोक तळमळीनं बोलत ! गोहत्या, खादीप्रसार हे शब्द ऐकल्याशिवाय आमचा एक मिनिट गेला असेल तर शपथ ! सगळेच लोक भाषण ऐकत असेही नाही ! काही लोक तर सकाळचा नाश्ता करून मुंबई बघायला निघत. दुपारच्या जेवणाला बरोबर हजर. पुन्हा बाहेर पुन्हा रात्रीचे जेवण. आंध्र, ओरिसा, नागालँड, मणिपूर बिहार, प. बंगाल एवढ्या दुरून आलेले लोक मुंबई नाही पाहणार तर काय करणार ! काही तिथेच राहत. भाषण ऐकता–ऐकता सूत कातत, काही झोपतही असत ! प्रकृतिअस्वास्थ्यामुळेही असेल. पण लोक फारच श्रद्धाळू होते. कित्येक लोकांकडून मी गांधीजी-बरोबरचे अनुभव ऐकले. त्यांनी सत्याग्रह, तुरुंगवासाचे अनुभव सांगितले. मा. गोरे आदींबद्दल उल्लेख केला. एका म्हाताऱ्या गृहस्थाने तर म्हणे, ओळखपत्रावर गांधीजींचा फोटो पाहिजे म्हणून हट्ट धरला. ' त्यावेळी गाधीजींचा फोटो असलेली ओळखपत्रं जास्त शिल्लक नव्हती.' ते मिळत नाही म्हणून हंबरडा फोडला ! शेवटी अर्थातच ' ...पण रडू आवर ' म्हणून त्याला ते देण्यात आले. त्यावेळी गांधीजी म्हणजे काय ह्याची थोडी का होईना पण कल्पना आली !

२८ च्या रात्री सगळ्या शिबिरार्थ्यांना ' महाराष्ट्र–दर्शन ' पाहावयास मिळाले. वसंत बापटांच्या कला-पथकाने महाराष्ट्र सुंदर दाखवला. एकनाथाचं भारूड, राम जोश्यांची लावणी, शिवाजीचा पोवाडा, कोळीगीतं ...सगळं काही ! आजूबाजूला बसलेल्या अमराठी लोकांनी खूप स्तुती केली, आम्ही त्यांना अधिक माहि-तीही दिली !

आम्हाला एकूणच हा कार्यक्रम खूप आवडला· संयोजकांचं आमच्याबरोबरचं वागणं पाहून आम्हाला अतिशय अभिमान वाटला. पुण्यातलं एखादं का होईना कॉलेज तिथे असायला हवं होतं असं राहून राहून वाटतं ! एवढ्या मोठ्या संमेलनाची, जेवणाची जबाब-दारी एक उत्तर–प्रदेशीय वयस्क बाई यशस्वीपणे पेलत होती. जेवण अगदी व्यवस्थित होतं, पथ्याचं सुद्धा उपलब्ध होतं ! खजूर, केळी इत्यादींचा समावेश होता. चहाचं मात्र नाव नव्हतं हे विशेष ! पाण्याची थोडी कमतरता भासली; पण असो. २९ ची रात्रीची मुंबई–पुणे पॅसेंजर पकडण्यासाठी दुपारीच आम्ही संमेलनाचा निरोप घेतला. विश्वजींना तर खरंच वाईट वाटलं ! ●


**हॉटेल मुद्गलांजली**

११७०/३ जंगली महाराज रोड,
रुपी बँक शेजारी, मॉडर्न हायस्कूलजवळ,
शिवाजीनगर, पुणे ५

**शुद्ध शाकाहारी महाराष्ट्रीय**

**भोजन व स्नॅक्स**

लेडीज व फॅमिलीसाठी खास सोय

# अपुले जीवन अपुल्या हाती

**प्रदीप रघुनाथ कुलकर्णी**
प्रथम वर्ष (वाणिज्य), ड

आभाळ मुठीत झाकण्याचं, नवनवी विशाल क्षितिजं कवटाळण्याचं, आपल्यातल्या सुप्त कलागुणांना आव्हान देण्याचं हे वय ! या वयात प्रत्येक तरुण–तरुणीने चैतन्यानं सळसळायला हवं. ' फार अवघड आहे बुवा ', ' मला जमणार नाही ' अशा प्रकारची कुठलीच नकारात्मक, निराशाजनक वाक्यं तरुणांच्या तोंडातून निघायला नकोत. नवनवीन आव्हानं स्वीकारण्यात, येतील ती संकटं समर्थपणे झेलण्यात तरुणांनी आघाडीवर असायला हवं.

आजचे बहुसंख्य तरण, तरुणी हे नवथरपणे वागताना दिसतात. काहीजण म्हणतील या वयात नवथर वागायचं नाही, मग कधी ? हे म्हणणंही अगदी बरोबर आहे. नवथर जरूर वागायचं, आलेल्या प्रत्येक क्षणाचा आनंद समरसून भोगायचा. या वयात कितीही नाही म्हटलं तरी नवथरपणे वागलं जातंच. पण त्याचबरोबर आपण आपल्या जीवनाच्या दुसऱ्या बाजूकडेही तितक्याच गंभीरपणानं बघायला शिकलं पाहिजे. आपलं ध्येय काय ? आपली दिशा कोणती ? हे कुणीही अन् कधीही एक क्षणही विसरता कामा नये. आपल्या अंतर्मनात आपण नेहमीच आपल्या ध्येयाविषयी काही धोरणं आखून ठेवायला हवीत. आपल्याला जायचंय कुठं व आपण इच्छित स्थळाच्या किती जवळ किंवा किती दूर आहोत हे बघूनच आपण वागायला शिकलं पाहिजे.

स्वप्नांच्या दुनियेत वावरण्याच्या या वयात अगदी आयुष्याचा सर्व भार एकदम अंगावर येऊन पडला आहे असा दुःखी, कष्टी, चेहरा करून वागायचंही काही कारण नाही. आपलं मनोधैर्य आपण नेहमी वाढवत गेलं पाहिजे. समोर येणाऱ्या प्रत्येक क्षणाला तोंड देण्याची आपली तयारी असायला हवी. तो क्षण मग सुखाची फुले घेऊन येवो अथवा दुःखाचे निखारे. दोन्ही गोष्टी अगदी समर्थपणे, हसत–खेळत भोगायला शिकल्या पाहिजेत. मी हे सगळं आत्ताच का सांगतो तर आपल्या आयुष्यातला हाच काळ असा आहे की, ज्याला आपण उमेदीचा काळ म्हणतो. ह्याच वयात आपल्याला खूप काही शिकायला मिळतं. पावलापावलावर नवनवे अनुभव पदरात पडत असतात. आपल्यामध्ये जे जे अशक्य ते ते शक्य करून दाखवण्याची ताकद असते. एक वेगळ्याच प्रकारची हिंमत आपल्यात असते. आपल्या रक्तातून एक वेगळाच जोश वहात असतो. फक्त त्याला योग्य ती दिशा दाखवायला हवी.

एकदा आयुष्यातील हा काळ निघून गेला की आपल्याजवळ पश्चात्तापाशिवाय काहीही उरत नाही. ह्याच वयात एखाद्याच्या आयुष्याची मातीही होऊ शकते व एखाद्याच्या आयुष्याला सुवर्णाची झळाळीही लाभू शकते. प्रयत्नांचा परीस मात्र आपल्याजवळ हवा. आत्ताचा काळ हाच आपल्या जीवनातला मधुमास आहे. मधुमासात कोमेजायचं कशासाठी ? मधुमासात फुलत राहायचं, स्वतःबरोबर इतरांनाही फुलवायचं. आपला

मनसुगंध प्रत्येकाला वाटायचा. हाच मधुमास आयुष्यभर कसा टिकेल हे पहायचं. आपणही एका वेगळ्याच सुगंध विश्वात रमायचं, धुंद व्हायचं. शेवटी सुख–दुःख हे माणसाच्या जीवनातील अविभाज्य घटक आहेत. सुखाच्या वेळी सुख समरसून भोगायचं व दुःखाच्या वेळी रडत न बसता सर्व बळ एकवटून दुःखाशी चार हात करायला तयार राहायचं अशा पद्धतीने जो वागतो तोच जीवनात यशस्वी होतो.

जीवनाच्या बऱ्याच बाजू कमी असतानादेखील काही काही जण बऱ्याच बाबतीत आघाडीवर असतात. त्यांचा आदर्श घेऊन जीवनात यशस्वी होऊन दाखवावं. आपल्या पंखांमध्ये आभाळ झाकण्याची शक्ती नसेल कदाचित पण भरारी मारून जमेल तेवढं आभाळ झाकण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपल्याकडे आभाळाला जिंकायची शक्ती नाही म्हणून भरारीच मारायची नाही असं करणं नक्कीच चूक ठरेल. आपण आपलंच नुकसान करून घेतल्यासारखं होईल. आपल्याला बऱ्याच वेळा आपल्या चुका नंतर कळतात पण त्यावेळी फार उशीर झालेला असतो. तेव्हा वेळीच जागं झालेलं केव्हाही चांगलं. कुठलीच गोष्ट आपल्याला एकदम मिळत नसते. हळूहळू प्रयत्न करून एकेक गोष्ट मिळवायची असते. त्यासाठी आयुष्यातील एकेक क्षण विशेषतः या वयातील, महत्त्वाचा असतो.

आपल्या आयुष्यातील बराच काळ पळवाटा शोधण्यात जातो. 'असं नाही म्हणून तसं करता येत नाही व 'तसं नाही म्हणून असं करता येत नाही' अशा पळवाटा काढण्यातच आपण आघाडीवर असतो. सर्व काही जेथल्या तेथे, अगदी व्यवस्थित असल्यावर यश कुणीही मिळवून दाखवील. त्यात विशेष ते काय? त्यात 'थ्रिल' ते कसलं ? प्रतिकूल परिस्थितीशी झगडून जे काही यश मिळेल तीच आपल्या आयुष्याची पुंजी असते, प्रेरणा असते. त्याच्यातूनच पुन्हा काही तरी नवीन निर्माण करण्याची ताकद मिळते एक प्रकारचा वेगळाच उत्साह मनात निर्माण होतो. आपल्याला काहीतरी करता येतंय ही जाणीव होते आणि ही जाणीव झाली की आपण आपल्या आवडीच्या क्षेत्रात पाहिजे तसं यश मिळवू शकू.

एखाद्या गडावर जायचं तर मग माहीत असलेल्या वाटेवरून जाण्यापेक्षा आडवाटेनं, झाडाझुडपांना स्वतःच्या हातांनी बाजूला करत करत जाण्यात एक आगळीच मजा असते. कधी कधी आपण बराच पल्ला गाठला असताना अचानक पाय घसरून पडतो. अशा वेळी जिद्द ठेवून परत वर जाण्याचा प्रयत्न केल्यावर एकदा इच्छित स्थळी पोहोचल्यावर जो आनंद असतो तो निराळाच असतो. विलक्षण मानसिक समाधान त्यावेळी लाभतं. मग वाटेतले चरे, ओरखडे, जखमा यांचा आपल्याही नकळत आपल्याला विसर पडतो.

आजच्या तरुणांनी एक लक्षात ठेवायला हवं की, आपल्या वाटा आपणच शोधायला हव्यात. आपल्या वाटा शोधण्यात, त्यावरून यशस्वी वाटचाल करण्यात जे मानसिक समाधान मिळतं ते पुढच्या वाटचालीसाठी फार उपयोगी पडतं. आपल्या वाटा आपणच शोधताना सारासार विचार करायला हवा. आपण कुठे भरकटणार नाही ना याची खबरदारी घ्यायला हवी.

आपण चारचौघांच्यात गेल्यावर आपल्याकडे बघून इतरांना उत्साह वाटायला हवा. आपल्यामुळे इतरांचा विरस होता कामा नये. इतरांनी आपला आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपल्याकडून स्फूर्ती घेऊन काही करून दाखवायला हवं. इतरांनी तसे केल्यास आपल्यालाही आपला अभिमान वाटल्याशिवाय राहणार नाही. तेव्हा आपण आधी एक आदर्श इतरांपुढे उभा केला पाहिजे. मग असे आळसावल्यासारखे बसून काय फायदा? उठा, आळस झटकून उठा व स्वतःच्या विकासाबरोबरच इतरांना स्फूर्ती येईल असं काही तरी करण्याची मनाचीं तयारी ठेवून कामाला लागा. त्याबरोबर तुमचाही वैयक्तिक विकास होणारच असतो.

स्वतःच्या कोशातून बाहेर पडून सभोवतालचे जग डोळसपणे बघा. इतरांचे निरीक्षण करा. त्यातून चांगले तेच घ्या. इतरांच्या चुका सुधारता येत असतील तर सुधारा पण त्यांच्या चुकांना चेष्टेचा विषय बनवू नका. जीवनातील प्रत्येक क्षण महत्त्वाचा असतो. तो फक्त आपल्याच कोशात गुंतून पडण्यात वाया घालवू नका.

आपल्यातील हा काळ वेगवेगळी भावुक, हळवी स्वप्नं रंगवण्याचा असतो. इंद्रधनुच्या झुल्यावर झुलण्याचा असतो. वेगवेगळी स्वप्नं रंगवताना ती साकार होण्यासाठी योग्य ते कष्ट उपसले पाहिजेत. इंद्रधनूचे मोहक सप्तरंग जीवनात सामावून घ्यायचे असतील तर ते रंग हाती येण्यासाठी योग्य ती धडपड केली पाहिजे. स्वप्न आणि वास्तवता यांचा कुठं तरी मेळ घातल्या-

शिवाय आपण पुढे जाऊच शकणार नाही. नुसतंच स्वप्नरंजन करण्यात काय अर्थ ? नुसत्या स्वप्नरंजनामुळे काही काळानंतर निराशेचा अंधार दिसू लागतो न्यूनगंड निर्माण होतो. स्वप्नं पुरी झाली नाहीत तर आपल्यात काही तरी कमी आहे असे सारखं वाटत राहतं. यासाठी वास्तवतेचे भान ठेवून स्वप्नरंजन केलं पाहिजे व स्वप्नांनी मूर्त स्वरूप घ्यावं म्हणून योग्य ती खटपट केली पाहिजे. आपल्या भावनिक विश्वातील स्वप्नांना आपल्या कर्तृत्वाची जोड दिल्यास स्वप्नं साकार व्हायला वेळ लागणार नाही.

ढळणारी प्रत्येक सांज जीवनाचा एक अर्थ सांगून जात असते व उगवणारी प्रत्येक सोनेरी पहाट जीवनाचा एक नवीन अर्थ घेऊन उगवत असते. हा अर्थ आपण समजून घेतला पाहिजे, जाणून घेतला पाहिजे. त्याकडे डोळेझाक केली तर कायमचीच डोळेझाक होण्याची शक्यता असते.

आपल्या उमेदीच्या या काळातच पुढचं आयुष्य खंबीरपणे, मनाजोगं जगता यावं म्हणून हालचाल केली पाहिजे. आत्ताच पुढच्या समृद्ध आयुष्यासाठी प्रत्येक पाऊल विचारपूर्वक, काळजीपूर्वक उचलले पाहिजे.

माझ्या तरुण मित्रांनो, आपल्या मनातील सारी मरगळ, आळस झटकून टाका. एका नवीन, समृद्ध समर्थ अशा जीवनाला सुरुवात करा. आपल्या ज्ञानाचं क्षितिज सतत वाढवत रहा. आपल्या ज्ञानाची तहान कधीच भागता कामा नये. आपण ज्ञानाच्या बाबतीत सदैव तहानलेले असायला हवे. मिळतील तेथून ज्ञानाचे कण वेचून घ्यायला हवेत. हाती पडेल ते पुस्तक वाचायला हवे. विविध प्रकारच्या विषयांवरची पुस्तकं बारकाईने, मन लावून वाचायला हवीत. वाचन हा एक ज्ञान मिळवून देणारा सर्वात मोठा मार्ग आहे.

मनावर बसलेली जाळी जळमटं झाडून पुसून मन स्वच्छ लखलखीत करा. प्रत्येक गोष्टीत यश मिळवण्याची आशा बाळगा. त्यादृष्टीने पावले टाका. आजच्या तरुणाला काहीच अशक्य नाही. मीही एक तुमच्यासारखाच तरुण असल्यामुळे एवढं कळकळीने तुम्हाला सांगत आहे. एकदा का हा आयुष्यातला सोनेरी काळ निघून गेला की तो परत कधीही येणार नाही आणि त्याची वाट बघण्यातही काहीच अर्थ नाही. येणाऱ्या प्रत्येक संधीचा योग्य तो फायदा उठवा. संधीच मिळत नाही म्हणून रडत बसू नका. संधी मिळत नसते तर ती मिळवावी लागते हे लक्षात ठेवा.

आपली आवड ज्या क्षेत्रात, ज्या विषयात आहे तेच क्षेत्र, तोच विषय निवडून त्यातील ' मास्टर 'बनण्याचा प्रयत्न करा. सभोवतालचे निरीक्षण करताना राजहंसासारखी वृत्ती ठेवा. चांगले असेल तेच नेमके टिपा.

तेव्हा तरुण मित्रांनो, उठा, आपल्या जीवनाचा सूर सापडत नाही म्हणून रडत बसू नका. सूर शोधायचा प्रयत्न करा. तुमचं रडगाणं ऐकायला कुणीही उत्सुक नसतं, आणि इतरांना तरी तुमचं रडगाणं का ऐकून घ्यावं ? म्हणूनच जीवनाच्या संगीतात वेगवेगळे सूर भरण्याचा नेहमी प्रयत्न करा. जीवनाचं गाणं शक्य तेवढं सुरेल बनवा व ते हसत हसत गा. आपल्याबरोबरच इतरांनाही समृद्ध जीवनाचा एक आदर्श घालून द्या. ●


Phone 55157

**Shamrao Garage**

Specialists in : Tata Murchsdis & Diesel Engines

Prop. : Shamrao Thorve

**Jagdish Engineering Work**

Turning, Welding, Leyland & Tata Hubs, Hosing Gullas, Hydrolic Press & all other kinds of manufacturing works.

140/B, Shivajinagar, Near PMC Building, Pune 411 005

# लोकप्रिय साहित्य

**कल्पना रणपिसे**
द्वि. वर्ष कला

'साहित्य' हा शब्द जरी कानी पडला ना, तरी देखील ती एखादी वस्तू असल्याचेच जाणवते. परंतु तसे नाही हं !

साहित्य हे एक अभ्यास क्षेत्र आहे. याचे स्वरूप अत्यंत विस्तृत व व्यापक आहे. साहित्यातून मानवी मनाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला जातो. 'माणूस' हा देखील साहित्यातूनच घडत असल्याचे जाणवते. 'मानवाची' घडण देखील साहित्यातूनच होत असते. मानवी जीवनमूल्यांना जे स्थान प्राप्त होत असते ते देखील साहित्यातूनच. लेखक व वाचक हे दोघेहीं आपला विकास साधण्याचा प्रयत्न हा साहित्यातूनच करीत असतात.

साहित्याच्या विविध अंगानी व विविध प्रकारांनी तसेच समीक्षात्मक, टीकात्मक, रचनात्मक अशा अनेक अंगांनी साहित्याचा अभ्यास होऊ शकतो. याचबरोबर विनोद, लालित्य, काव्य हीसुद्धा त्यांची प्रमुख क्षेत्रे आहेत असे मानता येईल. 'साहित्य' हे एकंदरीत सर्वसमान जीवनाचा वेध घेत असते. त्यामुळेच 'साहित्य' समाजाचा 'आरसा' आहे असे मानता येईल. लेखकाची व वाचकांची अनेक प्रकारची उद्दिष्टे 'साहित्य' लेखनामागे असू शकतात. उदा. वाचकांचे प्रयोजन यामुळे ज्ञान, आनंदप्राप्ती, उद्बोधन, मनोरंजन इत्यादी प्रकारची कौशल्य प्राप्त होतात. याचबरोबर लेखक आपल्या मनातील दडलेल्या भावनांचा उद्रेक साहित्यातून करत असतो व त्यातूनच 'साहित्यकृती' आकार घेत असते. साहित्याची शब्दशः व्याख्या करता येणे अत्यंत कठीण आहे. साहित्य हे मनाला हवं-हवसं वाटतं. कारण त्यातील उत्कंठा कधीच संपत नाही.

'व्यक्ती तितक्या प्रवृत्ती' या उक्तीप्रमाणे प्रत्येक वाचकाचा साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण हा वेगळा असतो. लोकप्रिय साहित्याचा विचार करता प्रत्येक व्यक्ती आपल्या व्यक्तिमत्त्वानुसार साहित्याकडे पाहात असते. जे सर्वांना हवंहवसं वाटत असतं ते लोकप्रिय साहित्य होय. उदा. रामायण. महाभारत, मृत्युंजय. रणजित देसाईंची 'स्वामी' कादंबरी इ.

लोकप्रिय साहित्यात अनेक चांगल्या गुणांचा अविष्कार असणे आवश्यक आहे. ते अश्लिल, ओंगळ, पसरट नसणे. थोडक्यात पण आटोपशीर समृद्ध भाषाशैली, कल्पकता, वास्तवता, अफाटही असू नये. अति वास्तव व कल्पकही नसावी. साहित्याची गोडी अवीट असणे आवश्यक की जेणे करून वाचकाला त्या साहित्यकृतीबद्दल सतत कुतुहल निर्माण व्हावे. त्यामध्ये रंजकता असावी. मानवी जीवनमूल्यांना आव्हान असावे. इत्यादी गुणांचा परिपोष लोकप्रिय साहित्यात असावा.

वाचक म्हटले की वाचकांच्या मनाची सहृदयता निरनिराळी असल्याचेच जाणवते. शारीरिक व भावनिक या तीन पातळीतून तो साहित्याचा आस्वाद घेत असतो. कोणा वाचकाचा 'ऐतिहासिक' कादंबरीकडे तर कोणा वाचकाचा कल सामाजिक कादंबरीकडे मोठ्या प्रमाणात असतो. तर काही वाचक आत्म-

चरित्राकडे आकर्षित झाल्याचे दिसून येते. उदा. मी दुर्गा खोटे. सांजवात, सांगते ऐका, स्मृतिचित्रे. आमची अकरा वर्षे, उषःकाल, दुर्दैवी रंगू, गावकी, आठवणीचे पक्षी, तराळ–अंतराळ इत्यादी पुस्तके वाचक वाचीत असतो.

ही पुस्तके पाहिल्यास साहित्य हे समाजासाठीच असल्याचे जाणवते. तसेच साहित्य आणि समाज यांचा अन्योन्य संबंध असल्याचे दिसून येते. समाजाचे प्रतिबिंब साहित्यात उलगडत असते. व्यक्तीपेक्षा समाजाच्या आवडी निवडी ओळखून साहित्य लिहिले जाणे आवश्यक आहे. कारण समाजात काही व्यक्ती अशा आढळून येतात की त्यांना अश्लील साहित्य मोठ्या प्रमाणात आवडते. त्यासाठी सर्वच लेखकांनी अश्लील लिहिता कामा नये. समाजातील बहुसंख्य वाचकांच्या आवडी निवडी ओळखून साहित्य लिहिले गेले पाहिजे. कारण लोकप्रिय वाङ्मय हे आशयन्वाङ्मय आहे.

ग्रामीण भागातील वाचक निरक्षर असतात. त्यांना तमाशा, लावणी यासारखे वाङ्मयप्रकार आवडतात. सर्वसामान्य वाचकांना हलकी फुलकी कथा, कादंबरी, नाटके आवडतात तर कित्येक वाचकांना गंभीर पुस्तके आवडतात. त्यामुळेच समाजात जे स्तर आहेत त्यानुसार समाजातील लोकांच्या आवडी निवडी बदलत जातात. सर्वात जास्त प्रभाण हे नाटक हा दृश्य स्वरूपाचा वाङ्मयप्रकार सर्वांना आवडतो. पूर्वी अद्‌भुतरम्य वाङ्मय वाचकांना आवडत असे. अशाप्रकारे काळाच्या गरजेनुसार साहित्याची निर्मिती होत असते. म्हणूनच लोकप्रिय साहित्य ठरविताना काळाचा विचार करणे, तसेच सामाजिक परिवर्तनाचा विचार करणे आवश्यक आहे. ऐतिहासिक कादंबऱ्या हा देखील वाङ्मयप्रकार पूर्वी लोकप्रिय असल्याचे जाणवते. लोकप्रियता ही समाजाची असते. व्यक्तीची नसते. त्यामुळे साहित्याची लोकप्रियता ही व्यक्तीची नसून संपूर्ण समाजाची आहे. यामुळेच कोणते साहित्य हे लोकप्रिय साहित्य आहे हे नक्की सांगता येणार नाही.

कोणास कोणते साहित्य आवडते तर कोणास कोणते ! प्रत्येकाची गती, रूची, जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण निराळा असल्यामुळे लोकप्रिय साहित्य शिक्कामोर्तब करणे कठीण आहे. पण तरी सुद्धा ज्ञानेश्वरी, रामायण, महाभारत यासारखे वैभवकुशलच. पु. ल. देशपांडे यांचे विनोदी साहित्य, शिरवाडकरांची 'नटसम्राट' सारखी नाटके तर रा. भि. जोशींची वैचारिक प्रवासवर्णने, कुसुमाग्रजांच्या कविता हे साहित्य सर्वानुमते लोकप्रिय (अपवाद) होण्याची खूप शक्यता आहे. ●


निवास फोन : ३९७५४९, ६८३९९७, ६८२५७५

विनंती फोन : २६४८७४, २६६९२९, २६८६५१

**मे. कोकाटे आणि कंपनी**

**मे. सुभाषचंद्र रमेशचंद्र आणि कंपनी**

**गंगाराम कोकाटे आणि कंपनी**

• **जनरल फ्रूट मर्चंट व कमिशन एजंट**

म. ज्योतिबा फुले मार्केट, मुंबई ४०० ००१

# ॲलर्जी

**विनोद दशरथ कंक**
प्रथम वर्ष शास्त्र विभाग 'अ'

कुणाला कशाची ॲलर्जी असेल, सांगता येत नाही. एकाला धुळीची तर दुसऱ्याला धुराची. एखाद्याला गाजरगवताची तर दुसऱ्याला कॉंग्रेसगवताची. मला मात्र एकाच गोष्टीची ॲलर्जी आहे आणि ती म्हणजे गणिताची.

पहिल्यापासून गणिताचे व माझे साप आणि मुंगुसा-सारखे सख्य आहे पाढ्यांनी लहान वयातच गणिताची सौम्यशी विषारीमात्रा देण्यास सुरुवात केली आमच्या लहानपणी पाढे नावाचा प्रकार अस्तित्वात होता. त्यांना विशिष्ट चाल होती, ताल होता. त्यांच्याबाबतीत मी केलेल्या चालढकलीमुळे व्यवहारात अडणारी गाडी ढकलण्यासाठी मला घडोघडी मदतनीस शोधावा लागे. संध्याकाळी परवचा म्हणताना पाढे हे भीमरुपी आणि रामरक्षा यांच्याबरोबर रगडले जात. कंटाळा आला की मी पाढे शिट्टीवर म्हणत असे. 'शिट्टीवर पाढे म्हटले तर जन्मभर शिट्ट्या फुंकण्याची पाळी येईल.' असे आई रागावून म्हटल्याचे आठवते. पाढ्यांऐवजी दोनदा भीमरूपी म्हणण्याची माझी सदैव तयारी असे. पण त्याला आईची कधीच परवानगी नसे. बोटे मोडून बेरजा-वजाबाक्या करायला केव्हा शिकलो ते आठवत नाही, लहानपणी बेरजा-वजाबाक्या फार तर गुणाकार आवडत असत पण भागाकार म्हटल्यावर भाज्य, भाजक, भागाकार ह्या त्रिपुटीच्या शाब्दिक गोंधळामुळे 'भागाकार चुकणे' एवढीच बाकी शिल्लक राहायची. त्यात आजचे सर गणित अवघड करून सांगण्यात पटा-ईत. फळ्यावर गणित सोडविताना ते खडूपेक्षाही डस्टरचा वापरच जास्त करीत. त्यामुळे होणारी वही-तील खाडाखोड पाहून गणिताबद्दल मनात दहशतवादी भीषण वातावरण निर्माण होण्यास फारसा काळ लागला नाही. हायस्कूलमध्ये गेल्यावर माझे आणि गणिताचे नाते जास्त चांगले स्पष्ट झाले गणिताचा तास आला की मला जांभयांची आठवण होई. पुढच्या बाकावरून हळूच माझे मागच्या बाकांवर स्थलांतर होई. कारण सर सारखे मधून मधून प्रश्न विचारत असे. प्रश्न विचारत असताना मी पुढच्या मुलाच्या मागे दडी मारून बसत असे. गणिताचा बहुतेक सर्व तास माझा लपालपीतच जाई. आठव्या इयत्तेत बीजगणित नामक एक भुत गणितात शिरले. त्याची बाधा मला फारच असह्य झाली. रहस्यकथेतील काळा सुट, गॉगल आणि हातात पिस्तुल घेऊन सतत पाठलाग करणारी जशी एखादी गूढ व्यक्ती असते तसा बीजगणितातल्या 'क्ष'ने माझा पाठपुरावा केला. त्या 'क्ष'शी माझे क्षणभरही पटले नाही. तो सदैव माझ्या वाकड्यात वागायचा. त्याचा सख्खा भाऊ 'य' तोही तसलाच. त्यांच्याशी युद्ध करताना माझे बळ कमी पडत असे. माझ्यापुढे एकच यक्षप्रश्न उभा राही. गणितात पास कसे व्हायचे? माझ्या प्रगतीपुस्तकावर लाल रेघ उठविण्याचे श्रेय फक्त हाच विषय घेत होता. प्रगती पुस्तकावरील एका लाल रेषेला माझ्या गालावर पाच लाल रेषा असे प्रमाण माझ्या वडिलांनी ठरवून ठेवलेले

होते. इतिहासाच्या तासाला सरांचे 'सिकंदर आणि पुरु' यांच्यातील लढाईचे रसभरीत वर्णन ऐकता–एकता मध्येच दुष्ट घंटेचा टोल पडे, आणि एकदम विरस होई. त्यापेक्षाही त्यानंतर गणिताचा तास असणे यापेक्षाही दुसरी कठोर शिक्षा कोणती? गणिताचा तास म्हटलं की मला एकदम मरगळ येई. पण मास्तर टवटवीत आणि ताजेतवाने असत. माझ्या डोळ्यासमोर सिकंदर आणि पुरु असतानाच द्विचल समीकरणाने फळा व्यापून जाई. सरांनी सोडविलेले गणित जसेच्या तसे वहीत उतरवून घेण्याची मेहनत मी प्रामाणिकपणाने करीत असे पण त्रिपदी सोडविण्यास दिली असता शेजाऱ्याच्या वहीत डोकावण्याची खटपट करावी लागे तेवढीच भूमिती ही बीजगणिताचीच बहीण. तिने माझ्याशी परस्पर विरोधी कोन साधला. अंकगणित हाही माझा हाडवैरीच होता. सुरुवातीला एखादे गणित सोडविले की गणित विषय जमू लागलाय असे वाटे; पण थोड्याच वेळात भ्रमनिरास करण्याचे काम पुढील मंडळी करीत असत. एखाद्या संग्रहातील सर्व गणिते सोडविता आली आहेत असे एकदाही घडल्याचे आठवत नाही. ल. सा. वि. व म. सा. वि. हे गणित रुपी लंकेच्या दारात उभे केलेले महाराक्षसच वाटत. उत्तरे असणारी शेवटची पाने वरचेवर पाहून पाहून पुस्तकाला तेथे घडी पडलेली असे. गणित सोडविताना मी हळूच 'उत्तरे' सदरात डोकावित असे. त्यामुळे वार्षिक परिक्षेच्या आधीच एक–एक पान गहाळ होत असे मग ती पाने सापडवून प्रगती पुस्तकापेक्षाही नीट जपावी लागत असे. एखाद्या अवघड गणिताचे उत्तर बरोबर निघाल्यावर वाघाची शिकार करणाऱ्या शिकाऱ्याचे तेज चेहऱ्यावर ओसंडत असे; पण लगेच पुढचं गणित अडायचं. टांग मारल्यावर सायकलची चेन पडावी तसा प्रकार होई. गणिताचा पेपर असेल त्या दिवशी माझ्या घशाखाली अन्न उतरण्यास राजी नसे. डोके दुखणे किंवा गरगरणे असली किरकोळ दुखणी मला 'अनफिट' असल्याचे दाखविण्यास उपयोगी पडत. गणिताच्या पेपरच्या दिवशी परीक्षेला निघताना मी घरापासूनच दिसेल त्या मोठ्या माणसाला वाकून नमस्कार करीत निघे गणिताच्या पेपरमध्ये खोलीचे मोजमाप देऊन दर चौरसाला एक रुपया वीस पैसे याप्रमाणे चार भिंतींना किती खर्च येईल? असली काही गणितं असत. त्याचे उत्तर रंगाऱ्याला जाऊन विचारा एवढंच माझ्या मनात चमकून जाई, पण सरांचे रोखलेले डोळे पाहिल्यावर मी काहीतरी खाडाखोडीसाठी आपली मान उत्तरपत्रिकेत खुपसत असे. सरासरी काढणे ही मला नस्ती उठाठेवच वाटे.

बीजगणितातील घातांक माझा अगदी अंत पाहत असे. वर्ग घनापर्यंत ठीक होते, पण चतुर्थ घात आणि पंचमघात म्हटलं की माझा घात होत असे. लहानपणापासून माझ्या कानावर नाट्यसंगीत पडे. ती नाटकातील पदे मला आवडत असे परंतु बीजगणितातील बैजिक पदे जेव्हा माझ्या आयुष्यात शिरली तेव्हापासून नुसतं पदे म्हटलं तरी मला भीती वाटते. भूमितीतल्या वर्तुळाशी माझी पहिल्यापासून गट्टी असे. त्रिज्या आणि व्यास यांच्यामध्ये दुपटीचे नाते असते हे मला ठाऊक होते. पण मधेच कुठेतरी 'जीवा' आली की माझ्या जीवाला कासावीस झाल्यासारखे वाटे कंपासपेटीतील गुण्या माझ्याशी कधीही गुण्यागोविंदाने वागला नाही. परीक्षेच्या वेळी माझ्या कंपासपेटीत शनिवारचा मारुतीचा प्रसाद, अंगाऱ्याची पुडी, तुळशीची पाने असत. एरवी मात्र चिंचोके, कवड्या, चिंचा, आवळे, छाप असलेली पोष्टाची तिकिटे असल्या गोष्टी सुखाने वास्तव्य करीत असत. एकदा तर गणिताच्या सरांनी मी पोष्टाची तिकिटे पाहात होते म्हणून माझ्या पाठीवर छडीने तीन समांतर रेषा काढल्या होत्या. पण हेच सर शाळा सुटल्यावर आमच्या 'स्काउट'मध्ये असायचे तेव्हा त्यांच्या हातात छडीऐवजी 'फ्लूट' येई व जिभेवर 'लंब–कर्ण' असले महाभयंकर शब्द विरघळून ओठांवर मधूर संगीत येई. त्यावेळी ते मला आवडत असत. ●

# 'आनंद' : एक आनंद

**ज्योत्स्ना रमेशचंद्र शिदीड**
तृतीय वर्ष वाणिज्य 'ड'

'जिंदगी कैसी ये पहेली हाए... कभी तो हँसाए, कभी ये रूलाए...'

खरोखर जिंदगी–मानवी जीवन ही एक पहेलीच नाही का ? ते न सुटणारं शाश्वत कोडं आहे. आयुष्य हे सुखदुःखाच्या पाठ–शिवणीचा खेळ आहे. जीवनात स्वप्न पहाण्याचा आनंद आहे आणि स्वप्नभंगामुळे होणारा विषादही ! 'एक दिन सपनोंका राही, चला जाए सपनों के आगे कहाँ ?'

आनंद सेहेगल ! 'आनंद' मधील एक जीतंजागतं, आनंदी व्यक्तिमत्त्व ! स्वतः दुःखी असून इतरांना आनंद देणारा हा असा हास्याचा अखंड झरा पाहून मी अतिशय भारावून गेले. तो आपली मौत जीते जी पहात होता, प्रत्येक क्षणी मृत्यूचे सावट भेंडसावत होते त्याला, आणि तरीही 'अपनी जिंदगी बडी नहीं लेकिन वह बहुत लंबी है' असं तो हसत सांगत होता आणि मी माझ्या अश्रूंना बांध घालू शकत नव्हते. जीवन हे सदैव पेटलेलं यज्ञकुंड आहे. त्या यज्ञकुंडात हसत हसत आनंदाने आहुती जाणे एवढेच समिधांना माहिती असते, त्या एवढेच जाणत असतात. आलेल्या व येणाऱ्या प्रत्येक क्षणाचा पुरेपूर उपभोग घेणे, प्रत्येक नवीन क्षण आनंदमय कसा होईल एवढेच तो पाहत होता. त्याच्या न्याच्या आयुष्याबद्दल काळजी नव्हती, मृत्यूबद्दल विषाद नव्हता. दुःखी जीवनाबद्दल खेद नव्हता तर होती फक्त उर्वरित जीवनाविषयी एक अनामिक ओढ, विलक्षण औत्सुक्य आणि अभिमान.

'मेरे शरीर को नहीं, मन को आशिर्वाद दिजिए' अशी तो विनवणी करत होता. 'मैं ऐसा भी नहीं कह सकता कि मेरी बहन को मेरी उमर लग जाए' असं तो म्हटला आणि माझ्या अंगावर सर्रकन काटा आला. माझं उरलेलं आयुष्य आनंदात जाऊ दे एवढीच त्याची इच्छा होती. दुःखाच्या पिंजऱ्यात स्वतःला बंदिवान न करता आपले पंख पसरून विशाल आकाशात जबरदस्त इच्छा मनात होती, दुःखीरूपी काट्यांनी व्यापलेल्या जीवनाला हिरवळीची, आनंदरूपी हिरवळीची झालर लावू पहात होता. जीवनरूपी वृक्षाला शिशिराची झळ लागली नव्हती, उत्साहाची पालवी गळून पडली नव्हती– उत्साहाला अगदी बहर आला होता, वसंत ऋतूचा !

'है मीठी उलझन बैरी अपना मन अपना ही होके सहे दर्द पराए' असं म्हणत दुःख लपवत होता. फक्त आनंदाचा कुंभच रिता करीत होता. 'मेरा आनंद तुम्हारे लिए है लेकिन दुःख SELFISH हैं' असं पुन्हा पुन्हा सांगत होता. त्याचे हास्य हृदयाला पाझर फोडत होतं. असं वाटत होतं की, धावत पडद्यावर जावं आणि म्हणावं, 'तू असा हसत जाऊ नकोस मग आम्हालाही रडू आवरत नाही !'

आनंद सगळ्यांना अधिकच हवासा वाटत होता, परतु दैव त्याला दूर दूर नेत होतं. कॅन्सरने त्याला पछाडले होते. माणसाने ओठाशी नेलेला अमृताचा प्याला नियतीला अनेकदा पहावत नाही. चेटकिणी-

सारखी ती अचानक प्रगट होते व क्षणार्धात तो ध्याला भोवतालच्या धुळीत उधळून देते. असा अनमोल हिरा आपल्याजवळ असावा असे देवाच्या मनात आल्यावाचून कसे राहील ? विश्वशक्तीपुढे आपण सारे तसेच आहोत. जन्म हे परमशक्तीचं वत्सल स्मित आहे अन् मृत्यू ही तिची राग व्यक्त करण्याची रीत आहे. या शक्तीची कृपा व कोप यांचा आपण नतमस्तक होऊन स्वीकार केलाच पाहिजे.

आणि म्हणूनच दुःख देऊन आनंद निघून गेला कधीच न परतण्यासाठी ! त्याने 'बाबूमोशायऽ' म्हणून हंबरडा फोडला आणि माझे डोळे ओसंडून वाहू लागले. अंधारात डोळे पुसत मी स्वतःशीच म्हणाले, 'हमने तुम्हारे जैसा एक भी नहीं देखा है आनंद...' 'काश... मेरी नजर आपको मिल जाती तो!' ●


सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याची

**रुपी को-ऑप. बँक लि.**

**मुख्य कचेरी : ३५३/१ नारायण पेठ, लक्ष्मी रोड, पुणे-३०**

आपला हात जगन्नाथ
कर्तृत्वाच्या जोरावर जग जिंकतो सिकंदर
असतील दोन समर्थ हात
तर दैवही देते उत्तम साथ
तुमच्या हाती सगळे काही, संपन्न भविष्याची ग्वाही
तुम्हीच कमवा, तुम्हीच जमवा, रुपीच्या ओंजळीत ठेवा.
जमलेले सांभाळणे, सांभाळून वाढवणे
परस्परांच्या विश्वासावर उंच उंच झेप घेणे
यासाठीच तुम्ही-आम्ही एकत्र यायचे
पुणे शहर व जिल्ह्यात १४ शाखा

नियोजित शाखा १) गिरगाव-मुंबई २) भोसरी-पुणे

# सती–एक धार्मिक पण अमानुष चाल

**लीला ढवळे**
बारावी वाणिज्य

राजस्थानमध्यें देवराला या गावी राहणाऱ्या रुपकुवँरची सती गेल्याची बातमी वाचली आणि मन शहारले. अंगावर रोमांच उभे राहिले. एका अठरा वर्षांच्या स्त्रीने स्वतःला पतीबरोबर आगीत लोटले होते. किती भयानक प्रकार आहे हा! किती अंधश्रद्धा! किती परस्वाधीनता! म्हणजे एकूणच स्त्री ही 'अबला' आहे, पुरुषांवर अवलंबून आहे, पुरुषाच्या आधाराविना, सहाय्याविना ती जगू शकत नाही हे दाखविण्याचाच हा प्रकार झाला आहे.

एकणच भारतीय पुरुषप्रधान संस्कृतीत पूर्वीपासून स्त्रीला दुय्यम स्थान आहे. पुरुषापेक्षा तिला कमी लेखले जाते. पुरुषांची 'दासी' मानले जाते. अनेक बंधनांच्या बेड्या तिच्या पायात आहेत, जबाबदाऱ्याच्या ओझ्याखाली ती दबली गेली आहे. तिने कर्तव्य पूर्ण केले की नाही याकडे काटेकोरपणे पाहतात, पण तिला पूर्ण हक्क मिळत नाही. एवढे कमी की काय म्हणून या पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रियांसाठी अनेक क्रूर, जालीम अमानुष अशा पद्धती निर्माण केल्यात. पतीबरोबर सती जाणे, विधवा बनल्यावर केशवपन करणे, अशा अनेक पद्धती आहेत. पण त्यातील 'सती' जाणे ही पद्धत अत्यंत अमानुष आहे.

सती या शब्दाचा मूळ अर्थ म्हणजे साध्वी, पतिव्रता, धर्मशील, सद्वर्तनी, सत्यव्रत स्त्री, पतीशी एकनिष्ठ असलेली स्त्री. पण आजकाल 'सती' या शब्दाचा रुढ झालेला अर्थ म्हणजे, 'पतीच्या चितेवर स्वतःहून भक्तीने व श्रद्धेने अर्पण करणे.' भारतात प्राचीन काळी ही पद्धत नव्हती, पण पुढे ती हळूहळू रूढ झाली व या प्रथेला धर्ममान्यताही मिळाली व मग 'धार्मिक कर्तव्य' म्हणून इ. स. ८०० ते १००० च्या सुमारास ते पाळले जाऊ लागले. यातील मुख्यविधी पतीबरोबर सहगमन एवढाच होता. जाणारी स्त्री ही आपल्या निस्सीम भक्तीने व प्रेमाने चितेवर पतीबरोबर सहगमन करते म्हणून ती आदरणीय ठरली. याला विरोध तर सर्वस्वी त्याज्य.

पूर्वी ही चाल अमेरिकन इंडियन्स, चीन, बालीबेटे, नायजेरिया वगैरे टोळयात प्रचलित होती. पण भारतात आर्यांत ती नव्हती. पण पुढे ती भारतात आली. इ. स. ३१६ मध्ये इराणमधील युद्धात एक भारतीय केटियस नावाचा सेनापती मेल्यावर त्याची पत्नी सती गेली हाच सतीचा पहिला ऐतिहासिक पुरावा. भारतात ही चाल काश्मीर, पंजाब, बंगाल, महाराष्ट्र आणि राजस्थान सर्वीकडे पसरली होती. एकदा ती एक 'दिव्य चाल' आहे असे ठरविल्यावर, व तिचे 'धार्मिक कर्तव्य' म्हणून उदात्तीकरण झाल्यावर तिच्या मदतीचा पुरस्कार करणारे तत्त्वज्ञान निर्माण झाले. इ. स. १००० च्या सुमारास ब्राह्मणांनीसुद्धा या चालीचा पुरस्कार केला, त्यामुळे ती मुळीच निषिद्ध मानली गेली नाही. सर्वीकडे मग ती सर्रासपणे 'धार्मिक कर्तव्याच्या' नावाखाली पाळली जाऊ लागली.

'हारित' या चालीचे उदात्तीकरण म्हणतो की,

' चितारोहणामुळे सती आपल्या पतीला नरकातून बाहेर खेचून काढते, पतीला पापातून मुक्त करते व स्वर्गात नेते. ही सती स्त्री आपल्या तीन घराण्यांना मुक्त करते. पहिले आईचे, दुसरे वडिलांचे, तिसरे पतीचे, ही सती स्त्री पतीला पापातून मुक्त तर करतेच शिवाय हे पती-पत्नी ३ कोटी वर्षे स्वर्गात सुखासमाधानाने जगतात व अशी स्त्री राजवंशात जन्म घेते.'

तर 'पाराशर' म्हणतो की, 'गारुडी पुंगी वाजवून सापाला जसे बिळातून बाहेर खेचून काढतो तशी पतिव्रता स्त्री पतीला नरकातून बाहेर खेचते व स्वर्गात नेते, पापमुक्त करते.'

तसे म्हटले तर ही चाल म्हणजे त्या काळच्या स्त्रियांची जुलमांपासून, अत्याचारापासून सुटका होती. विधवा होऊन जगणे म्हणजे निव्वळ नरकवास होता. कारण विधवा हे अशुभतेचे प्रतीक मानले जाई. मग तिला हीन, तुच्छतापूर्वक अशी वागणूक दिली जाई. तिचे दर्शन हे अशुभ समजले जाई. विधवा झाल्यावर तिला काळेकपडे धारण करावे लागे, केशवपन करावे लागे, दिवसभर कोठडीत ती बंद असे कोणत्याही मंगल समारंभात ती जाऊ शकत नसे. जनावरांपेक्षाही बदत्तर अशी जिंदगी तिच्या वाटचाला होती. त्यातून 'सती' ही सुटका होती. म्हणून काही स्त्रिया खुषीने सती जात. पण पुढे स्त्रिया तयार होईनात. तेव्हा क्रूरपणे त्यांना चितेत ढकलले जाई, नाहीतर चितेलाच बांधले जाई. चितेत बसणाऱ्या चटक्याने तिच्या ज्या प्राणांतिक किंकाळया उमटत त्या ऐकू येऊ नयेत यासाठी जोरजोराने ढोल बडविला जाई. तेव्हापासून या चालीला क्रूर, विकृत, रानटी असे स्वरूप प्राप्त झाले.

सूत्रकार व स्मृतीकार, हारित, पाराशर, वैखानस, सांख्य, अंगिरस यांनी जरी ही चाल आदर्श, चांगली मानली तरी स्मृतिचंद्रिकेने ह्या भयानक चालीचा तीव्र निषेध केला. कादंबरीकार बाणभट्ट ह्या चालीचा निषेध करताना म्हणतो की, 'अज्ञानी लोक अशा मार्गाने जातात, अमानुषतेचे प्रतीक आहे, अविचारी कृत्य आहे, निष्काळजीपणाचा असीम नमुना आहे व मूर्खतेचा कळस आहे.'

खरोखरच ही पद्धत म्हणजे मूर्खतेचा कळस आहे. त्यामुळे अनेक प्रश्न उभे राहतात. पतीचे निधन झाल्यावर स्वतःचे अस्तित्व मिटवायचे ही कसली पतिव्रतेची कसोटी ? शिवाय हे बंधन स्त्रियांवरच का ? पुरुष हे का लगेच मुंडावळ्या बांधतात ? असे अनेक प्रश्न उद्‌भवतात.

विचाराअंती अलबुकर्कचे यांनी इ. स. १८५० मध्ये गोव्यातून हीं चाल बंद केली. शीख गुरुरामदासही ह्या चालीच्या विरुद्ध होता. अकबरही या चालीच्या खिलाफ होता. त्याने ही चाल बंद केली. पण ती त्याने ऐच्छिक ठरविली. म्हणजे इच्छेनुसार सती जायचे, सक्ती नाही. तरीही राजस्थान व बंगालमध्ये मोठ्या प्रमाणात स्त्रिया सती जात. तेव्हा राजाराम मोहन रॉयने या चालीविरूद्ध बंड पुकारले. पुढे बेंटिंगने इ. स. १८२९ मध्ये ती बेकायदेशीर ठरवून तिचे उच्चाटन केले, तरी पण इ. स. १८८१ पर्यंत राजपुत स्त्रिया सती जातच होत्या.

आज एकविसाव्या शतकाकडे आपली वाटचाल चालली आहे. आज 'चूल व मूल' ही चौकट स्त्रीने केव्हाच पार पाडली आहे. आज सर्व क्षेत्रात स्त्री अग्रेसर आहे, प्रत्येक क्षेत्रात तिने पदार्पण केले आहे, आपले प्रभुत्व ती प्रस्थापित करत आहे. शिक्षण, खेळ, साहित्य, नोकऱ्या तसेच विविध कला तिने साध्य केल्या आहेत. स्त्रियांना समान हक्क मिळावेत, बंधनांना त्यांनी झुगारून द्यावे, माणूस म्हणून तिला समान हक्क मिळावा म्हणून अनेक मंडळे, संस्था स्थापन झाल्या आहेत. मोठ्या प्रमाणात त्यांच्या या प्रयत्नांना यशही मिळालेय. पण नुकत्याच घडलेल्या या प्रकाराने ह्या संस्थांना प्रत्येक पाऊल काळजीपूर्वक उचलावे लागणार आहे. कारण स्त्रीला पुरुषाबरोबर समान हक्क मिळावेत. 'अबला' म्हणून तिला जे स्थान आहे, त्याऐवजी तिला सर्व समानहक्क मिळावते असे प्रयत्न चालू असतानाच एका स्त्रीने पतीच्या चितेत स्वतःला लोटून दिले. म्हणजे पुरुषांविना जीवनाला अर्थ नाही, महत्त्व नाही, स्त्रीही परावलंबी आहे. पुरुषाविना तिचे अस्तित्व टिकू शकत नाही, हे दाखविणाऱ्याचा हा प्रकार आहे.

राजस्थानमधील देवराला या खेडेगावातील हा प्रकार म्हणजे त्या क्रूर, अमानुष, भयानक अशा चालीने डोके वर काढण्याचा झालेला प्रयत्न आहे. एकदा जी गोष्ट त्याज्य, निषिद्ध, अयोग्य मानले गेले, जी धार्मिक, सामाजिक कीड मारली गेली, तिचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न करणे हे प्रगत–विज्ञानाच्या जगात निंद्य आहे. त्यामुळे या ताज्या घटनेशी ज्यांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष हात आहे त्यांना शासन व्हायलाच हवे. ह्या सामाजिक व धार्मिक जीवन कलंकित करणाऱ्या व स्त्रियांचे जीवनाला काडीमोल किंमत देणाऱ्या प्रथेला आपण मूठमाती देऊ तोच सुदिन. ●

# मृत्यू नसता तर

ज्योती प्र. देशपांडे
प्रथम वर्ष, शास्त्र 'ब'

मृत्यू नसता तर ! ही कल्पनाच किती भयंकर आहे नाही ? हे जर समजा सत्यात उतरले तर या जगात काय काय घडेल हे सांगणे सुद्धा कठीणच आहे. पण नुसती कल्पना करायला काय हरकत आहे.

या संसारातील मायामोहामुळे आपल्याला जगायला आवडते, आपण मृत्यू या शब्दामुळेच भयभीत होतो. पण जर गंभीरपणे जर याचा विचार केला तर खरंच हे किती कल्पनेच्या बाहेर आहे. गीतेत म्हटलं आहे 'जातस्य हि ध्रुवो मृत्युः', जो जन्म घेतो त्याचा मृत्यू निश्चितच आहे. निसर्गाचा हा नियमच आहे.

पण खरंच मृत्यू नसता तर ? तर काय मजा येईल नाही ? आपल्या प्रियजनांचा विरह आपल्याला सहन करावा लागणार नाही. कोणतेही धाडसाचे काम करताना मृत्यूशी भीती वाटणार नाही. मग एव्हरेस्टच काय पण अनेक मोठमोठें शिखर चढायला सुद्धा भीती वाटणार नाही. आणि हा मृत्यूच नसता तर भूतकाळातील गोष्टी इतिहासजमा होणार नाहीत. कारण शंभर, दोनशे वर्षापूर्वी घडलेल्या गोष्टीची सत्यासत्यता पाहण्यासाठी कागदपत्रे चाळावी लागणार नाहीत. तर त्या त्या गोष्टी पाहिलेली माणसेच जिवंत असतील. मग प्रेताच्या सामानांची दुकाने लागणार नाहीत. इतकेच काय आज विविध धर्मियांची जी मोठी मोठी स्मशाने आहेत ती बंद करून तेथे उद्याने उभी राहतील, इमारती उभ्या राहतील, श्राद्ध, पक्ष, बारावे, तेरावे हे विधी करण्याची वेळच येणार नाही. त्यामुळे ती कामे करणारे लोक बेकार होतील. पृथ्वीवर काही वर्षानंतर तीळाएवढी सुद्धा जागा राहणार नाही. पृथ्वीवर पाण्यात लोक राहतातच पण आकाशात सुद्धा निवास करायला लागतील. अन्न, वस्त्र, आणि निवारा यांच्या समस्या मनुष्याच्यापुढे उभ्या राहतील आणि शेवटी मनुष्य मृत्यू हवा म्हणून देवाकडे प्रार्थना करेल.

मृत्यू जर नसता तर माणूस अमर होईल, पण अजर होणार नाही असे नाही. त्याला ठराविक वयाला वार्धक्य अवस्था प्राप्त होईल आणि मग ते म्हातारपण कधीच न संपणारे ठरेल. जसजसे वय वाढेल तसतशी गात्रे थकतील. त्याला दिसेनासे होईल, ऐकू येणार नाही, हात पाय काम करू शकणार नाहीत, दात गळून पडतील आणि मग ही सगळी अवस्था झाल्यावर सगळे म्हातारे लोक 'पांडुरंगा, नको रे बाबा हे जीवन, सोडव लवकर यातून' अशी याचना करताना दिसतील. तो आजारी पडणार नाही असे नाही. मग या रोगांशी लढता लढता तो मेटाकुटीला येईल. काही असाध्य रोगांची बाधा झाली तर त्याची अवस्था अश्वत्थामासारखी होईल. अश्वत्थामाला चिरंजीवत्व प्राप्त झाले होते, परंतु त्याच्या मस्तकावरची जखम बरीच होत नव्हती. तेव्हा त्या वेदना असहाय्य होऊन तो मरणाला शोधत हिंडत होता. अशीच अवस्था मृत्यू नसता तर सर्व माणसांची झाली असती.

मृत्यूच नसता तर डॉक्टरांना सुद्धा कोणी विचारले नसते. त्यांची ती केवढी मोठी फी वाचली असती.

आणि त्यांचे ते खेकसून बोलणे सुद्धा आपल्याला ऐकून ध्यावे लागले नसते. गरीब लोकांना त्यांची न परवडणारी फी भरावी लागली नसती. आणि गंमत म्हणजे सगळीकडे म्हातारे लोक दृष्टीस पडले असते आणि त्यांनी कॉटवर पडल्या पडल्या सूनांवर, नातवांवर आणि मुलांवर हुकूम गाजवला असता. आपल्याला हवा हवासा वाटणारा आजी–आजोबांचा सहवास कायमचा लाभला असता. मृत्यू नसता तर स्मशान, दफन हे शब्द सुद्धा तोंडातून आले नसते. भूतांचा सुद्धा सुळसुळाट झाला नसता आणि मुख्य म्हणजे आपल्याला त्यांची भीती जी वाटते ती कायमची गेली असती, मग आपण अंधारात जायला सुद्धा कधीच घाबरलो नसतो. आणि ज्योतिषाला 'माझे आयुष्य किती आहे?' हे विचारायला सुद्धा गेलो नसतो.

मृत्यू नसता तर राजकीय आणि सामाजिक स्थितीवर सुद्धा प्रभाव पडला असता. इतिहास लिहिण्याची आवश्यकताच नसती आणि मुख्य म्हणजे इतिहास या विषयाचा अभ्यास सुद्धा करायला लागला नसता· तेवढाच एक विषय तरी कमी झाला असता. आणि गांधी नेहरू, लालबहादूर शास्त्री यासारखे महापुरुष आपण आपल्या डोळ्यांनी पाहू शकलो असतो. आणि हे जे बलिदान करणारे लोक आहेत त्यांच्या गोष्टी सुद्धा नाहीशा झाल्या असत्या. गौतम बुद्धाचे मोहक रूप आपल्याला बघायला मिळाले असते, स्वतः राणा प्रतापने देशभक्तीचा संदेश दिला असता, शिवाजी महाराजांनी स्वातंत्र्याचे महत्त्व समजावले असते. तुळसीदासांनी रामायण स्वतःच्या तोंडून सांगितले असते. आणि राणी लक्ष्मीबाईंनी भारतीय स्त्रियांना सैनिक होण्याचा सल्ला त्याचप्रकारे दिला असता. कायद्यात सुद्धा किती परिवर्तन झाले असते. फाशी किंवा मरेपर्यंत शिक्षाच झाली नसती आणि मृत्यूचे भयच नसल्याने लोकांनी भयंकर अपराध केले असते. खून झालेच नसते. चोऱ्या, भांडण यांना उत आला असता. आणि समाजाची दशा कल्पना करवणार नाही अशी झाली असती.

मृत्यू नसता तर जीवनाचे महत्त्व कवडीइतके सुद्धा राहिले नसते. निरर्थक आणि नीरस जीवन या पृथ्वीवरील लोक जगले असते आणि हे जे काही ते पोटामाठी करतात खून, मारामाऱ्या, वाईट मार्गाने पैसा मिळवून सुद्धा पोटं भरतात, हे काही करावेच लागले नसते. आपण जे काही म्हणत असतो, की आमकं केल्याने पाप होईल, मग आपल्याला मृत्यूनंतर स्वर्गाऐवजी नरकात जावे लागेल किंवा या जन्मी केलेले पाप, त्याचे फळ पुढच्या जन्मी भोगावे लागेल म्हणून या जन्मीच चांगले वागायला पाहिजे. म्हणजे पाप, पुण्य, स्वर्ग, नरक या गोष्टीच अस्तित्वात नसतील· आणि लोकांना याचे भयही वाटणार नाही. मग तो काहीही करायला मोकळा होईल.

मृत्यू नसता तर या भूतलावरील लोकसंख्या वाढेल त्यामुळे अन्न, वस्त्र, निवारा यांची इतकी टंचाई होईल. मग त्यावेळी तर काय होईल? माणसांना माणसे नकोशी होतील. संस्कृतमधला श्लोक आहेना 'अति परिचयात अवज्ञा'चा याप्रमाणे सगळी स्थिती होईल आणि सगळीकडे एकच अंदाधुंदी माजेल.

आणि खरंच मृत्यू नसता तर या संसाराचे रूपच पालटेल. जीवनाचे रंगच पालटतील. अमरत्वामध्ये काही लाभ अवश्य आहे, पण याबरोबरच इतक्या भयंकर समस्या आहेत. कल्याणकारी जीवनतत्त्वाचा नाशच होईल. अशा प्रकारे मनुष्याचे अमर जीवन दीर्घमृत्यूच्या समान होईल. यापेक्षा हे बेहत्तर आहे की मनुष्य क्षणभंगूर शरीराद्वारा सद्‌गुण आणि माणुसकीद्वारा अमरत्व प्राप्त करेल. ●


शुभेच्छा !

**नटराज बेकरी**

११७०/४ शिवाजीनगर, पुणे ५



शुभेच्छा !

**स्वानंद मुद्रणालय व प्रकाशन**

२०३ शनवार पेठ,
अहिल्यादेवी हायस्कूलसमोर, पुणे ३०

# आठवण (कथा)

**देशपांडे आर. एस्.**
द्वितीय वर्ष, कला

निरवतेच्या शांततेत निस्तब्धतेच्या छायेत मी सुखावलो होतो. मावळतीची किरणे साऱ्या जगावर पसरली होती. गॅलरीत खुर्ची टाकून मी बसलो होतो. सर्व ठिकाणी संपलेल्या आयुष्याच्या खुणा पसरलेल्या होत्या. दिवसभर आपल्या तेजाने तळपणारा सूर्य मोठ्या कृतार्थ मनाने मावळतीला चालला होता. आपल्या आयुष्याची संध्याकाळ झाली याचे तर त्याला दुःख नाहीच. उलट साऱ्या सृष्टीला नवजीवन दिल्याची सार्थकता होती. गर्व नाही, अहंकार नाही. फक्त समाधान कर्तव्यपूर्तीचे. दुरवर आकाशाशी स्पर्धा करणारे माड खळखळून हसत होते, त्यांच्या सोनेरी प्रकाशात दिसणाऱ्या झावळ्या वरखाली वाकून एकमेकांशी हितगूज करीत होत्या. साऱ्या आकाशभर रंगाची उधळण पहात होतो.

तितक्यात 'अहो, उद्या दिवाळी आहे.' माझी तंद्री भंग करीत दरवाज्यातून सौ. डोकावली. मग पुढे काय? मी तिच्याकडे प्रश्नार्थक चेहऱ्याने पहात म्हणलो तसे काही नाही घरात लाडू केले आहेत, आणू का? सौ. ने सवाल केला. माझ्या डोक्यावर घणदिशी कोणीतरी आघात केला. अंधारात वीज चमकावी आणि पावसाळी सृष्टीचे स्वरूप सत्यरूप चटकन समजून यावे. सौच्या सवालाने जीर्ण कालाचे वस्त्र पार फाटून गेले. ठिकठिकाणी पडलेल्या बोगद्यातून माझेच बालपण माझ्या नजरेसमोर दिसू लागले. बालपणीच्या आठवणी मोहक असतात. फुलासारख्या फुलतात, क्षणभर सुगंध दरवळतो. नंतर त्या आठवणी फुलासारख्या कोमेजून जातात. माझे बालपण हे एक कोमेजलेले फूलच होते. निर्माल्य झालेल्या फुलात मी गंध शोधत होतो. आठवणीचे वस्त्र आणखी फाटत गेले. आठवू लागली अशी एक दिवाळी. वय आठवत नाही. काही समजण्याचे आणि काही न समजण्याचे वय होते.

अतिषबाजीच्या धुमधडाक्यानीच दिवाळीची भाऊबीज उजाडली. पृथ्वीतर लक्षलक्ष दिप तेवत होते. आकाश नक्षत्रांनी खच्चून भरले होते. झोंबणारे थंडगार वारे वहात होते. असंख्य ठिकाणी फाटलेल्या गोधडीत मी अंगाचे मुटकुळे करून पडलो होतो.

ए दादु उठ ना, आज भाऊबीज आहे. परकरातील ताईने अंथरूणातच आपला वहिणीचा हक्क गाजवित खर्रदिशी गोधडी ओढली. बोचरे थंडगार वारे अंगाला बोचले. कारण मी उघडाच होतो. इच्छा नसतानाही मी उठलो. कुठेतरी फटाक्याचा आवाज झाला. मन प्रफुल्लित झाले. ताईची स्वारी मोठी खुशीत होती. तिने मला पाटावर बसवले. डब्यातून वाटीत पीठ घेऊन त्यात पाणी घालून तिने अंगाला लावताच थंडीने शहारलेले शरीर आणखीनच शहारले. मी नाखुषी प्रदर्शित करून ताईला म्हटले काय ग ही कटकट? मला आधीच थंडी वाजते आहे. अरे दादा आज भाऊबीज ना, आजचा एकच दिवस फक्त ताईने स्पष्टीकरण केले. बाहेर फटाके वाजत होते. पीठ लावून झाल्यावर खोबरेल तेलाने पाठ चकाकू लागली. गरम

पाणी अंगावर पडताच बरे वाटले. कपड्याच्या साबणाने सारे अंग साफ झाले. धुण्यासाठी टाकलेल्या तुकड्याच्या पदराने सारे अंग पुसले. कपडे घालावे म्हणून घाईत बाहेर आलो. तर रात्री कपडे वाळलेच नव्हते. पण बहिणीने स्वच्छ धुवून ठेवले होते. कपडे ओले होते. तरीसुद्धा धुतलेले असल्यामुळे बरे वाटले. दिवाळी असल्याचा भास तरी झाला. कपडे घालता घालता ताईचे लक्ष खांद्यावर फाटलेल्या शर्टकडे गेले. तिने पुन्हा शर्ट काढला नि सुईदोरा घेऊन तो ती शिवायला लागली. तायडे तून् बघ अगदी वाईट आहेस. मला बाहेर जायचे आहे. फटाके कसे वाजताहेत हे बघायचं आहे. तुझं मध्येच काहीतरी. मी हिरमुसलो. लवकर आटप ग. मला थंडी वाजतेय. मी तिच्यामागे टुमणे लावले. तिने तो शिवलेला शर्ट माझ्या अंगात घातला. शिवणीचा स्पष्ट दिसणारा उंचवटा बोटानी दाबून खाली बसविण्याचा प्रयत्न केला. थंडी वाजू नये म्हणून मी घातलेला शर्ट ओला असल्याने किती ऊब येईल या विचाराकडे कोणाचे लक्ष होते ? बालमन सारखे बाहेर धावत होते. खोबरेल तेल लावून मी भांग पाडला. आंघोळ झाल्यावर ओवाळताना टाकलेले तांदूळ पटापटा खाली पडले. केस व्यवस्थित बसल्यासारखे [झाले. मी लगेच बाहेर पडलो. माझ्यापेक्षा लहान, मोठी मुले फटाके उडवीत होती. मी पहात होतो. जवळ गेलो की कोणीतरी फरफटत मागे ओढायचे. अरे, भाजेल की लांबून बघ ना. दुसऱ्या घरात कुठे फुलबाजीचा उजेड दिसला की तिकडे पळायचो. पुन्हा मागे कुठेतरी उंच उंच भुईनळ्याचा उजेड दिसला की तिकडे पळायचो. शेजाऱ्यांची मुले फटाके उडवायची, त्यांना फटाके उडवताना पाहून मग दंग होऊन जायचे.

सकाळी मित्राबरोबर त्याच्या घरी गेलो. समोरच कुणीतरी लाडू खात बसले होते. लाडू पाहिला की मला फार आनंद व्हायचा. बराच वेळ मी त्या लाडूकडे त्या मुलाकडे अधाळभूत नजरेने पहात होतो. तेवढ्यात घरातून कुणीतरी मोठा माणूस आला. आणि त्या मुलाला लाडूसह आत घेऊन गेला. आणि मला सांगितले तू जा आता मग ये. त्या दिवशी तो प्रकार घडल्यानंतर माझे मन खट्टू झाले. मी रडवलेल्या चेहऱ्यानेच घरी आलो. आईला विचारले, 'आई आपल्याला लाडू कधी करायचे ग ? लोकांच्या घरी तर...

अरे दादा , असे दुसऱ्याच्या घरी आपण जाऊ नये. आपणही करू बरं का लाडू. ताई किनई तुला आज गूळ घातलेला भात करणार आहे. आईने माझी समजूत काढली. तेवढ्यावरच मन नाचायचे. पुन्हा बाहेर यायचो नि दिव्याशी खेळायला लागायचो. फटाक्याचे उडलेले कागद दिव्यावर पेटवायच्या छंदात मन रमून जायचे. रस्त्यात पडलेल्या, वाजलेल्या, न वाजलेल्या फटाक्याचे तुकडे मी गोळा करायचो व दिव्यावर धरायचो. ज्यात दारू असेल तो फटाका चांगलाच वाजायचा आणि दिवा विझायचा. पुन्हा कागद घेऊन दुसऱ्या दिव्यावर पेटवून विझलेला दिवा लावायचा असा उद्योग चालला होता. एवढ्यात चार-पाच वर्षाची शांती माझ्याजवळ आली. हातातला लाडू खाऊ लागली. मी हावऱ्या नजरेने तिच्या हातातल्या लाडूकडे पाहू लागलो. तिच्या आईने ते पाहिले. रागाने तिच्या पाठीत गुद्दा घातला. भेदरलेली शांती झरकन मागे वळली. भिंतीला लागून तिच्या हातातला लाडू खाली पडला. आईच्या भीतीने शांती लाडु मातीत टाकून पळत गेली,

माझी नजर पुन्हां पुन्हा त्या मातीतल्या लाडूकडे वळत होती. बराच वेळ मनात आंदोलने चाललेली होती. घेऊ का ? नको ? तेवढ्यात केरसुणी घेऊन आई बाहेर आली. तिने मी केलेले कागदाचे तुकडे गोळा करून लाडू पडला होता तिकडेच भिरकावून दिले. पुन्हा घाण करू नकोस असे बजावून ती घरात निघून गेली. घरातल्यांची नजर माझ्याकडे नाही अशी खात्री करून मी हळूच पायरीवरून खाली उतरलो. मातीतला लाडू उचलला आणि मागे वळून पाहिले. कचदिशी पाठीत केरसुणी बसली. हातातला लाडू पुन्हा मातीत पडला. हाताच्या पाचही बोटांनी श्रीमुख रंगून निघाले. मी जोर जोरात रडू लागलो. आईचे वात्सल्य उफाळून आले. तिने मला जवळ घेतले. तिच्या डोळ्यातून टपटप आसवे ओघळू लागली. आईची चूक असावी म्हणूनच तिने मला जवळ घेतले. या विचाराने मी जास्तच फुगलो नि पुन्हा मोठ्यांदा रडू लागलो, खूप वेळाने शांत झालो. वडिलांची आठवण आली. लाडू खाल्ल्याशिवाय राहणार नाही ही जिद्द मनाशी बांधली. बऱ्याच दूरवर आमच्या घरी न येणाऱ्या माझ्या वडिलांकडे मी घरात कोणाला न सांगता निघालो. बराच वेळ चालल्यानंतर वडिलांचे दुकान दिसू लागले. मी तेथे जाऊन उभा राहिलो. वडिलांनी मला पाहिले परंतु ते कामात गुंतले होते. माझ्याशी बोलायला त्यांना सवड

नव्हती. मी त्यांच्याजवळ जाऊन बसलो तरी त्यांचे काम चालूच होते. तेवढ्यात एक बाई तेथे आली. ओळखीची होती पण नात्याने कोण होती कोणास ठाऊक ? माझ्याकडे पहात वडिलांना म्हणाली, 'सणा-सुदी ही ब्याद कशाला आणली ?' त्यावर वडील बोलले, 'मी नाही आणली तेच आलेलं दिसतंय.' फणकारतच ती बाई तेथून निघून गेली.

मग वडिलांनी माझ्या चेहऱ्याकडे पाहून विचारले, का आलास ? मी भीतीने काहीच बोललो नाही. बऱ्याच वेळाने त्यांनी मला विचारले, 'काय रे, आईने काही गोडधोड केले का ? मला त्यांच्या बोलण्याचा अर्थ कळला नाही. मी त्यांच्याकडे प्रश्नार्थक नजरेने पहात राहिलो. पुन्हा त्यांनी विचारले लाडू वगैरे केले का ? मी फक्त नकारार्थी मान हलवली. त्यावर ते म्हणाले, 'विचारले तर सांगू नकोस म्हणून सांगितलंय का ?' त्यावर मी खरंच नाही केले लाडू म्हणून उत्तर दिले. त्यावर ते काहीच बोलले नाहीत. गल्ल्यातल्या नोटा बाजूला सारीत बोटाने पैसे इकडे तिकडे करत एक आणा त्यांनी माझ्या हातावर ठेवला. आणि जा म्हणाले. मला त्यांच्याशी खूप बोलायचे होते. लाडू मागायचा होता. पण तेवढ्यात ती गेलेली बाई परत येताना दिसली. दिलेला एक आणा मुठीत गच्च आवळून धरला. आणि तेथून धूम ठोकली. रस्त्याने मी मोठ्या खुशीत चाललो होतो. हा एक आणा मी आईला देणार व तिला बाजारातून लाडू आणायला सांगणार. दूरचे अंतर मी दहा–बारा मिनिटातच तोडले. घरी आलो तेव्हा आई ताईचे केस विंचरीत होती. मधूनच थांबून डोक्यात काहीतरी पहात होती. माझ्याकडे तिचे लक्षच नव्हते. लक्ष गेल्यावर तिने मला विचारले कुठे गेला होतास रे दादा ? मी तिला सर्व काही सांगितले आणि हातातला एक आणा दाखवला. पुढे वाक्य पूर्ण झालेच नाही. हातातला एक आणा दूर फेकला गेला. दूरवर कुठेतरी त्याचा खणखण आवाज झाला. आईच्या हातातली फणी फाडदिशी तोंडावर बसली. मी चांगलाच व्हिवळलो. ताई उठली तिने मला जवळ घेतले. आईला काय वाटले, ती घरात निघून गेली. ताईची वेणी तशीच राहिली. ताईने गोड भाताची आठवण करून दिली. स्फुंदत स्फुंदत मी जेवलो, सगळे सगळे विसरून गेलो. लक्षात राहिला फक्त लाडू.

दुसऱ्या दिवशी पुन्हा वडिलांकडे जायला निघालो. आईचा राग आला होता. लाडू तर देत नाही मार मात्र देते म्हणून मी वडिलांना सारे काही सांगणार होतो. लांबून येतानाच वडिलांनी मला पाहिले. मी पळतपळत त्यांच्याजवळ गेलो. पण अंगणातच थबकलो. त्यांच्याजवळ ती कालची बाई उभी होती. वडिलांनी डोळे मोठे केले होते. त्यांनी जवळ येऊन माझा कान पकडला. पाठीत जोरात गुद्दा घातला मी कळवळलो. रडू लागलो. दळभद्री मेला, चल चालता हो, पुन्हा इकडे येऊ नकोस. जा तुझ्या आईजवळ रहा. मी असाह्य होऊन परत फिरलो. जन्मात पुन्हा लाडू खायचा नाही या प्रतिज्ञेने माझे बालमन बांधले गेले.

त्यानंतर अनेक दिवाळ्या आल्या नि गेल्या. लक्ष लक्ष दिवे तेवले, मालवले. माझ्या लहानपणी हृदयात कधी तेवले होते दीप स्वप्नांचे, आशांचे, माझी स्वप्ने पुरी झाली आहेत. आज मी सुखी आहे. सारे गमावून सुद्धा खऱ्या अर्थाने समाधानी आहे. कधीतरी बालपणीच्या आठवणी जाग्या होतात. काही गोड तर काही कडू. त्यांना वास्तवतेची झालर असते. त्या आठवणी स्वप्नांसारख्या मोहक नसतात. सत्याइतक्या भेसूर असतात. पंख लावून दिवस निघून गेले. फक्त मागे राहिल्या न बुजणाऱ्या जखमा. त्या जखमा मी उराशी कवटाळतो. त्यातही सुख शोधतो. अंतःकरणात जपून ठेवतो. फुलासारखे निर्माल्य नाही का आपण पवित्र मानीत ?

●

*With Best Compliments From :*

**Sakura Shirts**

*Exclusive in* : **Mfg. of Shirt, Trouser & Jeans**

Near Step–in–Restaurant, opp. Fergusson College
Pune 411 004

# नृत्य आणि भारतीय माणूस

**अभिजित श्री. डांगे**
१२ वी, वाणिज्य, आय्

नृत्य ! नर्तन ! नुपुरांचा छनछनाट, नर्तक, नर्तिकांचे हावभाव, अभिनय, तबला-सारंगीची साथ ! मनाला आनंद देणारे दृश्य. मरगळलेल्या मनाला आनंदाच्या मार्गावर नेणारा अनुभव !

मानवी मनातील उचंबळून आलेल्या आनंदाला व मनातून बाहेर पडू न शकणाऱ्या शब्दांना अभिनय व भावनांच्या साहाय्याने घुंगराच्या नादात बंदिस्त करणारे नृत्य ! प्राचीन काळापासूनच भारतीय माणसाच्या सांस्कृतिक जीवनात 'नृत्य' हा एक अविभाज्य घटक होता व आहे. भारतीय नृत्ये ही या विशाल देशाच्या लोभस संस्कृतीचे प्रतीकच आहेत. या कलेला विशाल इतिहास व प्राचीन परंपरा लाभली आहे. भारतीय संस्कृतीप्रमाणेच 'विविधतेत एकता' हे त्यांचेही वैशिष्टय आहे. परंतु अशा ह्या सांस्कृतिक कलेला समाजात कधीच उच्च दर्जा मिळाला नाही व मिळत नाही. इतिहासात नृत्य फक्त देवळात, कोठ्यांवर, भटक्या-जमातींमध्ये व राजांच्या विलासी दरबारात रमले. किंबहुना रमवले गेले. प्राचीन काळी उच्चभ्रू समाजाचे मनोरजनाचे साधन म्हणजे नृत्ये होती. परंतु असे असूनही नृत्ये शतकानुशतके उत्तरोत्तर वाढतच राहिली, फुलतच राहिली.

भारतात नृत्याचे प्रकार तरी किती ? कथ्थक, भरतनाटयम्, कुचीपुडी, मणिपुरी, ओडीसी, कथकली सांगू तरी किती ? प्रत्येक एकाहून एक सरस, उत्तम या विशाल भारतातील विशाल प्रदेशांचे प्रतिनिधित्व करणारी ही नृत्ये– उत्तर प्रदेशाचे कथ्थक, दक्षिणेचे भरतनाटयम्, पूर्वेचे ओडीसी, मणिपुरी.

प्रथम मंदिरात नंतर मोगल, मुसलमान राजांच्या, विलासी दरबारात शृंगारिक होऊन मुजऱ्यात रमलेला कथ्थक ! थोडासा खट्याळ, अवखळ पण त्याचा जोम बिजलीचे सळसळते चैतन्य अजोडच ! हे भरतनाटयम् विश्वस्त योगी. पौराणिकता व देवभक्तीने नटलेली ही नृत्यमाला नटराजाच्या चरणस्पर्शाने पुनीत झालेला ! भक्तीने वेडया झालेल्या मीरेचे नृत्यरूप हे ओडीसी नृत्य ! जयदेवच्या 'गीत गोविंद' वर आधारलेले. अशी ही त्यांची विविध रूपे. ज्या लोकनृत्याने परंपरेने आपणास ही देणगी दिली त्यांचे आम्ही शतशः ऋणी.

अशा ह्या नृत्यकलेचे ह्या आधुनिक डान्स, जाझ्, पॉप युगात स्थान सन्माननीय आहे ? उत्तर दुखावणारे नकारात्मक असे आहे. ह्या कलेत जितकी अपूर्व शक्ती आहे त्या मानाने ही कला फोफावतच नाही याची ठळक कारणे म्हणजे तरुण पिढीचे होणारे आधुनिकीकरण ! व आपल्याच समाजाचा ह्या कलेकडे बघण्याचा दृष्टिकोण.

एखादी प्राथमिक शाळेतील मुलगी नृत्य शिकते हं कौतुकाची बाब आहे ! परंतु एखादी मोठी कॉलेजातील मुलगी शिकते– हिच्या आईवडिलांना हिची काही काळजी ? एवढ्या तरुण मुलीला कोठ्यावर का नाचवणार आहेत ? कसे वाटतायत अभिप्राय– एखादा मुलगा जर नृत्य शिकत असेल तर त्याच्याबद्दल नाही

नाही त्या शंका घेतल्या जातात. हे असे अभिप्राय, ऐकून तो मुलगा किंवा मुलगी निराश होतात. मग काय ? नृत्य, बंद आणि घुंगरू भंगारात जातात. आता दुसरं कारण म्हणजे ह्या कलेला लागणारी मोठी तपश्चर्या, साधना ! आणि इथेच भारतीय जरा कमी पडतात, कारण त्यांना लगेच प्रसिद्धी, बक्षिसे हवी असतात.

आत्ताच्या विज्ञानयुगातही संगीतकलेला सुवर्णयुगाचे दिवस आहेत. परंतु नृत्यकलेला नाहीत. संगीतासारखेच नृत्य सामान्य लोकाला प्रिय नाही– ब्रेक डान्स, डिस्को मात्र चिमुरडे पोरही करेल व त्याचे कौतुकही होईल. ह्या सुसंस्कृत, शिक्षित समाजात नृत्याबद्दलचे हे दृष्टिकोन बदलणार तरी कधी ? परदेशी मुले–मुली येथे येऊन ही कला शिकतात आणि आपल्या इथे – कथ्थक काय शिकतेस हल्ली ब्रेकची फॅशन आहे म्हटलं बाईसाहेब ! हं. म्हणतात ना पिकते तेथे विकत नाही.

रसिकतेत अग्रगण्य असलेल्या भारतीय समाजात ही गोष्ट खटकते. परंतु आहे मात्र सत्य – एक कटुसत्य ! आतापर्यंत भारतीयांनी आपल्या कला जोपासल्या– उत्तरोत्तर वाढवल्या, बहरत नेल्या. सर्व समाजाने प्रयत्न केले तर ही नृत्यकला पण बहरेल व माझ्या भारतीय समाजातील तरुण पिढी आपल्या अखंड प्रयत्नांनी हे कार्य सफल करेल अशी माझी आशा आहे.

●

---

## प्रीत

पाहिले तुजला मी
प्राजक्ताची फुले वेचतात,
अन् हलकेच चोरून हसताना
तू हलकेच हसलीस
पण मला हसूच फुटत नव्हते
बोलायचंही होतं
पण शब्दही फुटत नव्हते
सगळं कसं कंठाशी दाटून
डोळ्यात उतरत होतं
अन् हलकेच पाऊलं टाकीत
निघालीस तू
नेहमीच्या थाटाने.........
सऽऽ सखे थांब
जाता जाता एकच सांग
खरंच का ग प्रीत अबोल असते
प्रीतीला भाषा नसते
शब्दांपेक्षा भावनेतनं अधिक कळते
मग वाच ना माझ्या डोळ्यातल्या भावना
मलाही वाचायच्यात तुझ्या डोळ्यातल्या भावना

**विकास ढवळे**
प्र. व. वाणिज्य 'ब'

---

# तान्हुलं
( कथा )

**कविता देशपांडे**
१२ वी 'डी'

झोपडीच्या कुडाच्या दरवाज्यापाशी यमी बसल्या-बसल्याच पेंगत होती. डोळे आपोआप झाकले जात होते. एका हाताने दोरी हलवून ती पाळण्यातल्या तान्हुल्याला झोपवत होती. घरातली कामं आटोपून बाळाला झोपविण्यासाठी नुकतीच ती दारात बसून पाळणा हालवत होती. सूर्य डोक्यावर आला होता. दारातनं वाऱ्याची गार झुळुक घामानं चिंब झालेल्या यमीला सुखदायक वाटत होती. त्यामुळे तिच्या नकळत तिचे डोळे मिटले जात होते.

इतक्यात, 'यमेऽऽ', अशा हाकेनं यमी दचकून जागी झाली. पटकन् उठली अन् वाकून झोपडीबाहेर आली. देशमुखाचा लहानसा पोरगा, सदु बाहेर उभा होता. 'यमेऽ, तुला वाड्यावर बोलिवलंय, आण्णा लई रागावल्याती. म्हणत हूते, घरात पाव्हणं, न्हावणं आल्यात् अन् एव्हढी कामं कोन करील ? यमीला कवा बोलिवलंय अन् ईल कदी ? सदु म्हणाला.

यमी चरकली. तिचा चेहरा केविलवाणा झाला. तिनं पाळण्यात नजर टाकली. तान्हुलं शांत झोपलं होतं. पटकन् तिनं दार लोटलं. सदाला म्हणाली, 'सदा, तू इथं राम्याशी खेळण्यापायी आला हाईस नं ?' सदानं होकारार्थी मान डोलावली. 'मग जरा, माझ्या बाळा-कडं लक्ष ठीवशील ?' सदा शेजारच्या पोराबरोबर खेळण्यासाठी आला होता. त्याला ह्या फंदात पडायचं नव्हतं. पण यमीचा तो केविलवाणा चेहरा पाहून तो म्हणाला, 'बरं, ठिवतो. पर तू आधी निग.' यमी झपाझप गोजाक्काच्या घराकडं वळली. बाहेरूनच ओरडली, 'गोजाक्का, तान्हुलं घरात एकलंच हाय. जरा लक्ष ठिवा.' आतून होकार आल्याशिवाय यमी हालली नाही... आईचं मन...

सूर्य डोक्यावर आला होता. जमीन तापून लालबुंद झाली होती, पण यमीची पावलं क्षणभरही सावलीत विसावली नाहीत. उलट, लाल जमिनीपेक्षाही लालबुंद झालेली तिची पावलं झपाझप पडत होती. कारण वाटही तशीच लांब होती. लवकरात लवकर काटायची होती.

यमी तुंबा महाराची बायको... तुंबा देशमुखाच्या वाड्यावर काम करायचा... जीवाचा आटापीटा करून दोन घास त्याच्या व यमीच्या तोंडात पडायचे. पण दैव आडलं आलं आणि तुंबाला उचलून दूर घेऊन गेलं... एकच महिन्यापूर्वी तुंबा गेला... यमीपासून दूर... पण यमीला ऊर भरून रडायलाही वेळ मिळाला नाही. ...दुसऱ्याच दिवशी वाड्यावरून सांगावा आला, 'उद्यापासून यमीला कामावर यावं लागल, तुंबाचं समदं कर्ज फिटलं नाय. शिल्लक आहे ते फेडण्यासाठी यमीला कामाला यावं लागल.'

तेव्हापासून यमी वाड्यावर रोज राबत होती. पण आज उशीर झाला होता. म्हणूनच तिची छाती धड-धडत होती. मनात नाही नाही ते विचार येत होते. 'मालक लई रागीट. कामावरून काढलं तर पोटाला काय खायाचं ? तान्हुल्याचं काय हुईल ?... नाही,

नाही, मालक मायाळु हाय. असं करायचा नाही. बिगिनं जाया होवं.' ती चालण्याची गती वाढवायची. पावलं जसजशी झपाझप उचलायची. तसतशी पायाखालची लाल माती उधळायची. पण त्याची यमीला पर्वाच नव्हती. तिच्या डोळ्यात अन् मनात भिती दाटली होती.

रस्त्यात फारशी वर्दळ नव्हती. पण वाडा जवळ आला तेव्हा जरा माणसांची ये–जा दिसत होती. आता यमीचा वेग जरा मंदावला होता... एखाद्याला चुकून धक्का लागला तर शिव्या खाव्या लागतील या भीतीनं.

यमी वाड्यात पोहोचली. देशमुख ओसरीतल्या झोपाळ्यावर बसले होते.

'आलीस ?' यमीला पाहून देशमुख म्हणाले.

'व्हय जी.'

'अहो, यमी आली.' देशमुख आत डोकावत ओरडले.

आतून देशमुखीण बाई आल्या.

'यमे, तिकडं परसात शेंगाचं पोतं ठिवलं हाय. ते घे अन् परसात बसून शेंगा फोडून काढ.

'व्हय जी.' यमी परसात जायला निघाली.

'थांब, आधी तुझ्या हातावर पाणी घालते.' देशमुखीणबाईंनी तांब्या आणला. यमी खाली वाकली. वरून त्यांनी तिच्या हातावर पाणी घातले. यमीने पदराला हात पुसले. ती परसात गेली. एक पोतं खाली आंथरलं. त्यावर शेंगा ओतल्या आणि शेंगा फोडायला बसली. मालक किंवा मालकीणबाई उशिरा आल्याबद्दल रागावले नाहीत म्हणून तिला समाधान वाटत होते.

बराच वेळ गेला. मध्येच एक ब्राह्मण वाड्यात शिरला. परसात यमीला पाहून त्यानं 'शिव, शिव' करीत नाक मुरडलं. आत जाऊन तो देशमुखांना म्हणाला, 'अहो, ती दारातच बसली आहे की ! चुकून एखाद्याला शिवली तर स्नान करावे लागेल.' तो ब्राह्मण इतक्या जोरात ओरडला, की ते यमीला ऐकू गेले. ती उठली. पोतं ओढू कोपऱ्यात घेतलं अन् कोपऱ्यातच बसली. तिला असल्या बोलण्याची लहानपणापासनंच सवय होती. एकेक शेंग टणाटण् फोडावी तसं एकेक दुःख ती पचवत होती. मध्येच ती उठली अन् जवळच्या हौदातलं पाणी पिऊन पुन्हा गुपचूप आपल्या जागेवर बसली. वाड्यात कामावर येणाऱ्या महारांसाठी तो वेगळा हौद होता.

सूर्य जसाजसा कलत होता, तसंतसं तिचं लक्ष बाळाकडे जाऊ लागलं. 'आता तान्हुलं काय करत असंल ? पाळण्यात खेळतच असंल ना ? नायतर गोजाक्का त्याला खेळवत असत्याल.'

तिच्यावर एकेक काम जास्तच येऊन पडत होतं. वाडत पाहुणे मंडळी आली होती. म्हणून तिला आज भरपूर काम होतं. दिवस कलू लागला. तिच्या छातीत धस्स झालं. आजच्याएवढा तिला कधीच उशीर झाला नव्हता. तिला लहान बाळ आहे हे जाणून मालकीणबाई तिला लवकर घरी सोडत असत. पण आज...

तिनं घाईघाईनं काम आटोपलं. मालकीणबाईंनी तिच्या हातावर भाकरी टाकली. यमी घाईनं भाकरी पदरात बांधू लागली. तशा त्या म्हणाल्या, 'यमे, इथंच बसून खा की.'

'नगं, आज लई उशीर झालाय.'

'अगं, भाकर खायला किती वेळ लागतोय ? गुमानं खा बसून.'

मालकिणीचा शब्द यमीला मोडवत नसे. ती खाली बसली. तुकडा मोडून तोंडात टाकणार तोच...

'यमेऽऽऽ. यमेऽऽ' धापा टाकत महादा आला.

'यमे, तुझ्या झोपडीला आग लागली हाय, पळ जाऽऽ.'

यमीच्या छातीत चर्रर्र झालं. ती तशीच उठली. भाकरीचे तुकडे खाली पडले. भाकरीचा तुकडा पायाखाली नकळत तुडवून ती पळू लागली. वाऱ्याचं बळ तिच्या अंगात सचारलं. आता कोणाला धक्का लागो, न लागो तिला त्याची पर्वा नव्हती. तिच्या डोळ्यापुढे फक्त तिचं तान्हुलं होतं. ती पळत होती. डोळ्यातून आणि नाकातून येणारं गरम पाणी तिच्या घामात मिसळत होतं. त्यावर तिचे केस व धुळीचे कण चिकटत होते. तिला रस्ता फार लांब वाटत होता. पण त्यापेक्षाही तिचे अश्रू, तिची भीती, तिची ममता मोठी होती. तिला त्या तान्हुल्याशिवाय जगात कोण होतं ? ते तान्हुलं तिचं सर्वस्व होतं आणि ते आग लागलेल्या झोपडीत होतं. ती वाऱ्यासारखी पळत होती.

आली. ती झोपडीपाशी आली. आजूबाजूचे सगळे लोक तिच्या जळणाऱ्या झोपडीपाशी जमले होते. 'माझं तान्हं, माझं तान्हं,' म्हणत तिनं हंबरडा फोडला. ती झोपडीत शिरू लागली. आजूबाजूची लोकं तिला धरून

ओढू लागली, 'यमे काय करतीस हे? मरायचं हाय का?'

'कुनासाठी जगू? कुनासाठी जगू?' यमी ओरडत होती. डोकं आपटून घेत होती. एवढ्या उचंबळून येणाऱ्या तिच्या ममतेला तिचं तान्हुलं दिसत नव्हतं.

'माझं तान्हं कुठंय?' ती हुंदके देऊन विचारू लागली. कोणीच काही बोलत नाही हे पाहून ती घाबरली. तिला काय समजायचं ते समजलं. तिनं मन घट्ट केलं आणि पुन्हा झोपडीत शिरू लागली. लोकांनी तिला अडवलं.

इतक्यात सदू ओरडला, 'यमेऽऽ, तुझं तान्हं म्या त्हा गवतात ठिवलंय.' एवढं ऐकताक्षणी तिचा चेहरा झटकन बदलला. सदूकडे तिचं लक्षही गेलं नाही. ती 'माझं तान्हं' करत गवतात शिरली. तिच्या तान्ह्याचा रडण्याचा आवाज तिनं ओळखला. पटकन् गवतातून हातपाय वर करत रडणारं तिचं तान्हुलं तिला दिसलं. तिच्या डोळ्यातून ममता वाहू लागली. तिनं पटकन् त्याला छातीशी धरलं. एखाद्या चिमणीनं पिलाला पंखात लपवावं तसं.

तिच्या डोळ्यातले अश्रू बाळाच्या डोक्यावर पडले अन् ते एकदम शांत झालं. इकडं सदाला काही ब्राह्मण लोक, 'म्हाराच्या पोराला का शिवलास?' म्हणून मारत होते. तिकडे यमी बाळाला छातीशी धरून हुंदके देण्यापलीकडे काही करत नव्हती. ●

---

## कुंपण

जीवनाच्या वाटेवर
एकटीच भेटलीस,
विचारून मनाला
दोस्ती मी केली

जीवनाच्या वाटेवरची
सखी तू झालीस
काटेरी कुंपणापर्यंत
साथ तू दिलीस !

ओलांडताना कुंपण मात्र
अडकून तू राहिलीस,
रक्तबंबाळ होताना मी
पोटभर रडलीस !

कुंपणापलिकडे मात्र
एकट्यालाच ठेवून गेलीस !

**गुट्टे व्यंकट ज्ञानोबा**
प्र. व. वाणिज्य

## संपण्यापूर्वी

देहाला देह समजून
अजून खूप जगायचं आहे
देहाचीच पूजा करत
देवाला गाठायचं आहे
कोणी कोणाचं नाही समजून
जीवन कंठायचं आहे
गालावरून अश्रू सांडीत
कळी खुलवायची आहे
मेलेलं मन अजून मारीत
ते मन फुलवायचं आहे
साऱ्यांना सुगंध देताना
एकदा सुकून घ्यायचं आहे
जळणाऱ्याची आग शमवत
असेच पेटत जायचं आहे
देह हा संपण्यापूर्वी
चिता मला रचायची आहे

**वंदना शिरुडे**
द्वि. व. शास्त्र 'ब'

# भारतीय विज्ञान परिषद

डॉ. घाटे

भारतीय विज्ञान परिषदेचे ७५ वे, म्हणजेच अमृत-महोत्सवी अधिवेशन पुणे विद्यापीठामध्ये जानेवारी ७ ते १३ या काळात आयोजित केले गेले. यापूर्वी १९५० मध्ये, सुमारे ३७ वर्षांपूर्वी अशाच प्रकारचे अधिवेशन पुणे विद्यापीठात झाले होते.

अमृत-महोत्सवी अधिवेशनाचे उद्घाटन भारताचे पंतप्रधान श्री. राजीव गांधी यांच्या हस्ते झाले. यावेळी झालेल्या भाषणांत पंतप्रधानांनी देशाच्या शास्त्रज्ञांना विज्ञान व तंत्रज्ञानाचे फायदे ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले. शास्त्रज्ञांनी सामान्य माणसाचे जीवनमान सुधारण्यासाठी प्रयत्न करून जगात शांतता व सहजीवनाचा प्रसार करावा असेही त्यांनी यावेळी सांगितले. अजूनही भारतात विज्ञान व तंत्रज्ञानाचा फायदा फक्त शहरातील बुद्धिजीवी वर्गापुरताच मर्यादित असणे ही एक चिंतेची बाब असल्याने पंतप्रधानांनी नमूद केले.

या अधिवेशनाचा मुख्य विषय 'विज्ञान व तंत्रज्ञानातील आघाडीवरील कार्य' असा होता. उद्घाटनाच्या अध्यक्षीत भाषणात प्रा. डॉ. सी. एन. आर. राव यांनी भारतातील विविध विद्यापीठे व इतर संस्थामध्ये चालू असणाऱ्या संशोधनाची माहिती दिली. याचबरोबर विज्ञानाच्या शिक्षणाचा दर्जा खालावत चालला असल्याबद्दल खेद व्यक्त केला. डॉ. राव यांच्या मते विज्ञानाचा योग्य तऱ्हेने प्रसार होण्यासाठी योग्य ते अभ्यासक्रम, पुस्तके व इतर सोयी विद्यापीठात उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न केले जावेत असे सांगितले. विद्यापीठांनी संशोधन कार्यांकडे जास्त लक्ष द्यावे आणि यासाठी शास्त्रशाखेतील पदवीपर्यंतच्या परिक्षांचे ओझे विद्यापीठांकडून काढून घेऊन त्यासाठी दुसरी व्यवस्था करावी असे सुचविले. विद्यापीठांमध्ये मूलभूत संशोधनावर भर दिला जावा तसेच विविध राष्ट्रीय संस्था व औद्योगिक क्षेत्र आणि विद्यापीठे यांच्यात परस्पर सहकार्य नजिकच्या काळात वाढविण्याची नितांत आवश्यकता आहे असे पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. व्ही. जी. भिडे यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात सांगितले.

अमृत महोत्सवी अधिवेशनाच्या उद्घाटन समारभानंतर लगेच काही ज्येष्ठ शास्त्रज्ञांचा पंतप्रधानाच्या हस्ते पदके देऊन सत्कार करण्यात आला. या शास्त्रज्ञांमध्ये डॉ. खुशू, डॉ. मेहेरोमा, डॉ. पेंटल इ. मान्यवर मंडळी होती.

केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान खात्याचे राज्यमंत्री के. आर. नारायण यांच्या हस्ते टपाल खात्याच्या खास तिकिटाचे प्रकाशन झाले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण तसेच हंगामी राज्यपाल न्या. चित्ततोष मुखर्जी हेही यावेळी उपस्थित होते.

कै. सी. व्ही. रामन् यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या अर्धपुतळ्याचे पंतप्रधानांनी उद्घाटन केले. हा अर्धपुतळा विद्यापीठात कायम स्वरुपात बसविला जाईल.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. एम. जी. के. मेनन यांनी पंत-प्रधानांचे हस्ते सर आशुतोष मुखर्जी पदक—म्हणजे विज्ञान परिषदेचे सर्वांत महत्त्वाचे बक्षीस—यावेळी बहाल करण्यात आले.

७ जानेवारीचा या भव्य उद्घाटन सोहळ्यानंतर सलग ७ दिवस देशातील तसेच परदेशातील सुमारे ४००० शास्त्रज्ञांनी विविध विषयांतील संशोधनांवर सखोल चर्चा केली. विद्यापीठाच्या विविध विभागांमधून त्या त्या विषयासंबंधीच्या संशोधनावर चर्चा झाली. यावेळी अनेक नामवंत शास्त्रज्ञांची भाषणे झाली तसेच तरुण शास्त्रज्ञांनी संशोधन—निबंध वाचले. संशोधनाचा वाढता विस्तार व संशोधकांची वाढणारी संख्या लक्षात घेऊन हल्ली 'पोस्टर प्रेझेंटेशन' प्रथा किंवा ज्याला भित्तीपत्रके म्हणता येतील अशा स्वरुपांत शोध निबंध लावले जातात व त्या अनुषंगाने चर्चा केली जाते. अशा प्रकारची पोस्टर्स सर्व विभागांमधून लावली गेली होती.

ज्येष्ठ भारतीय शास्त्रज्ञांच्या भाषणात अतिसंवाहकता, संगणकशास्त्र, पर्यावरण शास्त्र व प्रदूषणाचे मानवी जीवनावर परिणाम, अणू—उर्जा व त्यापासून निर्माण होणाऱ्या समस्या, पॉलीमर संयुगांचा वापर, मेंदू व मज्जासंस्थांचे आजार व त्यावरील उपचार, हवामान शास्त्र वगैरे अनेक विषयांवर चर्चा झाली. बहुतेक भाषणांत आपल्या देशांत या विषयांवर चाललेल्या संशोधनाचा आढावा घेतला गेला.

काही मान्यवर परदेशी शास्त्रज्ञांचीही यावेळी खगोलशास्त्र, संगणकशास्त्र व त्याचा विज्ञानांतर्गत संशोधनाशी असणारा दुवा या विषयावर भाषणे झाली.

विद्यापीठ अनुदान मंडळाचे पूर्वीचे उपाध्यक्ष डॉ. रईस अहमद यांनी विज्ञानांचा व अणू संशोधनाचा शांततेसाठी वापर केला जावा असे कळकळीचे आवाहन शास्त्रज्ञांना केले. याच निमित्ताने पुण्यात टिळक स्मारक मंदिरात रेगन—गोर्बाचेव करारासंबंधी चर्चा करण्यात आली व जागतिक शांततेसाठी शास्त्रज्ञांची एक पदयात्रा आयोजित केली गेली होती.

विज्ञान परिषदेच्या निमित्ताने पुणे विद्यापीठाच्या परिसरात एक मोठे प्रदर्शन भरवले गेले होते. या प्रदर्शनांत नामांकित उद्योजक व राष्ट्रीय संस्था यांनी आपापले विभाग ठेवून त्याद्वारे सामान्य जनतेला उपयुक्त माहिती पुरविली. केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान विभागाने देशातील विविध भागात चालू असणाऱ्या सशोधनाचा आढावा देणारे फलक, पुस्तके इ. गोष्टींचे प्रदर्शन ठेवले होते. पुण्यातील सेंट्रल वॉटर अँड पॉवर रिसर्च स्टेशनतर्फे धरणे व जलशक्तीचा उपयोग या संबंधी माहिती दिली तर वनखात्याने जंगलसंपत्तीचा योग्य उपयोग कसा करावा या संबंधी चित्रे प्रदर्शनात ठेवली होती. एज्युकेशन मेडिआ रिसर्च संस्थेतर्फे दूरदर्शनवर होणारे कार्यक्रम कसे केले जातात याची माहिती दिली. तसेच शिळणोपयुक्त व्हिडीओ कॅसेट कशा तयार कराव्यात यासंबंधी असणाऱ्या विविध शिक्षणक्रमांचा आढावा घेणाऱ्या पुस्तिका वगैरे दाखविण्यात आले. एकंदरीत सामान्य जनतेला विज्ञान विषयक माहिती देण्यात हे प्रदर्शन मोठे उपयुक्त ठरले. विविध शालेतील तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी या प्रदर्शनास येत होते. अशा प्रदर्शनातूनच विज्ञानविषयक आवड निर्माण होते. प्रदर्शन पाहून पुढे काहीजण तरी संशोधनास प्रवृत्त व्हावेत ही प्रदर्शन मांडण्यामागची मुख्य इच्छा असते व ती सफल व्हावी असे वाटते.

१३ जानेवारी रोजी या परिषदेची सांगता झाली त्यावेळी संशोधनात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व ३० वर्षांहून लहान असणाऱ्या ८ तरुण शास्त्रज्ञांना पदके देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. विज्ञान परिषदेच्या सर्वसाधारण सभेत यावेळी काही महत्वाच्या सूचना केल्या गेल्या. या सूचनांमधे विद्यापीठे व विविध शास्त्र संस्थांना स्वायत्तता मिळावी, संशोधनासाठी लागणाऱ्या उपकरणांवर आयातकर अथवा इतर कर लावला जाऊ नये. उपग्रहांद्वारे होणाऱ्या दूर सर्वेक्षण तंत्राचा जास्तीत जास्त वापर शेती व जलसंशोधनासाठी केला जावा, नव्याने विकसित होणाऱ्या शास्त्र व तंत्रज्ञानाच्या आयात व विकासकार्यासाठी एक राष्ट्रीय समिती नेमली जावी इ. सूचनांचा सामावेश होता. उर्जा, दळणवळण व संदेशवहन या संबंधी संशोधनावर विशेष भर दिला जावा असेही याप्रसंगी ठरविण्यात आले.

समारोप प्रसंगीच पुढील वर्षीचे अधिवेशन मदुराई येथे भरविण्यात येणार असल्याची घोषणा विज्ञान परिषदेने केली.

पुण्यात झालेल्या या महत्वपूर्ण अशा परिषदेचे विविध वर्तमानपत्रांनी रोजचे रोज समालोचन केले. या निमित्ताने वृत्तपत्रांनी विविध शास्त्रज्ञांच्या मुलाखती घेऊन त्या प्रसिद्ध केल्या तसेच विज्ञानविषयक अनेक घडामोडींचा आलेख देणारे लेख छापून विज्ञान-परिषदेच्या कार्यास हातभार लावला.

परिषदेत भाग घेणाऱ्या वैज्ञानिकांची संख्या प्रचंड असल्यामुळे अनेक गैरसोयी व गैरव्यवहार अशा परिषदेच्या काळात होतात, एकूण कार्यक्रमात अनेक त्रुटी राहतात. ही वैगुण्ये सोडल्यास व कार्यक्रम आणखी शिस्तबद्ध ठेवल्यास त्यापासून तरुण संशोधकांना खूपच ज्ञान व अनुभव संपादन करता येईल.

●

# निसर्गाच्या सहवासात

**भास्कर जोशी**
द्वि. व. शास्त्र

ज्या दिवसाची मी आतुरतेने वाट पहात होतो. तो दिवस एकदाचा उजाडला. ती उषा एक नवीनच आगळी वेगळी आशा घेऊन दाराशी आली होती. आणि तो दिवस होता १६ मे १९८७ या दिवशी आम्ही ऑल इंडिया ट्रेनिंग कॅम्पला जाण्यासाठी निघणार होतो की जो 'कुलु मनाली (हिमाचल प्रदेश) मध्ये भरणार होता. आणि त्या कॅम्पमध्ये सहभागी होण्यासाठी आम्ही पुण्यावरून जात होतो.

हा कॅम्प एन. सी. सी. तर्फे भरविला जात होता. मी एक ३ महाराष्ट्र नेव्हल युनिटचा विद्यार्थी आहे. आमच्या युनिटमधून फक्त चार मुले निवडली गेली होती. (मी, विक्रांत पाथरे, आनंद पंढरपुरे, विजय वाणी)

त्या दिवशी आम्ही ठीक दोन वाजता पुणे स्टेशनवर आमचे सर्व सामान घेऊन दाखल झालो. तेथे आमची प्रथम चौकशी केली गेली. आणि नंतर आम्हाला 'झेलम एक्स्प्रेस' पावणेचार वाजता स्टेशनवर लागते आणि पाच वाजून पन्नास मिनिटांनी सुटते असे सांगण्यात आले. आम्ही पुण्यामधून एकंदरीत २३ मुले होतो स्टेशनवर आमचे मित्रमैत्रीनी, आई वडील, नातेवाईक आम्हाला निरोप देण्यास आले होते. त्यामुळें आमचा डबा गजबजून गेला होता. आणि ठीक ५–५० वाजता झेमलने आम्हाला पहिला धक्का दिला.

दौंडला सोलापूर युनिटचे १७ मुले आणि नंतर मनमाडला औरंगाबाद युनीटचे ११ मुले चढली. अशा प्रकारे एकंदरीत महाराष्ट्राची ५१ मुले झाली. आमची गाडी सारखी धावतच होती. पहाटे पाच वाजता खडवा स्टेशनवर गाडी थांबली. येथे गाडी ९ वाजेपर्यंत उभी होती. १८ तारखेला सकाळी दहा वाजता 'आंबाला' या ठिकाणी आम्ही पोहोचलो. तेथून संध्याकाळी सहा वाजता आम्ही चंढीगडला निघालो व ९ वाजता चंढीगडला पोहोचलो रात्री कुल्लुला बसेस सोडत नाहीत म्हणून आम्हाला तेथेच मुक्काम करावा लागला. आणि दुसरे दिवशी आम्ही सकाळी ७ वाजता कुल्लुला जाण्यासाठी निघालो व संध्याकाळी ७ वाजता कुल्लुला पोहोचलो. लगेचच आमचे सामान तपासले गेले त्यात चाकू किंवा इतर हत्यार नाही याची खात्री करून घेण्यात आली आणि नंतर टेन्ट (तंबू) देण्यात आले. तेव्हाच मध्यप्रदेश, बिहार आणि उत्तर प्रदेशची मुले आली होती.

आमचा कॅम्प पाच ठिकाणी होता. १) बेस कॅम्प २) सोलांगनाला ३) कोठी ४) फेटॉटो मार्केट ५) मनाली गाव.

आमचा बेस कॅम्प व्यास नावाच्या नदी किनाऱ्यावर होता. डोंगरावरून वहात आलेले मोठमोठाले दगड आत पाण्यात असल्यामुळे पाण्याचा खूप आवाज येत होता. सर्व बाजूने डोंगर आणि डोंगरावरती गर्द झाडी होती आणि काही अंतरावर पडलेला पांढराशुभ्र बर्फ दिसत होता. या भागाची उंची समुद्रसपाटीपासून ४००० फुट आहे. दुसरे दिवशी आम्हाला विश्रांती

होती म्हणून आम्ही आंघोळीसाठी नदीमध्ये गेलो. पाणी एवढे गार होते की, आम्ही पाय सोडताच आमचे पाय सुन्न झाले.

आंघोळ झाल्यानंतर आम्ही टेन्टमध्ये गप्पा मारत होतो तेव्हा शेजारच्याच टेन्टमधील माने नावाचा विद्यार्थी आला. या मुलाने प्रवासात एक पॅक लंच जास्त घेतल्यामुळे म्हणून आम्हाला क्रालींग करण्यास लावले होते. दुपारी बारा बाजता डांबरी रस्त्यावर आणि त्यात भर म्हणजे रस्त्यावर बारीक रेती होती त्यामुळे पाच मिनिटामध्येच आमच्या कोपऱ्यामधून रक्त येत होते. शेवटी या मानेने कबूल केले आणि आम्ही या भयंकर यातनामधून एकदाचे सुटलो !

त्यानंतर आम्हाला २१ मे ला 'नग्गर' या ठिकाणी नेण्यात आले तेथे 'टोरीच आर्ट गॅलरी' आणि 'राधा कृष्णाचे मंदीर' पाहून घेतलो. दुसऱ्या दिवशी आम्ही २२ मे ला पोटॅटो मार्केटला गेलो. हे अंतर २२ कि. मी. आहे. रस्ता एकदम चढतीचा डोंगराळ वाट, खाले, खोलच खोलच दऱ्या होत्या. त्यात भर म्हणून वरून धुमाधार पाऊस पडत होता. रस्त्यामध्ये छोटया छोटया नद्या होत्या त्यात दगड टाकून वाट केलेली होती. दोन दगडामधील अंतर आपल्याला उडीच मारावी लागेल. आणि जर पाय घसरला तर कल्पनाच करवत नाही.

आम्ही पोटॅटो मार्केटपासून जवळ होते. तेव्हा आम्हाला एक हालता पूल लागला तो एकदरीत १५० फूट लांब आहे. दोन मूलांमध्ये ५० फुटांचे अंतर असावे लागते. एका वेळेस एकच मुलगा पूल क्रॉस करू शकतो. सुरुवातीस तर आम्हाला खूप भीती वाटत होती. अशा प्रकारे आम्ही संध्याकाळी पाच वाजता आमच्या नंवर दोनच्या कॅम्पला येऊन पोहोचलो.

दुसऱ्या दिवशी मनाली गावातील हडींबा मंदीर आणि इतर प्रेक्षणीय स्थळे पाहून आम्ही दुसरे दिवशी म्हणजे २८ मे ला सोलांगनाला या तीन नंबरच्या कॅम्पला जाण्यासाठी निघालो. मनाली ते सोलांगनाला हे अंतर २८ कि. मी. चे आहे. अतिशय दाट जंगल. पुढचा पाच फूट आणि मागचा पाच फुट एवढाच रस्ता दिसत होता. आमचा गाईड मनालीमध्ये भेटला होता तो परत नेहरू कुंडावरतीच भेटला आणि नंतर सोलांग नाल्यालाच भेटला.

नेहरू कुंडावर खूपच थंडगार पाणी मिळते आणि ते खडकामधून येत असल्यामुळे एकदम थंड आणि शूद्ध. आमच्या गाईडने सांगितले की, पंडीत जवाहरलाल नेहरूसाठी पिण्याचे पाणी येथून नेले जात असे. म्हणून कुंड असे म्हणतात.

येथे पाऊस नसल्यामुळे आम्ही संध्याकाळी खेळण्यास गेलो. तेथे व्हॉलीबॉलचा सामना प्रथम मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र यांच्यात झाला तेथे महाराष्ट्र संघाने सहज विजय मिळविला आणि नंतर एका बाजूस मध्यप्रदेश पंजाब ही राज्ये तर दुसऱ्या बाजूस महाराष्ट्राचा विजयी संघ होता. परंतु येथे सुद्धा महाराष्ट्राचाच विजय झाला. रात्रीच्या जेवणानंतर मला कमांडीग साहेबांना बरोबर घेऊन जाण्याचा तसेच करमणुकीचे कार्यक्रम झाले. येथे देखील महाराष्ट्राचेच मुले वरचढ ठरली. कारण आमच्याकडे चांगली गाणारी मुले तसेच शेरशायरीला चोख उत्तर देणारी बरीच मुले होती. आणि शेवटी आमच्या साहेबांनी आमच्या आग्रहा-नुसार एक गझल व एक जुने हिंदी चित्रपट गीत गाऊन दाखविले. पन्नास वर्षाचा म्हातारा परंतु तबेत एकदम ठणठणीत होती.

२५ मेला आम्हाला व्यास कुंडावरती नेले गेले. आमच्या या संपूर्ण ट्रेकमध्ये व्यास नावाची नदी होती. ती नदी जेथून उगम पावते त्याला व्यास कुंड असे म्हणतात.

दुसरे दिवशी म्हणजे २६ मेला आम्हाला कोठी या ठिकाणी नेले. जेव्हा आम्ही सोलांगनाला सोडत होतो तेव्हा आम्हाला सांगण्यात आलं होतं की वाटेत शत्रू आहे तो तुमच्यावरती गोळीबार करेल तेव्हा जपून रहा आणि खरोखरच थोडेचे अंतर चालून गेल्यानंतर आम्हाला गोळीबाराचे आवांज ऐकू येऊ लागले. आम्ही मनामधून घाबरलो होतो. परंतु ताबडतोब आम्हाला क्रॉलींग करण्याची आज्ञा मिळाली. क्रॉलींग करत पुढे चालत होतो. थोडयाच वेळात आवाज थांबले आणि थोडेसे पुढे गेल्यानंतर आम्हाला एका दोरीला काही ठराविक अंतरावर दिवाळीमधील फटाके बांधलेले दिसले. ती दोरी पेटविली होती. त्यामुळे थांबून थांबून आवाज होत होते. नंतर थोडेसे पुढे गेल्यानंतर एक खोलच खोल दरी लागली. त्या दरीमध्ये एवढा जोरात वारा वाहत होता की आमच्या ऑफिसरचा आवाज देखील ऐकू येत नव्हता आणि वाट एकदम नागमोडी होती. बऱ्याच ठिकाणी ती दोन ते तीन भागात विभागलेली होती. त्यावेळेस मला आमची परीक्षा

होती कारण पुढचे विद्यार्थी आणि गाईड दिसत नव्हता. कोणता रस्ता पकडावा हेच सुचत नव्हते तेव्हा आम्ही बुटाच्या रस्त्यावर उमटलेल्या ठश्याने रस्ता काटत गेलो आणि तो बरोबर ठरला. कारण रस्ता कच्चा होता. मातीत रुतलेला बूट हा आमचा आहे हे आम्ही चांगले ओळखत होतो.

२८ मेला आम्हाला मत्री या ठिकाणी जायचे होते. मऱ्हीचा रस्ता मात्र एकदम चढतीचा आहे. बऱ्याच ठिकाणी कपारीमध्ये हात पाय घालून आम्हाला वर चढावे लागत होते.

२९ मेला आम्ही मनाली गावात म्हणजे पाच नंबरच्या कॅम्पमध्ये आलो तेव्हा तेथे आमचे कर्नल आर. के. चोपडा यांच्याकडून स्वागत करण्यात आले.

आम्ही महाराष्ट्रातले एकंदरीत ५२ विद्यार्थी होते. हा सर्वात मोठा ग्रुप होता. परंतु कोठेही वेळ करत नव्हतो. कोठेही मारामारी किंवा गैरव्यवहार होत नव्हता. त्यामुळे प्रत्येक कॅम्पमध्ये जेव्हा आम्ही कॅम्प सोडत होतो तेव्हा तेथील कमांडींग ऑफिसर कोणता ग्रुप चांगला ठरला याबद्दल माहिती देत होते आणि प्रत्येक ठिकाणी महाराष्ट्र ग्रुपच वरचढ ठरत होता हे विशेष !

२९ मे ची रात्र आम्ही मनाली गावात काढली आणि दुसरे दिवशी म्हणजे ३० मे ला आम्ही परत बेस कॅम्पला आलो. मनाली गाव ते बेस कॅम्प हे अंतर ३० कि. मी आहे.

कॅम्प काळात आम्ही गेलेल्या ठिकाणापैकी सुरवातीची उंची समुद्रसपाटीपासून ४००० फूट होती तर शेवटच्या ठिकाणची उंची म्हणजे मऱ्हीची उंची १२००० फुट होती.

आम्हाला ३० आणि ३१ मे हे दोन दिवस फिरण्यासाठी देण्यात आले होते आणि १ जूनला आम्ही परत येण्यासाठी निघणार होतो.

१ जूनला सकाळी बरोबर ५ वाजता सर्व माहिती घेवून आम्ही कॅम्प सोडत होतो. खरे पाहता आम्हाला तो भाग सोडावाच वाटत नव्हता. जेव्हा पुण्यावरून आम्ही कॅम्पला येण्यासाठी निघालो तेव्हा खूप वाईट वाटत होते. जवळ जवळ एक महिना, आपल्या घरापासून दूर राहणे थोडे कठीणच वाटत होते. उगीचच कॅम्पला जात आहोत असे वाटत होते. परंतु आज मात्र हा भाग सोडूच नये असे वाटत होते. परंतु सोडणे भागच होते.

शेवटी तेथील निसर्ग दैव–दैवताला नमस्कार करून आणि मनामध्ये देवाला विनंती करीत होतो. 'हे परमेश्वरा, मला पुन्हा पुन्हा या भागात येण्याची बुद्धी आणि संधी दे.' एवढी प्रार्थना करून मी बसमध्ये चढणार तेवढ्यात अक्षरशः माझ्या डोळ्यात पाणी आले. हे आमच्या ऑफिसरच्या तसेच तेथील कमांडींग ऑफिसरच्या लक्षात आले, त्यांनी मला बोलावून घेतले आणि माझ्या पाठीवर हालकेसे थोपटले. मला खरोखरच आश्चर्य वाटत होते की आमचा जो C. O. ग्राऊंडर एवढा कडक होता तो एवढ्या प्रेमाने मला निरोप देत आहे. जेव्हा मी त्याच्या डोळ्यात पाहिले तेव्हा त्यांना काही तरी सांगायचे होते, परंतु ड्रायव्हर थांबण्यास तयार नव्हता. तो सारखा हॉर्न वाजवीत होता. म्हणून शेवटी त्याने परत एकदा हालकेसे माझ्या पाठीवर थोपटले आणि हालकेसे ओठातून शब्द फुटले, 'Good bye' फक्त एवढ्या शब्दावरून आणि त्याच्या डोळ्यातील भावनावरून माझ्या बरेच लक्षात आले. कारण माझी आणि त्यांची चांगली ओळख झालेली होती. त्याचं नाव होतं 'रामप्रसाद मिश्रा' मिलिटरीमध्ये एवढे प्रेमळ लोक असतील असे मला वाटले नव्हते.

हिमाचलप्रदेशमधील हवामान खूपच मजेशीर आहे. दिवस साधारणतः थोडासा उष्ण असतो. परंतु रात्री मला खूप थंडी वाजते. तेच हवामान रोज नसते. काही वेळेस दिवसासुद्धा थंडी असते, तर काही वेळेस तर हिवाळा, पावसाळा, उन्हाळा हे तिन्ही ऋतु एकाच दिवशी पहावयास मिळतात.

येथे एप्रिलमध्ये पेरणी सुरू होते. येथे जास्त करून गहू, तांदूळ तसेच मका पिकवतात आणि भाज्यामध्ये मात्र बटाटे जास्त करूनच पिकतात. बटाट्याचा सर्वात उत्पन्न काढणारा जिल्हा म्हणून 'महासू' हा जिल्हा ओळखला जातो. येथे सफरचंद तसेच चेरी खूप पिकतात.

येथील लोकांचा मुख्य व्यवसाय म्हणजे मेंढ्या पाळणे तसेच मेंढ्यापासून लोकर काढून त्यापासून बनविलेल्या वस्तूंची विक्री करणे असे अनेक प्रकारचे व्यवसाय केले जातात. साधारणतः येथे पुरुषापेक्षा स्त्रियाच जास्त काम करतात.

अशा प्रकारे १६ मेला आम्ही कॅम्पला गेलेले ४ ४ जूनला परत पुण्याला एकंदरीत १३१ किलोमीटरचा ट्रॅकी करून परत आलो. यानंतर पुन्हा जीवनात या भागात जाण्याचा योग नाही आला तरीसुद्धा मी या भागाला कधीही विसरू शकणार नाही. हे दिवस माझ्या जीवनातील अपूर्व दिवस होते. ●

# न विसरणारे क्षण महान् क्रिकेटपटूंच्या क्रीडा–जीवनात

प्रा. सुरेश दातार

जगप्रसिद्ध क्रिकेटपटूंच्या क्रिकेट–जीवनातही काही अकस्मात असे क्षण येतात की त्यावेळी ते भांबावून जातातच, पण पुढेही ते क्षण विसरत नाही. असे काही क्षण 'क्रिकेटिंग मेमॉयर्स' ह्या पुस्तकात वाचावयास मिळतात.

त्या आठवणी आहेत जगत्–विख्यात क्रिकेट खेळाडूंच्या सुनील गावस्कर, इम्रान खान, इयान चॅपेल, रिचर्ड हॅडली, जयसिंहा, डेनिस लिली, हनीफ मोहंमद, व्हिव्हियन रिचर्डस्, फ्रॅंक टायसन, अजित वाडेकर त्यांच्या त्या खेळाडूंची सर्वांनाच ओळख आहे, ती करून द्यायची गरजच नाही. ह्यापैकी गावस्कर, इम्रानखान, इयान चॅपेल व रिचर्ड हॅडली ह्यांच्या आठवणीतील महत्त्वाचे क्षण आपण बघणार आहोत. ते क्षण बघा त्यांनी कसे पकडलेत, आठवणीत जवून ठेवलेत ते काही आनंदाचे, गंमतीचे तर काही निराशेचे–

## सुनील गावस्कर

आपल्या जीवनात महत्त्वाचे टप्पे, मिळविलेले अत्युच्च यश, नशीबाची साथ अथवा अतीव पराभवाचे, अपयशाचे चटके चटकन् प्रत्येक खेळाडूंच्या लक्षात राहातातच. पण अशाही काही घटना असतात की त्या कमी महत्त्वाच्या असल्या तरीही गोंधळून टाकणाऱ्या पण नाट्यमय व मनोरंजकही असतात.

अशाच माझ्या आठवणी १९७६ च्या न्यूझिलंड विरुद्धची मालिका गाजली ती कडाक्याची जीवघेणी थंडी व पंचांचे निर्णय ह्यांनीच. ती संपली व आता आमचा वेस्ट इंडीजचा दौरा सुरू होणार होता. अशा देशांत की जेथे १९७१ मध्ये माझ्या क्रिकेट जीवनाची एक दैदीप्यमान सुरुवात करण्याचं भाग्य मला लाभलं होतं.

पण त्या आनंदाच्या क्षणी मात्र वेलिंग्टन कसोटी सामान्यात झालेल्या जखमेमुळे मी अतिशय दुःखी झालो, कारण डॉक्टरांनी मला दिवसांची सक्तीची संपूर्ण विश्रांती घ्यावयाचा आदेश दिला होता.

आमचे व्यवस्थापक पॉली उम्रीगर ह्यांना मी विनंती केली की मला उपचारासाठी न्यूयॉर्कला राहू दे व नंतर मी वेस्टइंडीजला येईन. बऱ्याच विनवणीनंतर ते तयार झाले. सहव्यवस्थापक बालू अनघनन माझ्याबरोबर न्यूयॉर्कला राहिले. अतिशय साधा व निर्मलमनाचा माणूस हा. फेब्रुवारी अखेरची न्यूयॉर्कची थंडी व पाऊस. अशा वातावरणात मी अनघनना 'डीप थ्रोट' हा सिनेमा बघण्यास भाग पाडले. संपूर्ण सिनेमात त्यांचं लक्ष नव्हतंच, तर नाराजी व्यक्त करणारे आवाज काढणे हेच काम त्यांनी केले. सिनेमा संपला, त्यांनी हुश्श् असं म्हटलं. सिनेमातलं काही तरी मी त्यांना मुद्दामच खोदून विचारलं, पण त्यांना उत्तरच देता येईना. त्या माझ्या प्रश्नाबद्दल ते मला कधी क्षमा करतील असं मला वाटत नाही.

न्यूयॉर्कला आमचा संघ पोहचला होता तेव्हा कडा-

क्याची थंडी होती. वहातूक–व्यवस्था नेमकी काय आहे हे उम्रीगरनांही कळेना व सर्व संघ साध्या वेषात विमानतळाबाहेर आला व गारठला. सुदैवाने उबदार कोच तयार असल्याचे कळले तेव्हा सगळ्यांचा जीव भांड्यात पडला.

मार्चच्या सुरुवातीला मी भारतीय संघात बार्बाडोज् येथे रुजू झालो. त्या आधीच लिवर्ड व विंडवर्ड बेटांच्या संघाशी सामने झाले होते. सरावासाठी म्हणून एका स्थानिक संघाशी सामना मी खेळलो. बॅट इकडे–तिकडे फिरवली खरी, पण मनात समाधान मात्र झालं नाही. तरीही कसोटी सामान्यात अधिक चांगली कामगिरी होईल ही आशा मनात होती. हा स्थानिक सामना आधी डावाने हारलो. बिशन बेदीच्या अनुपस्थितीत मी संघाचे नेतृत्व केले. म्हणूनच हरणं ही गोष्ट मनाला लागली हे खरं परंतु ह्या बेटावरच्या वातावरणानी आम्ही अगदी भारून गेलो होतो. इतके की त्या रात्री त्रिनिदाद कॅलिप्सो संगीत ऐकण्याचा आम्ही निर्धारच केला. ही न विसरणारी रात्र कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवसाचीच. आमचा संघ पहिल्याच दिवशी १७७ धावांतज गारद झालेला. पुढचा दिवस म्हणूनच महत्त्वाचा.

पण म्हणतात की कधीकधी सैतानच तुमचा संपूर्ण ताबा घेतो. म्हणूनच त्या रात्री आम्ही मोकळ्या हवेत नाईट क्लबकडे वळलो. बरोबर साथीला होते सुरिंदर अमरनाथ, पार्थसारथी शर्मा व एकनाथ सोलकर. त्या क्लबमध्ये आम्ही मुद्दामच अंधारी, सहजासहजी न दिसणारी जागा पकडली. हो, कोणी ओळखावयास नको. आसपासच्या टेबलावर कॅनेडियन प्रवासी, चित्र तारे–तारका, श्रीमंत खुशालचेंडू होतेच. ह्या वातावरणात संगीताचा आस्वाद आम्ही घेत होतो. पण... एकाएकी रंगमंचावरचे स्पॉटलाईट आमच्या दिशेने फेकले गेले व प्रमुख गायकाने एकदम मोठ्या स्वरात 'आम्ही स्वागत करतो लिट्ल मास्टरचं व त्याच्या सहकारी खेळाडूंचं' असं म्हणून आम्हाला उभे राहून स्वागत स्वीकारण्यास भाग पाडलं. त्यावेळी आम्हाला काय करावयाचे हेच कळेना. आम्ही अगदी भांबावून, गोंधळून गेलो खरे.

आमची ही स्थिती तीव्र करणारी घटना म्हणजे आमच्या टेबलापासून थोड्याच अंतरावर एक वार्ताहर होता. साधासुधा नव्हे, तर प्रख्यात समालोचक व पत्रकार टोनी क्रोझियर! खरं तर मध्यरात्र उलटलेली होती. आमच्या त्या दिवशीची सामन्यातली कामगिरी अतिसामान्य होती. पण क्रोझियरचे आभार मानावयासच हवेत कारण आमच्या त्या रात्रीच्या सफरीबद्दल त्याने अवाक्षरही काढले नाही. तरीही एक गोष्ट मुद्दाम सांगावयास हवी की त्या 'रात्रीच्या आम्ही साथीदारांनी' दुसऱ्या दिवशी कसोटीत झेल सोडलेच.

ह्यातच मला वाटतं सगळ्यांनी धडा शिकण्यासारखा आहे.

(गावस्कर नशिबवान खराच आहे. अन्यथा क्रोझियरने ही बातमी फोडली असती अन् आजच्या काळात तर गावस्करसकट इतर त्याचे त्या रात्रीचे साथी ह्यांवा क्रिकेट कंट्रोल बोर्डाने, वेंगसरकरप्रमाणे क्रिकेटमधून हद्दपार केले असते अन् मग ?)

## इम्रानखान

आंतरराष्ट्रीय क्रिकेट क्षेत्रात केरी पॅकरने एक वादळ उठविले व अनन्य साधारण असा ठसा उमटविला हे मी मान्य करतो. पण त्यामुळेच माझ्या क्रिकेट–जीवनात एक खेदजनक वादळ निर्माण झाले हे तितकेच खरे.

पॅकरमुळे एक अपारंपारिक क्रिकेट सुरू झाले. रात्रीचे क्रिकेट, रंगीबेरंगी कपडे, नवीन नियम, आकर्षक जाहिरातबाजी, उत्कृष्ट दूरदर्शन प्रक्षेपण, अधिक पैसा. असे असले तरी हे क्रिकेट प्रामाणिक व स्पर्धात्मक होते हेही सत्यच !

लक्षात घ्या, तुम्ही गोलंदाज असाल तर तुम्ही रिचर्डस्, लॉईड, चॅपेल ह्यांना बंधू बाद करण्याची पराकाष्ठा करणार. तुम्ही फलंदाज असाल तर अँडी रॉबर्टस्, लिली ह्यांना तुम्हाला तोंड द्यावे लागणार.

ह्याच काळात, पाकिस्तान संघ निवडीबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले कारण त्यांचे महत्त्वाचे व जागतिक प्रतिष्ठा लाभलेले खेळाडू पॅकरकडून खेळत होते. अशा वेळी पाकिस्तानचा नावाजलेला समालोचक उमर कुरेशी आम्हाला ऑस्ट्रेलियात भेटला. जहीर अब्बास, मुश्ताक मोहंमद व माझे मन पाकिस्तानकडून कसोटी खेळण्यासाठी त्याने वळविले. असिफ इक्बाल आधीच निवृत्त झाल्यामुळे व मजिदखान पत्नीच्या आजारपणामुळे सामील झाले नाहीत. पारंपारिक कसोटी सामने

खेळावयास मिळण्याच्या आनंदामुळे आम्ही उत्तेजित झालो होतो. मात्र आमच्याच देशात आमचे स्वागत कसे होईल ह्याची आम्हाला कल्पना नव्हती.

आम्ही पाकिस्तानात उतरल्याबरोबर आमच्या स्वागतासाठी कोणीही उपस्थित नव्हते. ह्यावरून खरं तर पुढील घटनांची आम्हाला कल्पना यावयास हवी होती. आमचं आगमन कोणाला माहितीही नव्हते. मुश्ताक व जहीर कराचीतच राहतात म्हणून त्यांना काही अडचण आली नाही. मी मात्र विमानतळावर एकाकीच घुटमळत राहिलो.

दुसऱ्या दिवशी मी स्टेडियमवर गेलो. जहीर व मुश्ताकला क्रीडांगणावर निरर्थकपणे हिंडताना पाहून मनात पाल चुकचुकलीच. शेवटी आम्ही तिघेजण निवड समितीला भेटलो. आमचे स्वागत मात्र अतिशय थंडपणे झाले. उलट आम्ही आल्याबद्दल त्यांना आश्चर्य व गंमतही वाटली. नाईलाजाने शेवटी त्यांनी सराव करण्याची परवानगी दिली.

ह्या घटनांमुळे मला अतिशय अपमानास्पद वाटले. आम्ही इथे का आलो हा प्रश्न पडला. आम्ही म्हणजे नको असलेले खेळाडू हे आम्हाला जाणीवपूर्वक दाखवून दिले गेले. कर्णधार वासीम बारी तर स्पष्ट म्हणाला, 'तुम्हाला इथं कोणी बोलावलं? तुम्ही खेळणार आहात हे कोणी तुम्हाला सांगितलं?'

त्यानंतर वरिष्ठ पातळीवर निवडसमिती सभासद मोहंमद हुसेन व इतर अधिकारी त्यांची बैठक होऊन आम्ही पॅकरचे खेळाडू पाकिस्तानकडून कसोटी खेळू शकतो असे ठरले. पण एका अटीवर– आम्ही पॅकरच्या जागतिक क्रिकेट साखळी सामन्यांचा जोरदार निषेध केला तरच.

आमची समजूत अशी होती की उमर कुरेशीने पॅकरशी बोलणी केली असणारच, पण नियामक मंडळाचे मत असे होते की कुरेशीला अशा प्रकारचा कोणताच अधिकार नव्हता. एकंदरीत त्या सर्व घटनांमुळे माझे वैयक्तिक आर्थिक नुकसान खूपच झाले.

खरी गोष्ट ही कालांतरानंतर उघड झाली. इंग्लंडच्या खेळाडूंच्या दबावामुळे पाकिस्तान क्रिकेट नियामक मंडळाने मान तुकविली होती. कारण पॅकरला खरा विरोध इंग्लंडमधूनच झाला होता. तथापि शेवटी १९७८ मध्ये त्याकारणाने इंग्लंडने इंग्लंडमध्ये पाकिस्तानचा दारूण पराभव केला हेच सत्य.

पॅकर–सर्कसचा खेळाडू म्हणून मला वाळीत टाकले खरे, पण ह्याच सर्कशीतले जावेद मियांदाद, हरुन रशीद व सर्फराज पाकिस्तानकडून त्यावेळी खेळले.

ह्या दुःखद घटनेला सुखाची झालर म्हणजे पाकिस्तान क्रिकेटमध्ये नंतर शांतता प्रस्थापित झाली. भारतात मी कसोटी सामने खेळलो. जागतिक जलद गोलंदाज स्पर्धेत मी तिसरा आलो. मायकेल होल्डिंग दुसरा तर जेफ थॉमसन पहिला.

(ह्याच इम्रानला नंतर कर्णधार पद दिले गेले. ते त्याने समर्थपणे पेलले. रिलायन्स कपच्या पराभवानंतर त्याने निवृत्तीही जाहीर केली, पण नंतर राष्ट्राध्यक्षांच्या विनंतीवरून देशाकरिता परत तो कर्णधार झाला आहे व वेस्टइंडिजच्या बलाढ्य संघाला हरविण्याची जिद्द बाळगून आहे. काळाचा महिमा म्हणतात तो हाच!)

## इयान चॅपेल

एक ऐतिहासिक फोटो तुम्ही पाहिला असेलच. लिड्सच्या मैदानावरील ॲशेसचा कसोटी सामना. त्या फोटोत इंग्लंडचा कर्णधार टोनी ग्रेग टाय व सूट घातलेला पण मी मात्र अगदी साध्या चुरगळलेल्या पोशाखात–साधा शर्ट, जीन पँट व पायात फक्त चपला. आम्ही दोघेही कोणी तरी खणलेली सामन्याची खेळपट्टी पाहत होतो. ही गोष्ट १९७५ च्या उन्हाळ्यातली. हा सामना नाईलाजाने बंद करावा लागला. तरीही वृत्तपत्रांतील फोटोमुळे जगात खळबळ माजविली. त्या घटनेला एक इतिहास आहे.

मी अशा वेशात का होतो? माझी मुद्रा आळसावलेली, नुकतीच झोपेतून उठल्यासारखी फोटोत कशी आली? ह्या इतिहासाची सुरुवात माझा सहकारी खेळाडू रॉडनी मार्शमुळे झाली. ग्रेग चॅपेल, मार्श व मी आदल्याच दिवशी कसोटी सामन्यात बाद झालो होतो. म्हणूनच निवांतपणे आमचे त्रिकूट एका बारमध्ये जमले. खूप मजा आली. भरपूर प्यायले व नंतर जुगार खेळण्यासाठी जवळच असलेल्या कॅसिनोमध्ये गेलो. मार्शचं नशीब जोरावर होतं. मला वाटतं साधारणतः पहाटे ४॥–५ ला आम्ही तेथून बाहेर पडलो. आमचं हॉटेल बरेच दूर होते. तेथे जाऊन गादीवर अंग टेकेपर्यंत सूर्योदय झालाच होता.

एकाएकी फोन खणाणला. आठ वाजले होते. आमचा व्यवस्थापक फ्रेड बेनेटचा हा फोन झोपेत असल्यामुळे तो नेमके काय म्हणतोय हे उमजेना. तो सांगत होता, 'इयान, कोणीतरी खेळपट्टी खणून ठेवलीय बघ.' मी म्हणालो, 'उगीचच गंमत करावयाची ही वेळ नाही, मला झोपू दे.' पण नंतर माझ्या लक्षात आलं की बेनेट गांभीर्याने सांगतोय. मी ताडकन् उठलो. दाढी व आंघोळीची पर्वा न करता हाताला आले ते कपडे चढविले, पायात दिसल्या त्या चप्पल घातल्या व मैदानावर आलो आणि म्हणूनच त्या फोटोमध्ये कर्णधाराने नसाव्या अशा पोशाखात मी दिसलो हेच खरे!

(शारजात रवि शास्त्रीविरुद्ध अशीच तक्रार होती. रात्रभर जागून दुसऱ्या दिवशी त्याची कामगिरी (?) निकृष्ट झाली. पण त्याचा फोटो ?)

## रिचर्ड हॅडली

माझ्या क्रिकेट जीवनात मी न मोजता येण्याइतक्या स्वाक्षऱ्या दिल्या आहेत, पण माझ्या क्रिकेट–जीवनाच्या सुरुवातीला आलेला अनुभव मात्र मी कधीच विसरणार नाही. ही गोष्ट १९७१–७२ कँटबरीकडून खेळण्याच्या मोसमातली.

त्या सामन्यात सुपरिचित व गाजलेले खेळाडू खेळत होते. मी नवीन खेळाडू होतो. एकाएकी एका छोट्या मुलाने एक वही माझ्या हातात खुपसली व म्हणाला, 'स्वाक्षरी करा.' मी त्या वहीच्या कागदावरून नजर फिरवली. त्यावर हॉवर्थ, क्यूनीस, मॉर्गन ३० बड्या खेळाडूंच्या स्वाक्षऱ्या होत्या. मग मीही स्वाक्षरी केली. त्या छोट्याने एकदम मला विचारले, 'तुम्ही कोण ?' 'मी रिचर्ड हॅडली, नवीन खेळाडू.' मी उत्तरलो. त्याबरोबर तो म्हणाला, 'मग मला तुमची स्वाक्षरी नकोच. केलीत ती कशी खोडावयाची हे सांगाल का ?' मी अगदी गोंधळून गेलो.

(आपल्याकडे कोणीही स्वाक्षरी देतो. मात्र स्वाक्षरी करणारा हुशार असतो. आपलं नाव सांगत नाहीच, पण अशी काही स्वाक्षरी करतो की त्यावरून ही कोणाची स्वाक्षरी आहे हे ब्रह्मदेवालाही कळत नाही !)

●

---

## बोलायचे तुझ्याशी.....

बोलायचे तुझ्याशी लाखदा हे ठरवतो
तुज पाहता सामोरी शब्द सारे विसरतो.
माझे मला न कळते हे असे घडतेच का ?
ओठांवरी असे हे बोलणे अडतेच का ?
माझ्याच वागण्याचा अर्थ मला उकलतो
करतो तुझी प्रतीक्षा मी तुझ्या वाटेवरी
बघशील एकदा ही घेऊनी आशा उरी
माझ्या मनातला भाव तुज ना समजतो
सांगू कशी तुला मी अंतरीची भावना
वाटे तुझ्याविना या अर्थ नाही जीवना
वणवा तुझ्या स्मृतींचा रोज हृदयी भडकतो

**प्रदीप कुलकर्णी**
प्रथम वर्ष वाणिज्य, 'ड'

## नकळत

मनात नसताना कधी तरी
दुसऱ्यांना दुखवावं लागतं
उत्तर माहीत नसलेल्या प्रश्नाला
कधीतरी सामोरे जावे लागते
मनात नसताना कधीतरी
दुसऱ्यांना फसवावं लागतं
ध्येय माहीत नसलेल्या वाटसरूला
कधीतरी मिळेल त्या वाटेने जावे लागते
कारण.........
फांदीच्या मनात नसताना कधीतरी
फुलाला डहाळीवरून पडावं लागतं

**गणेश वडगावकर**
द्वि. व. शास्त्र

---

# मी व माझे ‘ मानसशास्त्रीय ’ विद्यार्थी

प्रा. सौ. आशा परुळेकर

प्रत्येक शिक्षकाला–मग तो विषय मराठी असो की रसायनशास्त्र–एकदा तरी असा विचार स्पर्श करून गेल्याखेरीज राहात नाही ‘ हेची फल काय मम अध्यापनाला ?’

गेले काही वर्षे मानसशास्त्र हा भारतीय मनाला अजूनही ‘ गहन ’ वाटणारा विषय मी शिकवून, हे विचार अजूनच ठाम झाले आहेत. आधीच बऱ्याचश्या विद्यार्थीगणाला सर्व मास्तर खडूस वाटतात. मग माझ्या विषयातील शास्त्रज्ञ मंडळीच मुळी इतकी किचकट नावे घेऊन येतात की बिचारे विद्यार्थी निम्मे गारद होतातच ! जणू शिक्षणाची ‘ आच ’च त्यांना लागते.

उदाहरणच द्यायचे झाले तर फ्रॉइडचे ! (Freud) या महान शास्त्रज्ञाने मानवी मनाच्या अबोध पातळीसंबंधी संशोधन केले आहे. विविध वर्तन विकृतींची कारण मीमांसा करताना आपल्या दैनंदिन व बोलीभाषेतील चुका कशा जबाबदार ठरतात हेही विषद केलेले आहे. पण त्याचा नावाचा अपभ्रंश जेव्हा फ्राइड (Fried) असा एखाद्या विद्यार्थ्याकडून केला जातो. मला वाटते तेव्हा फ्रॉइडमहोदय स्वतःच तेथे हजर हवे होते, कारण बहुधा त्यानेही अशा विद्यार्थ्यांच्या अबोध मनाचा कानोसा घेत म्हटले असते, ‘ बहुधा या मुलाला असे वाटत आहे की, ‘ फ्राइडने आम्हाला खरोखरच गूढ अशा विचारात घोळवलेले आहे. आमचंच इथं ‘ भजं ’ होत आहे. ’

आता जर्मन, ऑस्ट्रीयन मंडळींची तर अजूनच दुर्दशा झालेली आहे. बिचाऱ्या कोहलरने (Cohler) सुलतान या चिंपाझीवर प्रयोग करून विशिष्ट विषयांचे अध्ययन आपण मर्मदृष्टी ( insight ) वापरून कसे करतो हे विशद केले आहे. पण काही सूज्ञ विद्यार्थी मंडळी जेव्हा सुलतान या थोर मानसशास्त्रज्ञाने कोहलर या चिंपाझीवर कसे प्रयोग केले आहेत हे स्पष्ट करतात. तेव्हा त्यांच्या मार्मिक दृष्टीचे ‘ मर्म ’ उघडे पडते.

काही विद्यार्थी तर फारच उदारमतवादी आढळतात. शास्त्रज्ञांची नावे व त्यांची काही क्षेत्रे याबाबत त्यांचा अभ्यासू खूपच सखोल आढळतो. श्री. स्मिथ, सौ. जॉन, श्री. व सौ. अलेक्झांडर अशी थोर मंडळी विविध विद्यार्थ्यांच्या उत्तर पत्रिकेत हजेरी लावून, नेहमी नवनवीन उपपत्ती जगजाहीर करतात. फक्त मला एवढेच कोडे पडते की, इतके वर्ष या विषयाचा अभ्यास करून आपल्या वाचनात हे शास्त्रज्ञ कसे बरे आले नाहीत ?

जर्मन लोकांनी केवळ ‘ महायुद्धे ’च घडवून आणली असे मत आता मी मान्य करायला धजावत नाही. मानसशास्त्राचा अभ्यास विषय–वर्तन–स्पष्ट करताना त्यांची जी एक विचारसरणी आहे तिला Gestalt school म्हणजे समष्टीवाद असे म्हणतात. याचे सार कोणताही वर्तन प्रकार प्रथम साकल्याने व नंतर पृथकपणे विश्लेषित करून अभ्यासावा असे आहे. पण या

विचारप्रणालीकडे विद्यार्थी फारच वेगळ्या चष्म्यातून पाहतात. एखाद्या उत्तरपत्रिकेमध्ये श्री. गेस्टॉल असे म्हणतात असे जेव्हा लिहिलेले आढळते तेव्हा उगीचच डोळ्यावर चष्मा, बुटबैंगण, तुंदीलतनू, काळा सुट व टाय लावलेले 'प्राध्यापक गेस्टॉल' माझ्या नजरेसमोर उभे राहतात. आपलीच वाचण्यात वा शिकवण्यात काही चूक झाली नाही ना असे वाटते.

मानसशास्त्रात संवेदन (Perception) शिकवताना इंद्रियभ्रम (Illusion) ही संकल्पना शिकवावी लागते. पण हा भ्रम 'भ्रमण' करेल किंवा करतो असे मला वाटले नव्हते. मिळालेल्या उद्दिपकांचा Stimuli जेव्हा आपण चुकीचा अर्थ लावतो त्याला इंद्रियभ्रम म्हणतात. मृगजळ हे त्याचे उदाहरण ! पण 'इंद्रिय-भ्रमण' हा अनुभव सर्व वेदक इंद्रियांना येतो हे विधान एकाने वर्गात केले. तेव्हा उगाचच माझ्या डोळ्यासमोर 'नाक'राव 'डोळे' बाईंच्या हातात हात घालून जरा फिरून येतो' असे म्हणत असल्याचे चित्र उभे राहते. व 'कान'राव त्यांच्याकडे 'कर्ण टवकारून' बघत आहेत असेही वाटते.

बी. एड्. ला 'शिक्षणशास्त्र' विषयात, आपल्या विद्यार्थ्यांना कोणताही विषय हा दक्श्राव्ये साधने वापरून शिकवावा असे तत्त्व घोकले होते. त्यामुळे अध्यापन पेशातील पहिल्यावर्षी अत्यंत उत्साहाने मी 'मेंदू'चे मॉडेल नेले होते. सर्व विद्यार्थ्यांना बरोबर दिसते की नाही असा प्रश्न केला असता 'मिस तुमचा मेंदू नीट दिसला.' हे उत्तर मिळाल्यावर आपण जिवंत का मृत आहोत असे तेव्हा वाटले होते.

पण खऱ्या शिक्षकाची कसोटी व हातोटी हीच असते की, कोणत्याही व्यावसायिक आपत्तींना न डग-मगता 'ज्ञानार्जन' चिकाटीने करावयाचे. अपयशाने खचून गेला तर तो आदर्श शिक्षक कसा ? म्हणून दर परीक्षेच्या वेळेस स्थितप्रज्ञ राहून मी उत्तरपत्रिका तपासण्याचा मानस बाळगते. पण त्याची सांगता मात्र वेगळ्याच प्रकाराने होऊ पाहाते.

मानसशास्त्र शरीरशास्त्राचा आधार घेते त्यामुळे साधारणपणे 'आकृत्या काढा' हा प्रश्न असतोच पण 'नेत्रगोलाचा छेद' काढा असा प्रश्न दिला असताना उत्तरपत्रिकेतील 'मुक्तशैली'चा वापर करून काढ-लेल्या आकृत्या पाहून मलाच दृष्टिदोष झाला नाही ना असे वाटते ! काढलेला नेत्र हरणाक्षी तरी असतो नाहीतर काही अनाकलीय कारणांमुळे जायबंदी तरी असतो.

तीच गत मज्जारज्जूची ! (Spinal Cord) यालाच बोलीभाषेत आपण पाठीचा कणा वा मणका म्हणतो. शिकवताना 'बालमना'वर अध्ययन विषयाचे ठसे उमटवावेत हे माझ्याच मनावर इतके ठसले गेले आहे की 'मज्जारज्जूचा उभा छेद' हा फुलपाखरू (किंवा इंग्रजी एच् 'H') या अक्षरासारखा दिसतो शिकवल्यावर मज्जारज्जूच्या छेदाची आकृती काहीजण फारच 'आगळी' काढतात. स्वच्छंदपणे फुलपाखरांचे थवे बागडताना दिसतात.

अलिकडचे चित्रपट-त्यातल्या त्यात-हिंदी अत्यंत 'बालबोध' (अक्षरशः) असतात. कारण सर्व बाल-वर्गावर त्याचा फारच खोलवर परिणाम घडलेला आढळतो. त्यातील नट, नटयांची नावे त्यांना मुखोद्गत असतातच ! पण त्यांच्या खाजगी जीवनाचेही त्यांना खूप ज्ञान असते. परत चित्रपटाविषयक मासिके वाचून त्यांचे 'इंग्रजी' सुधारते ते वेगळेच ! याची प्रचिती आमच्यासारख्या 'अल्पज्ञानी' शिक्षकांना न मिळा-ल्यास काय नवल ?' 'हेरॉइन'(heroin) हे कोणत्या प्रकारचे द्रव आहे ? असा प्रश्न विचारल्यावर काही विद्यार्थ्यांना माझ्या मराठी व्याकरण व शब्द संग्रहाची कीव आली. हा प्रश्न चूक आहे. हे पटवून परत माहिती देण्यात येते की, 'हेरॉइन' (heroine) म्हणजेच अभिनेत्री ! या उत्तराने मला 'नशा' न आल्यास काय नवल ?

मागील सत्रामधील परीक्षेतील एक किस्सा तर तर अवर्णनीय आहे. एका उत्तरपत्रिकेत आपण चुकून 'मुक्तचित्रे' काढा असा प्रश्न घातला आहे का असा संदेह आला. बऱ्याच पानांवर पर्वतीदर्शन, पेशवे उद्यान अशी चित्रे काढलेली होती. त्या चित्रकारांस या आत्माविष्काराचे कारण विचारल्यावर उत्तर फारच मासलेवाईक मिळाले. 'मिस, तुम्हीच सांगितले होतेना की मानवी वर्तन हे बाह्य परिस्थितीवर अवलंबून असते ? माझ्या घराच्या अवतीभोवतीच्या रम्य परि-सराचा परिणाम मग माझ्यावर होणारच की ! तोच माझ्या वर्तनातून मी व्यक्त केलेला आहे.' या बुद्धिमान युक्तीवादापुढे माझी वाचाच बंद न पडल्यास काय नवल ?

पण अशाच 'अंधारमय' अध्यापनाच्या वाटचालीत

असे प्रसंग असतात की ते दिलासा देतात की 'तुझे परिश्रम वाया गेलेले नाहीत!' एखादी चुणचुणीत विद्यार्थीनी जेव्हा 'मिस्, आम्हाला अजून सखोल माहिती द्या 'स्मृति' प्रक्रियेची ? म्हणते किंवा एखादा विद्यार्थी, मानसशास्त्रज्ञाने व्यावसायिक मल्लागार बनावे – हे ऐकल्यावर तिळगूळ देण्याच्या निमित्ताने येतो, जेव्हा भावी अभ्यासक्रम काय निवडू विचारतो तेव्हा 'शिक्षक जन्म' सार्थकी लागला असे वाटते. ●

---

## आठवणी

तू अशी येवून जाऊ नकोस
मनातल्या या लामण दिव्याला विझवू नकोस
तोच दिवा जीवनाला टाकतो उजळून
त्यालाच विझवून माझे जिवन मिटवू नकोस...

जीवन वाटेवर आठवणीचा आधार मला
जीवन वाटेवर आठवणीचा सुगंधी चंदनाची सावली मला
विरहाच्या उन्हातून जाऊ दे आठवणीच्या कोमल सावलीत मनाला

आठवणींचे जग म्हणजे माझ्या पूर्व स्वप्नाचे जग
त्या सप्तरंगाच्या पावसात भिजू दे मनाला
म्हणूनच तू अशी येऊन जाऊ नकोस,
मनातल्या या लामण दिव्याला विझवू नकोस

नभीच्या चंद्रकला ढकलतात विरहात मला,
झाडावरची मोहक सुमने सजवतात वेड्या अशा
कोमल हा वारा जरी मनात वादळे भरवतो,
त्याच्याच प्रीतीची साद पुन्हा पुन्हा घालतो,

जीवनाच्या समुद्रात विरहाचा भोवरा,
त्यात तो एकटा सोडून जातो मनाला
या भोवऱ्यात आठवणीचा आधार मला,
म्हणूनच विनवते,

तू अशी येऊन जाऊ नकोस,
मनातल्या लामण दिव्याला विझवू नकोस.

**जयश्री कुलकर्णी**
तृ. व. 'वाणिज्य'

---

# लक्षद्वीप : एक अनोखा अनुभव

प्रा. चंद्रशेखर / प्रा. घैसास

९ जानेवारी ते १९ जानेवारी आम्ही पुण्यातील विविध क्षेत्रातील ८० लोक Creative youth organisation या संस्थेतर्फे लक्षद्वीपच्या सफरीवर होतो. अक्षरशः तिला सफरचं म्हटले पाहिजे. कारण सफर म्हटले की, आपल्याला सिंदबादच्या सफरी आठवतात की ज्या समुद्रातून असायच्या. ही सफरही समुद्रातूनच होती. तिची जाहिरात पण साहसी सफर म्हणूनच करण्यात आली होती. त्यात आम्हाला सगळ्यांनाच आणि विशेषतः मला आलेले अनुभव थरारक होते. त्यातील एक अनुभव माझ्या जीवावर बेतलेला होता.

९ जानेवारीला रात्री आठ वाजता जयंती जनताने आम्ही कोचीनला प्रयाण केले. ३६ तासाचा प्रवास कसा गेला हे कळलेच नाही. ठीक ११ तारखेला पहाटे ६ वाजता एर्नाकुलम (कोचीनपासून १२ कि. मी.) या स्टेशनवर उतरलो. आमची व्यवस्था जवळच्याच अद्ययावत हॉटेल्समध्ये केली होती. ११ तारखेलाच आम्ही कोचीनचे सृष्टीसौंदर्य पाहायला गेलो. कोचीनचे हे सौंदर्य लाँचने केले. कारण जवळपासच्या २ बेटांवर केलेल्या बागा, तेथील हॉटेल्स, ज्यूट इंडस्ट्री, चायनीज फिशींग नेटस् पाहण्यासारखी आहेत. महांचेरी नावाच्या ठिकाणी मसाल्याचे पदार्थ अतिशय स्वस्त मिळाले. उदा. वेलदोडे १०० रु. किलो, लवंग रु. २५० किलो. आणखी एका ठिकाणी मध्ये एकाच प्रकारच्या अनेक फरशा बसवलेल्या आहेत की त्यामध्ये काढलेली चित्रे लांबून सारखी दिसली तरी प्रत्येक चित्र इतर चित्रांपेक्षा वेगळे आहे आणि त्या फरशा पुरातन काळच्या आहेत असे कळले. तर एका नव्या राजवाड्यात कुठलेही रंग न वापरता फक्त फुले वनस्पतीजन्य रंग आणि फळभाज्या रंग वापरून काढलेली सुंदर चित्रे पाहावयास मिळाली. ती अर्थात केरळच्या सर्व राजांची होती. तिथेच त्यांच्या सर्व हत्याऱ्यांचे प्रदर्शनही ठेवले होते. आणि तिथेच एका दालनात रामायणातील चित्रे होती. कृष्णलीलांची पण चित्रे होती. एकूण अशा प्रकारे ४–४॥ तासात कोचीन दर्शन संपले.

१२ तारखेला सकाळी आम्ही तेथील बाजारपेठ पालथी घातली. पण विशेष जाणवले ती तेथील सराफांची दुकाने प्रत्येक ३–४ दुकानामागे एक सराफाचे दुकान होते. चौकशीअंती असे कळले की, तेथील स्त्री वर्ग प्रत्येक नवीन फॅशनप्रमाणे दागिने बदलत असतो. त्यामुळेच जवाहिऱ्यांची चलती आहे.

दुपारी २ वाजता आमची 'भारत सीमा' नावाची बोट आम्हाला लक्षद्वीपच्या सफरीवर नेण्यासाठी सज्ज होती. आमच्यापैकी ९० टक्के लोक पहिल्यांदाच बोटीमध्ये बसत होते. आमच्या अपेक्षेप्रमाणे बोट साधारण पणे २००–३०० लोकांसाठी असावी असे वाटले. पण प्रत्यक्षात आमच्या जिथे जागा होत्या (लोअरडेक) तिथे कमीतकमी ४०० लोक आधीच बसले होते. त्यामुळे आम्हाला बसण्यास जागाच नव्हती, पण नंतर आम्हाला बोटीवरच्या स्टाफने सांगितले की, टूरिस्ट लोक इथे थांबतच नाहीत. ते डेकवरतीच फिरत अस-

तात. त्याप्रमाणे आमचीही तीच गत झाली. आम्ही जे सामान खाली टाकले ते परत उतरतानाच खाली आलो.

आमची बोट साधारणपणे ५०० मीटर लांब होती. तिचे वजन ७ ते ८ हजार टनाच्या दरम्यान होते. दोन इंजिन्स होती. २५ वातानुकुलित खोल्या होत्या. ती प्रवासी ने-आण करणारी असल्यामुळे बोटीवरचा स्टाफ १०० च्या आसपास होता. दोन वेगवेगळी उपहारगृहे होती. त्यातील एक आम जनतेसाठी खुले तर दुसरे फक्त ऑफिसर्स व प्रथम वर्गाच्या प्रवाशांसाठी होते. खाण्याचा दर्जा थोडाफार दोन्हीकडे सारखाच होता. फक्त किंमतीमध्ये बराच फरक होता. बोटीवरच हॉस्पिटल होते, तिथे २ कॉटसूची व्यवस्था होती. येताना त्याचाही अनुभव आमच्यापैकी दोघांनी घेतला इतर सोयींमध्ये प्रवाशांसाठी काही तंबोल्यासारखे किंवा काही बैठे खेळ उपलब्ध होते. रोज रात्री व्हिडिओचीही व्यवस्था होती. पण तेथे वृत्तपत्रे किंवा मासिके व इतर काही वाचनाची कमतरता मात्र जाणवत होती.

आमची बोट वेळेवर सुटली. काही ठराविक अंतर पायलट बोटीने आम्हाला साथ दिली. या बोटीचे काम म्हणजे मोठ्या बोटीला ठराविक मार्ग दाखवणे म्हणजे काही ठिकाणी पाण्याच्या कमी-अधिक खोलीमुळे किंवा खडकाळ भागामुळे मोठ्या बोटीला इजा पोहोचण्याचा संभव असतो. साधारणपणे अर्ध्या एक तासानंतर आम्हाला कोचीनच्या इमारती दिसेनाशा झाल्या आणि एखाद दुसरी बोट सोडता चहुकडे पाणीच पाणी होते आणि मधूनच डॉल्फिन उड्या मारून आपली उपस्थिती जाणवून देत असे. सीगल व किंग फिशर असे अनेक पक्षी सराईतपणे माशांना पकडत होते आणि पाण्यात लुप्त होत होते. हळूहळू जसजसा सूर्यास्त होऊ लागला तसतसे पाण्याचे रंग बदलू लागले, दृश्ये अधिक नयनरम्य होऊ लागली तशी सगळ्यांना कॅमेराची आठवण झाली. प्रत्येक जण दिसेल तिथे आणि दिसेल त्याचे फोटो घेऊ लागला. पण जसजसा सूर्यास्त होऊ लागला तशी मला आपल्याजवळ कॅमेरा नसल्याची एक क्षणभरच हुरहुर वाटली. पण मी माझ्या मनाचे समाधान करून घेतले की, आपण दुसऱ्यांच्या फोटोवरून कॉपीज काढून घेऊ (दुधाची तहान ताकावर)

सूर्यास्तानंतर जो तो झोपण्याची जागा शोधू लागला. डेकवर कुठेही झोपण्याची मुभा असल्यामुळे आम्ही १०-१५ समवयस्क लोकांनी एक कोपरा शोधून रात्रभर भेंड्या, पत्ते, गाणी, नकला इ. चा जंगी कार्यक्रम केला. दुसऱ्या दिवशी पहाटे आम्ही बोटीची माहिती मिळवण्याच्या दृष्टीने हालचाल केली. सर्व स्टाफ चांगला असल्यामुळे आम्हाला कुठेही अडचण आली नाही. आम्ही इंजिनरूममध्ये गेल्यानंतर असे वाटले की, आपले कान फुटताहेत की काय! कारण यंत्रांचा आवाज जबरदस्त होता. तेथे काम करणारे नक्कीच बहिरे असतील आणि नसतील तर एक दिवस नक्कीच होतील. तशाही परिस्थितीत त्यांनी आम्हाला व्यवस्थित माहिती दिली. त्यानंतर आम्ही कंट्रोलरूमकडे गेलो. तेथे बहुतेक यंत्रे स्वयंचलित असल्यामुळे सांगण्यासारखे किंवा दाखवण्यासारखे फारसे काही नव्हते. तरी आम्ही बहुतेकांनी बोटीचे स्टिअरिंग धरून फोटो काढले. बोटीचा वेग दिशा पाहण्याची यंत्रे मात्र चांगली पाहता आली आणि समजलीही. आमच्या बोटीचा वेग ताशी सरासरी १२ नॉटिकल मैल्स होता (१ नॉटिकल मैल = १.८५ कि. मी.) तोपर्यंत आम्हाला रडारवर कावरत्तीचा (लक्षद्वीप समूहातील एक बेट) टॉवर दिसला आणि आम्ही उतरण्याच्या तयारीला लागलो. माझा बोटीवरचा पहिला वहिला १८ तासाचा प्रवास संपुष्टात आला होता.

बरोबर १३ तारखेला १०-३० वाजता कावरत्ती बेटापासून एक-दोन किलोमीटरवर आमची बोट उभी राहिली. बोटीने भोंगा वाजवून किनाऱ्यावर सूचना दिली. तिकडे पटापट छोट्या बोटी आमच्या दिशेने येऊ लागल्या. १५ ते २० मिनिटात लाटांच्या हिंदकळ्यात आम्ही धक्क्याला लागलो. समुद्राचे पाणी इतके स्वच्छ होते की, २५ ते ३० फुटाखालचा तळ आम्हाला स्पष्ट दिसत होता. तर उन्हामुळे पाण्याचा रंग थोड्याफार अंतरानंतर बदललेला दिसत होता. किनाऱ्यावर आमचे स्वागत शहाळे देऊन करण्यात आले. आम्ही विश्रांतीसाठी आमच्या पर्णकुटींकडे गेलो व नंतर लगेच डुंबण्याची तयारी केली. समुद्रस्नानाचा आस्वाद साधारणपणे २ ते ३ तास घेतल्यानंतर तेथील जेवणावर ताव मारला. भात व सांबर चांगले होते. मांसाहार खाण्याच्या लोकांची तर चंगळच होती. फिशकरीने प्रत्येकाने आपले पोट भरून घेतले व मस्तपैकी बीचवर ताणून दिली.

लक्षद्वीप हा बेटांचा समूह भारताचा सर्वांत लहान केंद्रशासित प्रदेश आहे. तो कोचीनच्या पश्चिमेला २१८ सागरी मैल एवढ्या अंतरावर आहे. या समूहात ३६ लहान-लहान बेटे ३२ चौ. कि. मी.च्या परिसरात विखुरलेली आहेत की त्यापैकी १० बेटांवर वस्ती आहे. बित्रा हे सर्वात कमी लोक असलेले बेट आहे की, १९८१ साली १८१ लोक होते. जरी क्षेत्रफळाच्या दृष्टीने लहान असले तरी समुद्रातील लगून्सचे क्षेत्र ४००० किमी आहे.

एकूण या द्वीप समूहाची लोकसंख्या ५०००० च्या आसपास आहे, प्रमुख धर्म मुस्लीम आहे. तर भाषा मल्याळम आहे. पण फक्त मिनिकॉय या बेटात म्हाल भाषा बोलली जाते, जिची लिपी दिवेही आहे. ही सर्व वस्ती भारतसरकारने मागासवर्गीय भटकी जमात म्हणून जाहीर केली आहे. येथील लोकांचा मुख्य व्यवसाय मासेमारी व नारळाची लागवड आणि सुतळी-विणकाम हा आहे.

ह्या समूहाचे वैशिष्टच म्हणजे तेथे सापडणारी कोरल्स. कोरल म्हणजे प्रवाळ आणि प्रवाळ म्हणजे समुद्रातील विविध सूक्ष्म जलचराचे अवशेष. त्यात पाहण्यासारखे असते तो त्यांचा निरनिराळा आकार आणि रंगीबेरंगी कलाकुसर. अशा प्रवाळांमध्ये राहणारे प्राणीही रंगीबेरंगी असतात. भारतात असे उथळ समुद्र असणारा हा एकमेव द्विपसमूह आहे. ह्या प्रवाळांची तुलना वाळवंटातील ओयासिसशी केली जाते. येथे राहणारे प्राणी आणि पक्षीही मर्यादित आहेत. पित्ती नावाचे जे बेट आहे तेथे समुद्रावर राहणारे निरनिराळे पक्षी राहतात ती Bird Century म्हणून घोषित करण्यात आली आहे. विशेषत: कावरत्ती बेटावर असणारे मत्स्यालय तर अप्रतिम आहे. तेथे स्लाईडशोसह सर्व जातींच्या माशांची व इतर प्राण्यांची शास्त्रीय माहिती दिली जाते.

लक्षद्वीपला आश्चर्याची गोष्ट म्हणजे ती संस्कृती स्त्री प्रधान असल्याचे जाणवले. कुटुंबात स्त्रीला महत्त्व जास्त आहे आणि तो मिनिकॉय या बेटावर प्रकर्षाने पाळत असल्याचे समजले.

अशा या लक्षद्वीपावर इतर सोयीही आहेत. बहुतेक ८-९ बेटांवर विजेची सोय आहे. तर नारळापासून बनणाऱ्या वस्तूंचे निरनिराळे छोटेछोटे कारखाने आहेत शिक्षणासाठी शाळा तर आहेतच पण कावरत्तीला जुनियर कॉलेजची पण सोय आहे.

दळणवळणासाठी २२० किमी. लांबीचे रस्ते तर आहेतच, शिवाय इतर बेटांवर जाण्यासाठी बोटींची व्यवस्था सरकारतर्फेच केली आहे. तर एक हेलिकॉप्टरही प्रवाशांसाठी (बहुतेक सरकारी अधिकारी) अतिशय कमी दरात चालवले जात आहे.

आरोग्यरक्षणासाठी मोठा दवाखाना अद्ययावत सोयींनी सज्ज आहे. प्रत्येक बेटावर डॉक्टरांचीही सोय आहे. पोस्टऑफिस, पोलिस स्टेशन, कोर्ट टेलिफोन एक्सचेंज, एम्प्लॉयमेंट एक्सचेंज, वायरलेस एक्सचेंज, सॅटेलाईट एक्सचेंज इत्यादी आहेत.

पण विशेष म्हणजे उपहारगृहे व चित्रपटगृहे अजून झालेली नाहीत. व्हिडीयोगृहे मात्र ३-४ आहेत. असे हे लक्षद्वीप जरी आपल्यापासून सागरामुळे तुटलेले असले तरी आपलेच वाटते. परकीयपणा मुळीच जाणवत नाही आणि अजूनही तिथे सरकारी कारभाराचे वर्चस्व जास्त असल्यामुळे व्यापाऱ्यांना वाव मिळालेला नाही ही चांगली गोष्ट म्हणावी लागेल. नाहीतर लक्षद्वीपचे गोवा होण्यास वेळ लागणार नाही.

संक्रांतीच्या आदल्या दिवशी म्हणजे १४ जानेवारीला आम्ही दुपारी लगून्स पाहण्यास जाऊन आलो. ही लगून्स समुद्राच्या साधारणपणे १ ते २ कि. मी. आत असतात आणि ती बघण्यासाठी एक विशिष्ट प्रकारची बोट असते जिचा तळ काचेचा असतो. ज्यामुळे पाण्यातील गोष्टी स्वच्छ दिसतात. आमची लगून्स बघण्याची हौस काही फिटली नव्हती म्हणून आम्ही गटागटाने गाईड न घेता स्वत:च जाण्यास सुरुवात केली. मी आणि माझे सहकारी घैसास दोघे दोनदा जाऊन आलो. दुसऱ्यांदा गेलो तेव्हा आम्हाला वाऱ्याचा चांगलाच जोर जाणवत होता. आम्ही ३०-३५ मिनिटांच्या प्रयत्नांनंतरसुद्धा लगून्सजवळ जाऊ शकलो नाही म्हणून आम्ही परत आलो, पण तिसऱ्यावेळी श्री. पत्की आणि त्यांची बायको व मेहुणी यांनी आम्हाला परत चलण्याबद्दल गळ घातली. आम्हीही तयार झालो. यावेळी घैसास कॅमेरा घेऊन पाण्याखालचे फोटो काढण्यास सज्ज होते. आम्ही साधारणपणे १/२ कि. मी. समुद्राच्या आत होतो. मी आणि पत्की वल्हे मारत होतो, तर घैसास बोटीचा तोल सांभाळत फोटो काढत होते आणि पत्कींची बायको आणि मेहुणी निसर्गसौंदर्य व समुद्रसौंदर्य न्याहाळत होत्या. तेवढ्यात आमच्यापैकी

६ व्या म्हणजे एक डॉक्टर महिला यांना वल्हवण्याची हुक्की आली आणि आम्ही सांगूनही त्या ऐकेनात, त्यामुळे नाईलाजाने ते द्यावे लागले. त्यांना ते काही जमेना तेव्हा त्यांनी जागा बदलण्याची इच्छा दर्शविली आणि तिथेच घात झाला. जागा बदलत असताना वारे जोरात असल्याने ते अवघड जात होते आणि बोट हेलकावे खाऊ लागली आणि पत्की जागा बदलत असताना त्यांचा पाय लाकडी फ्रेमवरून सटकून काचेवर पडला आणि काच फोडून पाय पाण्यात गेला आणि बोटीत पाणी शिरू लागले. पत्कींनी पाय वर काढला तो आम्हाला रक्ताळलेले पाणीच दिसले. लगेच १५ ते २० सेकंदात बोट पाण्याने भरली व आम्ही पाण्यात गटांगळ्या खाऊ लागलो. आमच्यापैकी पोहता येणारे दोघेच होते. एक डॉक्टर महिला दुसरे पत्की. मला आणि घैसासांना थोडेफार पोहता येत होते, पण किनारा गाठण्याची शक्यता वाटत नव्हती. या गडबडीत डॉक्टर महिलेने पाण्यात उडी टाकली व त्या किनाऱ्याकडे निघून गेली तर सौ. पत्की व त्यांच्या भगिनी अतिशय भेदरलेल्या अवस्थेत गटांगळ्या खात होत्या पत्कींच्या नावाचा जप करीत होत्या. शेवटी त्यांच्या हाती बोट सापडली व बोटीला धरून ते लोक कसेबसे पाण्यात उभे होते आणि त्यांनी मदतीसाठी जोराची ओरड सुरू केली. हे सर्व मला पाण्यात असताना दिसले. माझी अवस्था फारच विचित्र झाली. मी बोटीपासून दूर फेकलो गेलो असल्यामुळे मला बोट सापडली नाही. पाणी तर ३०–४० फूट खोल होते. मला पोहता (तरंगता) तर जेमतेम येत होते. ओरडले तर किनाऱ्यावर ऐकूही जात नव्हते. त्यामुळे मी डोळे मिटून घेतले व किनाऱ्याकडे यायचेच ही खूणगाठ बांधून पोहण्यास सुरवात केली. जिवावर बेतले की माणूस प्राणपणाला लावून प्रयत्न करतो तशी माझी गत झाली. मी साधारणपणे ४५ मिनिटांनंतर किनाऱ्याच्या दुसऱ्या बाजूला पोहोचलो. जेव्हा मी डोळे उघडले तेव्हा मला विश्वासच बसला नाही की आपण स्वतः एवढे अंतर पोहून आलो.

मी केवळ इच्छाशक्तीवर पोहून आलो होतो आणि तेव्हा माझा देवावरचा म्हणण्यापेक्षा जी काही अदृश्य शक्ती आपल्याइथे संचार करते तिच्यावरचा विश्वास दृढ झाला. नंतर मला समजलेली हकीकत अशी की आमचा आरडाओरडा ऐकून किनाऱ्यावरच्या आमच्या सहकाऱ्यांनी किनाऱ्यावरून बोट सोडून माझ्या बोटीतील सहप्रवाशांना किनाऱ्यावर आणून हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते. श्री. पत्की यांना पायाच्या जखमेसाठी १४ टाके घालून घ्यावे लागले होते तर श्री. घैसास यांना ४ टाके, सौ. पत्कींना २ टाके पडले होते. पत्कींच्या मेहुणीची दातखीळ बसली होती.

अशा रीतीने आम्ही सर्वजण जिवानिशी वाचलो होतो. पाण्यातले प्राणी बघता बघता आमच्याच प्राणावर बेतले म्हणायची वेळ आली होती.

नंतरच्या सहलीमध्ये पत्की आणि घैसास बहुतेक विश्रांती घेत एकाच जागेवर (कॉटवर) पडून होते. आम्ही नंतरच्या दिवशी बेटाला एक चक्कर मारली व नारळाच्या झाडांचा अंदाज घेण्याचा प्रयत्न केला तर तो १५ ते २० हजारांच्या घरात गेला. आम्ही पोटभर शहाळी प्यालो. एक वैशिष्टय म्हणजे शहाळी फुकट देतात. नारळ किंवा शहाळी विकणे ते कमीपणाचे समजतात.

१४ तारखेला संध्याकाळी आमचा National Integration च्या कँपचा सांस्कृतिक कार्यक्रम होता त्यामध्ये भर सर्व महाराष्ट्रीयन गाण्यांवर (भारूड, पोवाडा, जागर, लावणी इ.) होता. कलाकार आमच्याच ग्रुपमधले होते. कार्यक्रमाला तेथील नामांकित मंडळी उपस्थित होती. नंतर तिळगुळाचा कार्यक्रम झाला. रात्रीपासून आम्ही परतीच्या प्रवासाला लागलो.

१५ तारखेला ४ वाजता पुन्हा 'भारतसीमेने' आम्हाला हाक दिली. छोट्या बोटीतून जाताना समुद्र खवळल्याचे जाणवले जणू आम्ही त्याला झिडकारून चाललो असल्याचा भास झाला. सौ. पत्कींनी बोट बुडाल्याच्या जागी पैसे टाकून त्याला शांत करण्याचा प्रयत्न केला. आमची छोटी बोट लाटांबरोबर हिंदकळत होती. बोटीतून पाणी आत येत होते. आमची धाबी दणाणली होती. आम्ही सर्वजण शांत होतो. मला खात्री आहे, प्रत्येकाला मनातून असेच वाटत असेल की केव्हा एकदा मोठ्या बोटीत जाऊन पडतोय !

१६ तारखेला दुपारी २ वाजा आम्ही कोचीनला परत आलो व त्यादिवशीची संध्याकाळ खरेदीमध्ये घालवली. कोचीनमध्ये सुतळीच्या पिशव्या किंवा जमिनीवरचे मॅटिंग इ. गोष्टी फार स्वस्त मिळतात. त्या सर्वांनी घेतल्याच शिवाय परत खरेदीचा योग येणार नाही म्हणून लोकांनी विशेषतः नेहमी मिळ-

णाऱ्या (सर्व ठिकाणी) वस्तूही विकत घेऊन पैसे संपवले व ट्रेनमध्ये बसण्यास सज्ज झाले.

१७ तारखेला दुपारी २ वाजता ३६ तासाच्या परतीच्या प्रवासास सज्ज झालो. १९ तारखेला पहाटे १ वाजता आम्ही पुण्याला सर्व ८० जण सुखरूप पोहोचलो तेव्हा संयोजकांनी सुटकेचा निःश्वास टाकलेला आम्हा सर्वांना जाणवला. लक्षद्वीप–सफरीने आठवणींसाठी मनाचा एक कप्पा अनंत काळासाठी आरक्षित केला.

●

## नियती

एक नुकतीच सुरवात होती
सोबत्यांच्या साथीत नवजीवनाची
एक नुकतीच सुरवात होती
आनंद सुखाच्या भरतीची
एक नुकतीच सुरवात होती
जीवनसागरातल्या प्रवासाची
पुढे येणाऱ्या वादळाची नावाड्याला
कल्पनाही नव्हती
पण म्हणून थोडीच येणाऱ्या वादळाची
दिशा बदलणार होती
क्रूर रौद्र वादळाने नौकेला घेरले होते
त्या रौद्रतेपुढे तारुण्याचे सामर्थ्य फिके होते
काही काळाने वादळ स्थिरावले
मनाला धैर्य येत होते
पण नाव तशीच ठेवून वादळाने
नावाड्याला नेले होते
एक नुकतीच सुरवात होती
दिशाहीन भ्रमंतीची
एक नुकतीच सुरवात होती
काळोखात विरलेल्या वाटांची
एक नुकतीच सुरवात होती
त्या वाटांचा बळी होण्याची

**मिलिंद वाईकर**
तृतीय वर्ष वाणिज्य

## अलिप्त मी

माझी मला खंत वाटते, दुःख होतं, हुरहुर लागते
स्वच्छ मोकळं ऊन असताना
ढगांना सोनेरी किनार लाभलेली असताना
माझं आंधळं मन एखाद्या काळ्या दरीत
चाचपडत, ठेचाळत आधार शोधत असत.
स्वच्छंदपणे झाडे डोलत असतात,
चिमण्या, पक्षी चिवचिवत असतात,
माझ्या मनाच्या काळोखात मात्र
टिटवीची कर्कश्श साद
काळजात खोल रुतून जाते आणि
आठवते मला वटवाघूळ आणि त्याच्या पंखांची
एकाकी फडफड
शेवटी एक दीर्घ सुस्कारा–नेहमीचाच आणि
स्वतःच स्वतःच केलेले कोरडे सांत्वन
'तू अलिप्तच रहा या साऱ्यांपासून'
आणि – पुन्हा माझ्या आयुष्याचा नागमोडी
खडकाळ रस्ता
निरखण्यात मी मग्न होते.
स्वतःच स्वतःपासून अलिप्त होऊन

**रत्नाली राजन जाधव**

# एक वाऱ्यावरची सैर

संजीवनी राहाणे

भविष्यकथनावर तुमचा विश्वास आहे का असा प्रश्न विचारला तर बहुसंख्य लोक काही तरी गुळमुळीत उत्तर देतात कारण 'विश्वास नाही असे म्हणण्याचे धैर्य बऱ्याच लोकांच्यात नसते' आणि 'विश्वास आहे' असे म्हणणे फार मागासलेपणाचे लक्षण होईल की काय अशी भीती वाटते. आज मात्र मी एका खऱ्या झालेल्या भविष्यकथनाबद्दल लिहिणार आहे. मी शाळेत असताना माझे भविष्य सांगितले होते की, 'हिच्या नशिबात अमाप वाहनसुख आहे' तेव्हा मी खरेतर मनातल्या मनात हसले होते. मी साधी सायकलही कधी चालवली नव्हती आणि अमाप वाहनसुख म्हणजे जरा जास्तीच होते, नाही का ? परंतु मे १९८६ मध्ये मी मोटारसायकलवरून साडेतीन हजार किलोमीटर प्रवास केला आणि भविष्यकथन खरे ठरले.

माझ्या यजमानांना मोटारसायकलचे वेड ! त्यामुळे आम्ही गप्पा मारत असताना मोटारसायकलवरून लांब प्रवास करायचे त्यांचे स्वप्न ते नेहमीच बोलून दाखवायचे. ह्यांची रुळावरून घसरलेली गाडी, पूर्ववत करण्याची माझ्याजवळ एक युक्ती आहे– ती म्हणजे त्यांची मोटारसायकलवरून केलेल्या प्रवासाचा विषय काढणे. एकंदरीत काय मोटारसायकल हा आमच्यातील एक जिव्हाळ्याचा विषय !

मार्च १९८६ मध्यें आम्ही एक धाडसी बेत आखला. पुण्याहून रेल्वेने मद्रासला जायचे त्यांच्या एका मित्राकडून 'होंडा' विकत घ्यायची आणि त्यावरून दक्षिण भारताची सैर करत करत पुण्याला जायचे.

आमचा बेत कोणाजवळही बोलायचा नाही असा आम्ही निश्चय केला. कारण नवीन वाहन, त्यातच मला चालवता येणे शक्य नाही. इत्यादी गोष्टींचा विचार केला तर सगळेजण आम्हाला वेड्यात काढतील यात तिळमात्र शंका नव्हती, पण आमचा दोघांचाही एकमेकांच्या 'वेडेपणावर' पूर्ण भरोसा म्हणूनच की काय आमचा बेत डळमळला नाही.

आम्ही मद्रासला निघालो तेव्हा सगळ्यांच्या चेहऱ्या वर आश्चर्य दिसत होते की इतके कमी सामान घेऊन आम्ही निघालो कसे ?

मोटारसायकलची थोडीशी डागडुजी करून घेऊन आम्ही मद्रासहून निघालो तेव्हा मनात फक्त इतकेच योजले होते की, संध्याकाळच्या आत त्रिचीला पोहोचायचे. सुरवातीला वेगाने कानात शिरणाऱ्या वाऱ्याच्या आवाजाची थोडी भीती वाटत होती, पण लवकरच मला त्या आवाजात संगीत गवसले. वाऱ्याच्या लयीवर एक गाणे गुणगुणावेसे वाटले. मनात विचार आला की मनात भीती असताना माणूस निसर्गाशी एकरूप होऊ शकत नाही आणि भीती संपताच माणसाचे निसर्गाशी एक अतूट नाते प्रस्थापित होते हे किती सत्य आहे !

दुपारची आरामाची वेळ ! आणि आम्ही दोघे निसर्गवेडे निघालो होतो. भरधाव वेगाने वाऱ्याबरोबर गाणी गात, मोटारसायकलच्या आवाजाच्या साथीसह ! अशा वेगळ्याच 'साथी' बरोबरचे संगीत फार थोड्या

लोकांनी अनुभवलेले असेल. दुतर्फा असणारी झाडे विरुद्ध दिशेने जोरदार धावत होती– आमचे गीत ऐकावे लागणार म्हणून की माना डोलवत होती. आमच्या गाण्यांच्या तालावर असा संभ्रम पडला! उन्हात चमकणारा डांबरी रस्ता काळ्या वेल्व्हेटच्या गालीच्यासारखा भासत होता. दुपारच्या रणरणत्या उन्हाची प्रखरता अजिबात जाणवत नव्हती. कारण मनात उत्साहाचे कारंजे उंचावत होते आणि थेंबाथेंबातून आनंदाचे इंद्रधनुष्य फुलवीत होते.

दर दोन तासांच्या प्रवासानंतर आम्ही गाव बघून थांबत होतो. कुतुहल भरलेल्या गावकऱ्यांच्या नजरा आमच्याकडे वळवीत होते.

संध्याकाळच्या वेळी त्रिचीला पोचलो तेव्हा जग जिंकल्याचा आनद आमच्या दोघांच्याही चेहऱ्यावर होता. माझ्या मनात आले, आपले, आपले जग किती छोटे असते नाही? किती लहानसहान गोष्टीत आपण मोठा आनंद मिळवत असतो.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही कोडाई कॅनॉलला जायला निघालो. त्रिचीहून आम्हाला कोडाईला घेऊन जाणारा तो रस्ता माझ्या मनात कायमचा कोरला गेला आहे. त्यानंतर कितीतरी वेळा स्वप्नात मी या रस्त्यावरून प्रवास केला आहे. पन्नास किलोमीटरपेक्षा लांब, दुर्गम घाट माणसाच्या प्रयत्नांची, धडपडीची, झगडण्याची एक जिवंत तस्वीर! रस्त्याच्या दोनही बाजूला आकाशाला भिडणारे उंच उंच वृक्ष, जणू स्वर्ग–पृथ्वीमधील एक दुवाच! रात्रीच्या वेळी आकाशातल्या एक–एक तारका ह्या शिडीवरून भूतलावर उतरत असाव्यात. या अवीट सौंदर्याचा आस्वाद घ्यायला! झाडाझाडामधून झिरपणारी सूर्यकिरणे जमिनीवर चित्रविचित्र आकार काढत असतात जणू सूर्याच्या आधुनिक चित्रकलेचा एक आविष्कार!

निसर्गाचे असे भव्य रूप पाहिले की माणसाचे छोटेपण फारच जाणवायला लागते.

ह्या संपूर्ण प्रवासात एक फार विचित्र आनंद मी अनुभवला. वळणा–वळणाच्या रस्त्यावरून वेगाने जाताना वळणावर एक तर वेग तरी कमी करावा लागतो नाही तर मोटारसायकल तरी तिरकी करावी लागते आणि वेग कमी केला तर परत वेग पकडणे अवघड जाते. त्यामुळे मोटारसायकल तिरकी करणेच शहाणपणाचे ठरते. मोटारसायकल काही सेकंद तिरकी होऊन परत सरळ होताना मनात एक शब्दातील लहर जाणवली ती शब्दात पकडणे कठीण आहे. झूल्यावर आकाशात उंच झेपावल्यावर परत जमिनीकडे येताना जो अनुभव येतो त्यासारखी ही लहर वाटली.

सूर्यनारायणाने जगाचा निरोप घेताना आपल्या हातचे राखून न ठेवण्याच्या स्वभावानुसार, मुक्तहस्ते केलेली रंगाची पखरण झेलत झेलत आम्ही कोडाईमध्ये प्रवेश केला. सोनेरी, तांबूस, केशरी रंगात नाहून निघताना मनात प्रश्न पडला की हाच का तो दुपारचा रणरणता सूर्य?

कोडाईमध्ये पाहिले, अनुभवले ते निसर्गाचे एक मुग्ध, सौम्य, शांत रूप–काहीसे गूढ अनाकलनीय वाटावे असे संध्याकाळच्या वेळी थोडा वेळच टिकणाऱ्या सुखद गारव्याचे रूपांतर एकदम बोचणाऱ्या आणि मग जीवघेण्या थंडीत कसे झाले ते समजलेच नाही. कोडाईमध्ये पायी आम्ही मैल न मैल भटकलो, कधीही न संपणारे निसर्ग सौंदर्य पीत पीत! एरवी अखंड बडबडणारी मी त्या निसर्गात इतकी हरवून गेले होते की, कित्येक वेळा काहीही न बोलता अर्धा अर्धा तास आम्ही चालत रहायचे रानफुलांचे रंग तरी किती असावेत? परमेश्वराने एखाद्या जातीवंत कलाकारांप्रमाणे काढलेली ही फुलांची रांगोळी हे तर केवळ मांगल्याचे आणि मृदुतेचे प्रतीक!

आम्ही उटीला गेलो त्यानंतर दोन दिवसांनी तिथे 'फ्लॉवर शो' होता. जणू काही आमच्यासाठीच तो योजला होता. फुलांचे ते संमेलन फारच रंगमय, गंधमय आणि आल्हाददायी वाटले. विविध रंगातील शेवंतीची झाडे–पांढरी पिवळी–त्यातही विविध छटा, विविध आकार. संमेलनासाठी सजून सिद्ध झालेली. पांढऱ्या मोगऱ्याचे डवरलेले झाड पाहून शांत सात्त्विक स्त्री डोळ्यापुढे उभी राहिली.

एक लाल गुलाब स्वतःच्याच ऐटीत मान ताठ करून इतर फुलांकडे पाहात होता. संमेलनाचा अध्यक्ष मीच असेच जणू त्याला सुचवायचे होते. अनेकविध रंगांची वेल्व्हेटसारख्या मऊ पाकळ्या असणारी नाजुक फुले नाचून स्वागतगीत गात होती. शेवंती ग्लॅडिओलस जर्बेरा, सूर्यफूल आणि इतर अनेक फुलझाडे त्या गुलाबाला मानवंदना देत होती.

हा 'फ्लॉवर शो' मी ओळीने तीन दिवस पाहिला. रोज मला काल न जाणवलेल्या एका नव्या सौंदर्याचा

साक्षात्कार होत होता. मला वाटले अर्थशास्त्रातील घटत्या उपयोगितेच्या सिद्धांताप्रमाणे सौंदर्यशास्त्रात एक वाढत्या आस्वादाचा सिद्धान्त नक्कीच मांडता येईल.

उटीच्या तुलनेने कोडाईला जाणवणारी एक फार चांगली गोष्ट म्हणजे अजून कोडाईला व्यापारी स्वरूप फारसे आलेले नाही. तिथला निसर्ग अजून वाटतो. अजून तिथे कोठेही कृत्रिमपणा नाही. माणूस अजूनही निसर्गाशी एक नैसर्गिक जवळीक साधून आहे. निसर्गाशी एकरूप झालेला आहे. त्यामुळेच की काय तिथल्या निसर्गाचे एक आगळे वेगळे रूप आहे–शांत आणि शीतल कुठेतरी एका अज्ञात शक्तीच्या अस्तित्वाची जाणीव मनात जागृत करणारे !

तिथेच आम्ही 'मधुमलाई' अभयारण्याबद्दल ऐकले. 'मधुमलाई' हे नावच इतके गोड वाटले की तिथे जाण्याची प्रबळ इच्छा झाली. मधुमलाईला जाताना घाटात अनेक ठिकाणी हरणांचे कळपच्या कळप दिसले आम्ही वेगाने जात असताना, हरणे थांबून माना उंचावून आमच्याकडे पाहायची. आम्ही त्यांना बघायला थांबलो की उड्या मारत एकदम धावत सुटायची आणि दिसेनाशी व्हायची. काही क्षणच त्यांचे चेहरे दिसायचे आणि त्यातच त्यांच्या डोळ्यात एक वेगळीच चमक दिसायची–ती म्हणजे स्वातंत्र्याची चमक ! पिंजऱ्यातील प्राण्यांच्या डोळ्यात जो एक केविलवाणेपणा एक मूक असहाय्यता दिसते तिच्या अगदी विरुद्ध अशी ही चमक बघून माझ्या मनात पूर्वी वाचलेल्या एका कवितेची ओळ फार वेळ घोळत राहिली.

'स्वातंत्र्याचे वारे तुम्ही सेवणारे,
तुम्हा कोण म्हणे दुर्बळ बिचारे'

मधुमलाईला जाताना रस्त्यात अनेक हत्ती दिसले प्रथम थोडी भीती वाटली, पण नंतर समजले की हे सर्व हत्ती माणसाळलेले आहेत. असेच एक गोंडस हत्तीचे पिल्लू गणपतीची साग्रसंगीत पूजा करताना पाहिले आणि वाटले की त्याला मनातून किती अभिमान वाटत असेल की माणसांच्या ह्या देवासारखी मलाही सोंड आहे ! गणपतीला दुर्वा, फुले वाहून प्रदक्षिणा घालून झुलत झुलत घंटा वाजवणारा तो छोटासा हत्ती आजही माझ्या डोळ्यासमोर तसाच्या तसा उभा राहतो.

मधुमलाईला आम्ही पोचलो तोपर्यंत सूर्यदेव आपल्या घरी परतले होते. त्यामुळे विश्रांतीगृहाच्या परिसराची मला जास्त कल्पना आली नाही. रात्रीच्या वेळी जास्त लांब जाणे धोक्याचे आहे असे कळल्यामुळे आम्ही जवळच थोडे फिरलो. दारातच काजव्यांनी भरून गेलेली झगमगती डोळे दिपवून टाकणारी दोन मोठी झाडे आमच्या आगमनाप्रित्यर्थ दिव्याची रोषणाई केल्यासारखी वाटली. झिमझिम पाऊस येत होता दूरवर मोराच्या ओरडण्याचा आवाज येत होता परंतु पावसाने 'टपटप' जोरदार टेका धरल्यामुळे आम्हाला लवकरच परत यावे लागले.

दुसऱ्या दिवशी सूर्यदेव आपल्या धीम्या गतीने अवतरले ते एक अविस्मरणीय सकाळ आमच्यासाठी भेट घेऊन ! रात्रीच्या अंधःकाराच्या पडद्यामागे दडलेला एक सुंदर देखावा नव्याने जिवंत झाल्यासारखा आमच्या समोर उभा होता रस्त्याच्या दोनही बाजूला रांगेने सलामी देत असल्यासारखी गुलमोहोराची झाडे उभी होती. केशरीवर हिरवे नक्षीकाम केल्यासारखा गणवेषच जणू त्यांनी घातला होता, कारण त्यांच्यावर पाने कमी आणि फुलांचा डोलाराच अधिक होता. रात्रीच्या पावसाने ह्या वृक्षांना अक्षरशः झोडपून काढून आमच्यासाठी फुलांच्या पायघड्या घातल्या होत्या, त्या पायघड्यावरून मोटारसायकल नेणे फारच निर्दयीपणाचे वाटले. आणि आम्ही पायीच फिरायला निघालो. त्या पायघड्यांवरून चालताना आमची मान आपोआपच उंचावली गेली आणि राजाराणीच्या थाटात आम्ही बाहेर पडलो.

त्यानंतर शहराच्या सुडौल आखणीचे उत्तम उदाहरण असलेले बंगलोर, जुन्या वैभवाची साक्ष देणारे राजेशाही म्हैसूर, कोइमतूर असे फिरत फिरत आम्ही पन्हाळ्याला, कोल्हापूरला दोन दिवस मुक्काम केला. पन्हाळ्याला आम्ही आलो मात्र. आणि घराजवळ आल्यासारखे वाटायला लागले. महिनाभर मोटारसायकलवर साडेतीन हजार किलोमीटर स्वच्छंद फिरलो पण कोल्हापूरला आल्यावर पाय पुण्याकडे ओढ घ्यायला लागले.

मद्रासहून आम्ही घरी तार केली होती की आम्ही मोटारसायकलवर फिरत फिरत पुण्याला येणार आहोत. आम्हाला पुण्यात समक्ष पाहिल्यावर सगळ्यांनी सुटकेचा निःश्वास टाकला. सूर्याच्या प्रेमळ स्पर्शाने बदलून गेलेला आमचा रंग डोक्यावरील हेल्मेटमुळे शाबूत राहिलेला कपाळाचा रंग, तांबूस काळपट नाकांना

शेंडा आणि गाल असे आमचे विदूषकासारखे चेहरे न्याहळत काही लोक आमचे कौतुक करत होते. काही लोकांच्या नजरेत असूया डोकावत होती—त्यांना असा सुसाट अनुभव कधीच घेता आला नाही म्हणून काही लोकांनी काळजीच्या सुरात प्रश्नांची सरबत्ती सुरू केली 'त्रास नाही का झाला ? रोज किती तास प्रवास केलात ? हॉटेलमध्ये आगाऊ आरक्षण केले नव्हते तर राहिलात कुठे ? आजारी नाही ना पडलीस ? बरोबर कोणीच कसे नव्हते ? सगळा वेळ एकट्याने मोटार-सायकल चालवली ? इत्यादी इत्यादी.

ह्या सगळ्यांवर माझी एकच प्रतिक्रिया होती. एक मंदसे स्मित हास्य. एकीकडे अशा माणसांना माझा हा सुसाट अनुभव कसा सांगावा ह्या विचारात मी शब्दांची जुळवाजुळव करीत होते.

●

---

## परिणीता

चांदण्याच्या निळ्या नभातून
डोळ्यांत माझ्या तू पहावे
झिलईमधून अबोलीच्या
ओठातील माझ्या तू
अबोल खुणांना टिपावे
कमळपाकळी अधरांना तुझ्या
भिजविणाऱ्या वर्षाऋतुत
यौवनास माझ्या तू पहावे
भावनांच्या या कुंदकळ्या
फुलाव्यात संगतीत तुझ्या
निद्रीस्त मी होऊन जावे
तुझ्या नि माझ्या नजरांनी
प्रीतित आपुल्या व्हावी परिणीता

**संदीप श. खजुरे**
तृतीय वर्ष विज्ञान 'संख्याशास्त्र'

## बंद पापणी

बंद पापणीने जोपासले जाते घर
तुमच्या माझ्या मनातले
पापणी पार, अपरंपार
पसरलेले असतात
हुंदक्याचे ज्वालामुखी
आणि उतरणीला लागतात
स्वप्ने गर्भ रेशमी
तेव्हा पापणीचे छप्परही
उघडझापा करीत नाही
अशा वेळी घराचे संदर्भ
आपल्यापुरते संपलेले असतात !
सर्वत्र, सर्वदूर भरून राहतात
मृत्यूचे पूर्णविराम !

**कु. छाया साळवे**
द्वि व. शास्त्र 'ब'

---

# 'जी. अें.'च्या दोन कथा

**शकुंतला मुकाणे**
द्वितीय वर्ष कला.

## मुखवटा

जी. ए. कुलकर्णी यांचा 'निळासावळा' या कथा-संग्रहातली 'मुखवटा' ही एक अतिशय वास्तववादी कथा आहे. त्यांचा एकूण कथालेखनाचा आविष्कार गूढत्वाकडे जाणारा आहे. मानवी मनाचे व व्यथांचे जी. एं. ना आकर्षण आहे. मानवी मनाचे अतिशय गुंतागुंतीचे विविध कंगोरे रेशीम घडीप्रमाणे उलगडून दाखवण्यात जी. एं.-चा हातखंडा आहे. मानवी जीवनातील सुख, दु:खांची आभिव्यक्ती त्यांच्या कथांमधून प्रातिनिधिक स्वरूपात रसिकांसमोर आलेली आहे.

उत्कृष्ट वातावरण निर्मिती, उंबराच्या पाराचं मानसशास्त्र, लक्षवेधी आकर्षक वाक्यरचना, छोट्या व निरुपयोगी वाटणाऱ्या कथाबीजातून जीवनातील मोठ्या सत्याकडे केलेला निर्देश ही 'मुखवटा' या कथेची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

अकाली येऊन पडलेल्या जबाबदारीच्रा जाणीवेने एकदम प्रौढ झालेल्या सद्याची मन:स्थिती, त्याच्या लहान बहिणीच्या व भावाच्या निरागस, अल्लड स्वभावाचे, खोड्यांचे वर्णन अतिशय प्रत्ययकारी झाले आहे. लेखकाची शैली अल्पाक्षरी व समर्थ आहे.

रविवारची रिकामी दुपार ही सगळ्यांनाच तशी परिचित आहे. पण जी. एं. नी 'मुखवटा' या कथेत शब्दबद्ध केलेली रविवारची दुपार आपल्याला आकर्षित करते. याचं कारण लेखकाच्या दृष्टीला दिसलेले लहान मुलांच्या स्वभावाचे पैलू आणि त्याआधारे त्यांनी चित्रित केलेले दुपारच्या उंबराच्या पाराचे मानसशास्त्र. 'मुखवटा' ही कथा वाचत असताना वाचक कथेतील प्रत्येक पात्राशी समरत होतो. त्या पात्रांमध्ये तो आपले मागे राहिलेले बालपण शोधतो. विस्मृतीत गेलेले ते सोनेरी क्षण पुन्हा नव्याने अनुभवतो. त्यामुळे कथेच्या रूपाने लेखकाने वाचकांशी सुसंवाद साधला आहे. जवळीक साधली आहे.

कालच मेलेल्या आईच्या मरणाचे दु:ख विसरून दिवसभर हुल्लडबाजी करणाऱ्या सद्याला दिवस मावळल्यानंतर त्याच्या खऱ्या परिस्थितीची जाणीव होते. इतरांप्रमाणे आपली वाट पाहणारे घरी कोणीही नाही, आई आता या जगात नाही याची त्याला तीव्रतेने जाणीव होते आणि त्याच्यातला अल्लड, बालिश सद्या त्याच क्षणी संपतो. प्रौढत्वाचा, जबाबदारीचा मुखवटा नळकत त्याल्या चेहऱ्यावर चढतो. हा कथेचा शेवट अतिशय हृदयस्पर्शी आहे. इथे लेखकाने वातावरणनिर्मिती साधली आहे.

## हिरवी मखमल गोरा हात

जी. ए. कुलकर्णीच्या 'निळासावळा' या कथासंग्रहात 'हिरवी मखमल, गोरा हात' ही कथा समाविष्ट झालेली आहे. या कथेत लेखकाने विराट मुंबई नगरीत पाचोळ्यासारखे असणारे आपले अस्तित्व

टिकविण्यासाठी धडपडणाऱ्या मध्यम वर्गाचं समर्थ चित्रण केलेले आहे. जी. एं. ना मानवी मनाचे, जीवनाचे असलेले आकर्षण या कथेतही जाणवते. त्यांच्या कथा आणि वास्तवता यात अदृश्य स्वरूपाची बांधिलकी आहे, गहिरं नातं आहे, कुठेतरी समानतेचे बंध आहेत. हे बंध मानवी सुख, दुःखाचे, चढ–उतारांचे आहेत. विविध स्तरातील व्यक्तांची दुःखं त्यांनी कथेतून चित्रित केलेली असली तरी त्या दुःखांचा स्तर, वेदना, उमाळा एकच आहेत. याचा प्रत्यय 'हिरवी मखमल गोरा हात' या कथेतही येतो. त्यांच्या कथाविश्वातील प्रत्येक व्यक्ती कोणाची तरी नातं जोडणारी आहे. परस्परांना जोडणारा असा एक अदृश्य पण चिवट आणि जिवंत धागा ती व्यक्ती शोधत असते असे आपल्याला जाणवते.

मॉडर्न महाविद्यालयातील नियोजन - चर्चा मंडळाचे १९८७-८८ या शैक्षणिक वर्षाचे कार्य प्राध्यापक संपामुळे नोव्हेंबरमध्ये सुरु झाले. गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेचे नव्याने नियुक्त झालेले माननीय गुरुवर्य डॉ. व्ही. एस्. चित्रे यांच्या शुभहस्ते दिनांक ६ नोव्हेंबर ८७ रोजी ' नियोजन-चर्चा मंडळाचे ' अनौपचारिक उद्घाटन झाले. याप्रसंगी डॉ. चित्रे यांच्या कार्याचा व विद्वत्तेचा गौरव ' गुरु ' या नात्याने व्हावा असा प्रस्ताव माननीय उपप्राचार्य डॉ. पाथरे यांनी सुचविला. नियोजन चर्चा मंडळाला त्यांचा अल्पसा सत्कार करण्याची संधी मिळाल्यामुळे अर्थशास्त्र विभागातील सर्वच प्राध्यापकांना समाधान वाटले. याप्रसंगी डॉ. चित्रे यांचे **' भारताची चलननीती व भारतातील चलन विषयक प्रश्न '** या विषयावर अत्यंत उद्बोधक, माहितीपूर्ण व रोचक असे व्याख्यान झाले. व्याख्यानानंतर विद्यार्थ्यांनी अनेक प्रकारचे प्रश्न विचारून उत्तमप्रकारे प्रतिसाद दिला. डॉ. चित्रे यांचे मनःपूर्वक आभार.

मागील वर्षीप्रमाणेच याही वर्षी एफ. वाय बी. ए. या वर्गातील विद्यार्थ्यांसाठीं त्यांच्याच अभ्यासातील विषय निवडून त्यांच्याकडून निबंध तयार करवून घेण्याची योजना प्रा. सौ. विनीता कुलकर्णी यांनी नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात प्रत्यक्षात आणली. अर्थशास्त्र हा विषय सामान्यतः विद्यार्थ्यांना अवघड वाटतो त्या दृष्टिकोना-

नून त्यांच्याकडून अधिक तयारी करवून घेऊन त्यांना मार्गदर्शन केल्याचा उपयोग परीक्षेच्या संदर्भात निश्चितपणे झालेला आहे. **'निबंध वाचनमालिके'ची** ही योजना प्रा. सौ. विनीता कुलकर्णी यांनी दुसऱ्या सत्रातही मार्चच्या पहिल्या आठवड्यात पार पाडण्याचे ठरविले आहे.

**अभिनव योजना :–** नियोजन–चर्चा मंडळ व साहित्यसंघटना (समाजशास्त्र विभाग) यांच्या संयुक्त विद्यमाने १९८७–८८ या शैक्षणिक वर्षासाठी साहित्यशाखेतील वरिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांसाठी **'प्रकल्प–अहवाल स्पर्धा'** आयोजित करण्याबाबतचा प्रस्ताव प्रा. सौ. विनीता कुलकर्णी यांनी नियोजन–चर्चा मंडळाचे सदस्य व साहित्यसंघटनेतील समाजशास्त्र विभागातील प्राध्यापक यांच्यासह डॉ. पाथरे यांच्याकडे मांडला. विद्यार्थ्यांनी अभ्यासेतर उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन आपल्या आवडीप्रमाणे एखादा विषय निवडून त्याबद्दलचे वाचन करावे, विचार करून, पहाणी वा मुलाखत पद्धतीचा वापर करून प्राथमिक स्वरूपाचे संशोधन करावे स्वतःचे निष्कर्ष मांडावेत असे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून सदर 'प्रकल्प–अहवाल–स्पर्धा' आयोजित करण्यात आलेली आहे. त्या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या अत्यंत उस्फूर्त व भरघोस प्रतिसादाबद्दल विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. तसेच ही योजना कार्यान्वित आणण्यासाठी दि. ३१ जानेवारी १९८८ रोजी विद्यार्थि व अर्थशास्त्र, वाणिज्य, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, इतिहास या विभागातील प्राध्यापकांची एक सभा बोलाविण्यात आलेली होती. या सभेत वाणिज्य विभागातील प्रा. सौ. राहाणे, प्रा. श्री. सुनील दाढे, प्रा. श्री. कांबळे यानी विद्यार्थ्यांना अतिशय मार्गदर्शक व उपयुक्त होईल अशा प्रकारचे मार्गदर्शन केले. त्यांचे नियोजन–चर्चा मंडळाच्या वतीने मनःपूर्वक आभार. तसेच प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी प्रा. एम. ए. कुलकर्णी, प्रा. आर. बी. शहा, प्रा. सुमन्त, प्रा. सौ. सुधा शाळिग्राम, प्रा. सो. ओक, श्रीमती निर्मला मोने, प्रा. गीताराम गायकवाड, प्रा. सौ. साटम, प्रा. कु. प्रधान व वाणिज्य विभागातील प्राध्यापक सौ. राहाणे, प्रा. सुनील दाढे आणि प्रा. कांबळे यांनी विद्यार्थ्यांना जे मार्गदर्शन व सहाय्य केले त्याबद्दल त्यांचे आम्ही उपकृत आहोत.

विद्यार्थ्यांच्या अभ्यासाबरोबरच त्यांना व्यवहारातील अनेक गोष्टींची माहिती मिळावी म्हणून दरवर्षीप्रमाणेच याहीवर्षी 'औद्योगिक भेटी' आयोजित कराव्यात या उद्देशाने दि. २५ व २६ फेब्रुवारी १९८८ या दोन्ही दिवशी 'पुणे स्टॉक एक्चेंज' या ठिकाणी एफ. वाय. बी. कॉ., एस. वाय. बी. ए. या वर्गातील विद्यार्थ्यांना घेऊन स्टॉक एक्चेंजचा व्यवहारांची पहाणी व माहिती करून देण्यात आली पदाधिकारी श्री. दलाल व श्री. गोखले यांनी सहाय्य केल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. या भेटी आयोजित करण्यासाठी प्रा. आर. बी. शहा यांनी विशेष प्रयत्न केले. या भेटीसाठी विद्यार्थ्यांबरोबर प्रा. शहा, प्रा. सौ. साटम, प्रा. कु. प्रधान व प्रा. सो. विनीता कुलकर्णी उपस्थित राहिल्या होत्या. येत्या शैक्षणिक वर्षात 'शेतकी–कॉलेज' या ठिकाणी भेट आयोजित करण्याचे ठरविले आहे त्याच-प्रमाणे व 'अंदाजपत्रावरील चर्चासत्र' प्रत्यक्ष करविषयक धोरण याबाबतचे व्याख्यान आयोजित करणार आहोत. या सर्व योजना कार्यवाहित करण्याच्या बाबतीत माननीय प्राचार्य चिरपुटकर व उपप्राचार्य डॉ. पाथरे यांचे मार्गदर्शन लाभले त्यांना मनःपूर्वक धन्यवाद. कार्यालयीन कर्मचाऱ्यांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

**प्रा. सो. विनीता कुलकर्णी**
(कार्याध्यक्षा)

## पदभ्रमण मंडळ

१९८७–८८ या शैक्षणिक वर्षात पदभ्रमण मंडळाच्या वतीने एकूण चार पदभ्रमणे आयोजित करण्यात आली. या सर्व पदभ्रमणांना विद्यार्थ्यांचा प्रतिसाद समाधानकारक होता. जुलई ८८ मध्ये आपल्या महाविद्यालयातील दहा जणांचा ग्रुप बेसिक माउंटेनिअरिंग कोर्ससाठी 'मनाली' येथे जाणार आहे. या वर्षात आयोजित करण्यात आलेली पदभ्रमणे पुढीलप्रमाणे –

| पदभ्रमण | दिनांक |
|---|---|
| १) डयुक्सनोज–टायगर्सलीप | ७ जुलै १९८७ |
| २) किल्ले राजगड | १५, १६ ऑगस्ट ८७ |

३) तोरणा–रायगड १३ ते १६ सप्टें. ८७

४) लोणावळा–गडदबहिरी (ढाक) २१ ते २२ नाव्हें. ८७

वरील पदभ्रमणामध्ये श्री. श्रीधर विसाळ, मोहन काळे, किरण कवळे, अभय रानडे, अजित टेंबे संदीप गोखले, सतीश भालेराव, अनिल परदेशी, कु, अंबुजा गुळवणी यांचा सहभाग होता.

प्रा. सीताराम रायकर, प्रा. मुनील दाढे तसेच प्रा. तुकाराम निकम यांच्या मार्गदर्शनाचा लाभ पदभ्रमण मंडळास झाला.

**प्रा. महेंद्र गोहेल**
(कार्याध्यक्ष)

## कर्नावट करंडक आंतर-महाविद्यालयीन वादस्पर्धा

प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही 'श्री. फुलचंद बाळचंद कर्नावट करंडक आंतरमहाविद्यालयीन वाद स्पर्धा' दिनांक २१ नोव्हेंबर १९८७ रोजी मोठ्या उत्साहाने संपन्न झाली. पुणे व पुण्याबाहेरील एकूण १२ महाविद्यालयाच्या २४ स्पर्धकांनी या स्पर्धेत भाग घेतला. ही स्पर्धा वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठीही खुली होती. हे स्पर्धेचे नववे वर्ष होते.

'राष्ट्राची अस्मिता धर्मसंरक्षणातच आहे.' हा वादस्पर्धेचा प्रस्ताव होता. स्पर्धेचे उद्‌घाटन मा. ॲड. ग. नी. जोगळेकर यांचे हस्ते झाले. परीक्षक म्हणून ॲड. जयंत म्हाळगी व डॉ. रत्नाकर महाजन यांनी काम पाहिले. पारितोषिक वितरण प्रा. डॉ. वि. भा. देशपांडे यांचे हस्ते झाले.

'कर्नावट मानचिन्ह' जिंकण्याचा मान कला व वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर या संघाने मिळविला. या विजयी संघात कु. एफ. एम. शेख व कु. एस. एम. शेख या स्पर्धक होत्या.

प्रथम पारितोषिक श्री. अनंत गोवंडे (नेस वाडिया) रु. १५०/– रोख.

द्वितीय पारितोषिक कु. स्वाती उंडाळे (आय. एल. एस. विधि महाविद्यालय, पुणे) रु. १००/– रोख.

उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रके कु. स्वाती सहस्त्रबुद्धे (टिळक आयुर्वेद) श्री. शोधन भावे (स. प.) कु. नलिनी पाटील (मॉडर्न).

या स्पर्धेसाठी मा. प्राचार्य प. स. चिरपुटकर, उपप्राचार्य पद्माकर आपटे, उपप्राचार्य डॉ. अशोक पाथरे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा. जगदीश चिंचोरे, प्रा. अ. गो. गोसावी, प्रा. सीताराम रायकर, प्रा. अरूण दांडेकर, प्रा. एम. ए. कुलकर्णी, मा. जयंत जोर्वेकर, प्रा. लिमये, प्रा. दाढे, प्रा. दातार, विद्यार्थी परेश मोकाशी तसेच कला मंडळातील सदस्य प्राध्यापक व अन्य सहकारी प्राध्यापक, सर्व कर्मचारी वर्ग यांनी स्पर्धेच्या यशस्वितेसाठी अतिशय परिश्रम घेतले. या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**प्रा. गीताराम गायकवाड**
(कार्याध्यक्ष)

## ग्रंथालय अहवाल

फेब्रुवारी १९८८ अखेर ग्रंथालयातील ग्रंथांची संख्या ४४,५०० झाली. वरील ग्रंथांबरोबरच एकूण ६० नियतकालिके आणि पुणे व मुंबई येथील जवळजवळ सर्व मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रे ग्रंथालयासाठी घेतली जातात.

विद्यापीठ अनुदान पुस्तक पेढी योजनेतून यंदा १३१ पुस्तक संच विद्यार्थ्यांना विनामूल्य देण्यात आले.

विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सकाळी ८ ते रात्रौ १० वाजेपर्यंत खुली ठेवण्यात आली.

श्री. द. गो. बापट ग्रंथपाल यांची पुणे विद्यापीठ महाविद्यालयीन ग्रंथालय संघाच्या चिटणीसपदी आणि महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन ग्रंथालय महासंघाच्या उपाध्यक्षपदी निवड झाली.

श्री. अ. शं. चंद्रचूड, सहाय्यक ग्रंथपाल यांची पुणे विद्यापीठ महाविद्यालयीन ग्रंथालय संघाच्या खजिनदारपदी निवड झाली.

श्री. अ. शं. चंद्रचूड यांनी इतिहास हा विषय घेऊन एम. ए. ही पदवी संपादन केली.

दरवर्षीप्रमाणेच यंदाही ग्रंथालयाला मान्यवर संस्था आणि व्यक्तींकडून ग्रंथ भेट मिळाले.

**द. गो. बापट**
ग्रंथपाल

# भूगोलशास्त्र विभागवृत्त

**अभ्याससहल वृत्तान्त :**

दि. ११ नोव्हेंबर १९८७ रोजी अकरावी (अ) कला शाखेच्या विद्यार्थ्यांनी कोंढणपूर या ग्रामीण वस्तीचा भौगोलिक दृष्टिकोनातून अभ्यास केला. येथील सामाजिक व आर्थिक अंगांचे सर्वेक्षण करून स्थानिक समस्यांचे सविस्तर विश्लेषण करताना प्रा. विलासराव आल्हाट यांनी मार्गदर्शन केले.

दि. १३ नोव्हेंबर १९८७ रोजी अकरावी (ब) कला शाखेच्या विद्यार्थ्यांनी कोंढावळे या ग्रामीण वस्तीचे भौगोलिक सर्वेक्षण केले. या वस्तीची 'समस्या वस्ती' म्हणून निवड करण्यात आली. येथील पारंपरिक मागासलेपणा अद्याप कायम असून शिक्षण पिण्याचे पाणी, आरोग्यसेवा, नापेर जमिनी या समस्यांचे स्वरूप गंभीर आहे असे प्रामुख्याने जाणवले. प्रा. मानसिंगराव साळुंखे यांनी मार्गदर्शन केले.

दि. ९ नोव्हेंबर १९८७ रोजी अकरावी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांची अभ्यास सहल पुणे परिसरातील सिंहगड पायथ्याजवळ डोणजे येथे प्रा. रामचंद्रराव झगडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केली होती. सिंहगडाचे ऐतिहासिक व पर्यटन महत्त्व लक्षात घेऊन डोणजे वस्तीवर झालेल्या परिणामांची मीमांसा करण्यात आली.

दि. ६ नोव्हेंबर व २२ नोव्हेंबर १९८७ या दिवशी १२ वी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांची अभ्यास सहल प्रा. आल्हाट, प्रा. साळुंखे व प्रा. झगडे यांनी संयोजित केली होती. या अभ्यासात 'Bhor Industry' व Orlab Colour Chemical Company' या उद्योगांचा भौगोलिकस्थान, कच्चा माल, वाहतूक व्यवस्था, बाजारपेठ, शक्तीसाधने व व्यापार या घटकांच्या संदर्भात अभ्यास करण्यात आला. भोर इंडस्ट्रीत विणकाम जाळ्यांची निर्मिती निरीक्षणात आली व Orlab कारखान्यात वैशिष्ट्यपूर्ण रंगनिर्मितीची सविस्तर पाहणी करण्यात आली. उभय उद्योगातील प्रदूषण व श्रमिक समस्यांचे अध्ययन करण्यात आले. येथील रंगदर्जा व अत्याधुनिक शास्त्रीय उपकरणांचा वापर उल्लेखनीय आहे.

दि. ६ जानेवारी ते ११ जानेवारी १९८८ या काळात भूगोलशास्त्र विशेषविषयाच्या (द्वितीय वर्ष कला) विद्यार्थ्यांची अभ्याससहल कोल्हापूर–रत्नागिरी–पुळे या घाटउतार व सागरकिनारी क्षेत्रात नियोजित केली होती. या अभ्याससहलीत पश्चिम घाटाची भूरूपवैशिष्ट्ये, प्रवाहप्रणाली, भूविशेष, वनस्पती, प्राणी व मानवी जीवन यांचे आंतरसंबंध अभ्यासण्यात आले. रत्नागिरी येथील सागरी, गुहा, तरंगमंच, जलभार क्रिया, सागरस्तंभ, सागरकमान, आघातभ्रंश, सागरी कडांचे अध्ययन सागरी लाटांच्या विदारणनिक्षेप संदर्भात करण्यात आले. पुळे येथे वर्म तरंगनिर्मित मंच, पुळणनिर्मिती, संलग्न दंड यांचा सागरी निक्षेपणामुळे निर्माण होणारी भूमिस्वरूपे म्हणून अभ्यास करण्यात आला. पुळ्याचे भौगोलिक स्थान व पर्यटन महत्त्व सविस्तर अभ्यासण्यात आले. याबरोबरच कोकणातील मानवी जीवन, वस्त्या व व्यवसाय यांचा निरीक्षणाद्वारे उहापोह करण्यात आला. कोल्हापूर नगराचे नागरी भूगोलशास्त्राच्या दृष्टीने निरीक्षण, अध्ययन व संकलन करण्यात आले.

**संशोधनवृत्त :**

दि. १४ फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारी १९८८ च्या दरम्यान वाराणसी येथील बनारस हिंदु विद्यापीठात संपन्न झालेल्या 'Indian Institute of Geography, IX Meet' या राष्ट्रीय परिषदेत प्रा. वाल्मीकी अहिरराव व

प्रा. विलास आल्हाट यांनी 'Noise pollution (vehicle) in Pune city' हा शोधनिबंध मॉडर्न महाविद्यालयातर्फे सादर केला.

गढवाल (श्रीनगर) येथे झालेल्या 'International Seminar On Mountain Tourism' या आंतरराष्ट्रीय परिसंवादात प्रा. आल्हाट यांनी 'Mountain Tourism Problems & Prospects in Maharashtra' या विषयावर शोधनिबंध महाविद्यालयातर्फे सादर केला.

दि. २१ फेब्रुवारी १९८८ रोजी जळगाव जिल्हा भूगोल मंडळाने अमळनेर येथील प्रताप महाविद्यालयात 'पर्यावरण विज्ञान' या विषयावरील परिसंवादासाठी प्रा. वालिमकी अहिरराव याना प्रमुख मार्गदर्शक म्हणून निमंत्रित केले होते. तृतीय वर्ष कला व द्वितीय वर्ष विज्ञान या वर्षांच्या वरील विषयासाठी अभ्यासक्रमावर प्रा. अहिरराव यांनी जिल्हा मंडळाच्या प्राध्यापक सदस्यांना मार्गदर्शन केले.

**विभागीय उपक्रम :**

'Earth & Environment' या सदरासाठी विद्यार्थ्यांनी संग्रहीत केलेली भूगोलशास्त्राविषयीची अद्ययावत माहिती संकलित करण्यात आली. प्रा. अहिरराव व प्रा. आल्हाट यांनी मार्गदर्शन केले.

२३ फेब्रुवारी १९८८ रोजी अकरावी–बारावी कला व शास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांचा 'Junior Geographers Meet' या नवीन उपक्रमात मेळावा भरवण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राचार्य चिरपुटकर यानी विषयाची व्यवहाराशी सांगड घालण्याचे आवाहन केले. अध्यक्ष व उपप्राचार्य प्रा. आपटे यांनी भूगोलशास्त्राची व्याप्ती, महत्त्व उपयोजन या संदर्भात उहापोह केला. मार्च १९८७ च्या बोर्डाच्या परीक्षेत भूगोल विषयात द्वितीय क्रमांक व महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या उमेश रावडे या विद्यार्थ्याचा प्राचार्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात 'The Earth & Its Oceans' व 'The Seven Islands' या शैक्षणिक चित्रमालिका दाखवण्यात आल्या. प्रा. आल्हाट, प्रा. अहिरराव, प्रा. झगडे व प्रा. साळुंखे यांनी उपक्रमाचे संयोजन केले

**प्रा. वाल्मीकी अहिरराव**

## वार्षिक स्नेहसंमेलन

महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक २५, २६ व २७ जानेवारी ८८ या तीन दिवसात उत्साहाने साजरे करण्यात आले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी वर्गवार करमणुकीचे कार्यक्रम करावेत बाहेरच्या कलाकारांना पाचारण करु नये, या प्रकारच्या प्राचार्यांनी केलेल्या आवाहनास विद्यार्थी प्रतिनिधीनी व सर्व विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला. विविध वर्गाचे करमणुकीचे कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने व उत्साहाच्या वातावरणात पार पडले.

आनंद मेळाव्यात आमच्या विद्यार्थ्यांनी तीन दिवस भरपूर आनंद लुटला पण तो देखील शिस्तीतच ! यावर्षी आनंद मेळावा सकाळी ९.३० ते १२ व दुपारी ४ ते ७ या वेळात आयोजित केला होता. वरील तीन दिवसातच विद्यार्थ्यासाठी वर्गवार अल्पोपहार आयोजित केला होता.

प्राचार्य, उपप्राचार्य. सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी प्रतिनिधी, व सर्व विद्यार्थी यांनी भरपूर परिश्रम घेऊन स्नेहसंमेलनाची नियोजनबद्ध आखणी केली व परस्पर सहकार्य दिले त्यामुळेच महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहाच्या व शिस्तबद्ध वातावरणात पार पडले. विशेषत: विद्यापीठ प्रतिनिधी श्री. सुनील सांडभोर विद्यार्थिनी क्रीडा प्रतिनिधी कु. मेधा फडके व इतर विद्यार्थी प्रतिनिधींनी पुढाकार घेऊन भरपूर साहाय्य केले. त्याबद्दल त्यांचा विशेष उल्लेख करणे व त्यांचे आभार मानणे आवश्यक आहे.

**प्रा. अ. गो. गोसावी**
**(कार्याध्यक्ष)**

# कनिष्ठ महाविद्यालय–अहवाल

कनिष्ठ महाविद्यालय समिती (८७–८८)

कार्याध्यक्ष – उपप्राचार्य प्रा. पद्माकर आपटे

सदस्य – सौ. शैलजा नवाथे, श्री. भालचंद्र भोमे, सौ. रंजना देव, सौ. वीणा नरगुंद, सौ. गौरी चाफेकर सौ. वसुंधरा कांबळे

कनिष्ठ महाविद्यालयात अकरावी व बारावी वर्गाच्या प्रत्येकी दहा तुकड्या आहेत. त्यात कलाशाखा चार शास्त्रशाखा चार, आणि वाणिज्य शाखा आठ तुकड्या अशी विभागणी आहे.

१९८७ – ८८ या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी त्यावेळचे माननीय प्राचार्य डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांचे अभिभाषण झाले. याप्रसंगी शालांत परीक्षेत (इ. १० वी) बोर्डाच्या गुणवत्ता यादीतील कु. अंजली चिकटे या विद्यार्थीनिचा सत्कार करण्यात आला इ. ११ वी शास्त्र वर्गात कु. चिकटे यासह अनेक गुणी मुलोंनी प्रवेश घेतला आहे.

महाविद्यालयात दरवर्षी घेतल्या जाणाऱ्या एकांकिका, नाटचवाचन, कथाकथन, वादविवाद, वक्तृत्व या विविध स्पर्धामध्ये इ. ११ वी व १२ वी या वर्गातील विद्यार्थ्यांचा सहभाग बहुसंख्येने होता. या स्पर्धाचा तपशील व निकाल कलामंडळाच्या अहवालामध्ये दिलेला आहे.

इ. १२ वी च्या वर्गातील निवडक विद्यार्थ्यांना बोर्डाच्या परीक्षेत उत्तम यश मिळावे ह्या हेतूने ' स्कॉलर बॅच ' हा वैशिष्टचपूर्ण उपक्रम केला जातो. शास्त्र विषयासाठी १५ एप्रिल ते १५ जून या काळात रोज सकाळी १०-३० ते ४-३० या वेळेत जादा तास घेण्यात आले. बोर्डाच्या धर्तीवर चाचण्या व परीक्षा घेण्यात आल्या. शास्त्रशाखेतील विद्यार्थ्यांच्या पालकांनी उत्स्फूर्तपणे काही निधी जमविला व त्या निधीतून बोर्डाच्या परीक्षेत प्राविण्य मिळविणाऱ्या गुणी विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्याची योजना आखली आहे.

१२ वी वाणिज्य वर्गातील विद्यार्थ्यांचे जादा तास घेऊन मार्गदर्शन करण्यात आले. त्यांच्यासाठी सुद्धा चाचण्या घेण्यात आल्या. ११ वी १२ वी मधील मराठी साहित्याची आवड असलेल्या निवडक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्याची अभिरूची वाढण्यासाठी एक प्रकल्प आखला होता. सौ. मेधा सिधये यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या विद्यार्थ्यांनी ' युवांकुर ' नावाचे हस्तलिखित तयार केले. या अंकात ४२ लेख व कविता आहेत. तसेच पुस्तक चर्चा व्याख्याने इ. कार्यक्रम करण्यात आले.

शास्त्र शाखेच्या 'स्कॉलर बॅच' उपक्रमासाठी खालील प्राध्यापकांचे उत्स्फूर्त सहकार्य लाभले.

रसायनशास्त्र : प्रा. रा. ग. लिमये, प्रा. क. म. गोखले, श्री. गोहेल, सौ. गौरी चाफेकर

भौतिकशास्त्र : श्री. घैसास. श्री. वैशंपायन

वनस्पतीशास्त्र : डॉ. अ. के. पांडे, सौ. रंजना देव, सौ. मंगला शिंदे

प्राणीशास्त्र : प्रा. दांडेकर, सौ. सातभाई, सौ. बुटाला, कु. भोसले

गणित व संख्याशास्त्र : श्री. रामचंद्र जोशी, सौ. शैलजा नवाथे, प्रा. चिरपुटकर

वाणिज्य शाखेच्या ' स्कॉलर बॅच ' उपक्रमासाठी खालील शिक्षकांचे सहकार्य लाभले.

वाणिज्य : सौ. वीणा नरगुंद, सौ. रेखा आगाशे, सौ. सुनीता गोसावी

अर्थशास्त्र : श्री. द. ल. लिमये

जर्मन : सौ. खेर

गणित : सौ. शैलजा नवाथे

वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांनी प्रकल्प अहवाल तयार केले. या विद्यार्थ्यांना सौ. नरगुंद, सौ. आगाशे, सौ. गोसावी यांनी मार्गदर्शन केले.

कनिष्ठ महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांना सहकार्य करणाऱ्या सर्व अध्यापकांचे हार्दिक आभार. वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शनाबद्दल माननीय प्राचार्य, उपप्राचार्य यांचे आभार. तसेच कार्यालय कुलसचिव, अधीक्षक कार्यालयीन कर्मचारी व सेवकवर्ग यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो.

**प्रा. पद्माकर आपटे**
उपप्राचार्य

## गणित विभाग

रोझ आणि लोरा मॉरीस ट्रस्ट, शिवाजी नगर, पुणे ५ यांच्या सौजन्याने डिसेंबर ८७ मध्ये तृतीय वर्ष (गणित) च्या विद्यार्थ्यांसाठी कॉम्पुटरवर प्रात्यक्षिकांचा सराव आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांनी ह्या सुविधेचा त्यांच्या दृष्टीने खूप फायदा करून घेतला. ह्या ट्रस्टचे ट्रस्टी, व्यवस्थापक आणि शिक्षक यांचे आम्ही आभारी आहोत.

शुक्रवार दिनांक २६ । २ । ८८ रोजी खालील व्याख्यान आयोजित करण्यात आले.

व्याख्यानाचा विषय : ग्राफ थिअरी

व्याख्याते : डॉ. ति. ति. रघुनाथन् रीडर, गणित विभाग, पुणे विद्यापीठ

व्याख्यान माहितीप्रद तर होतेच पण खूपच मनोरंजक शैलीने सादर केले गेले. विद्यार्थ्यांना या व्याख्यनाचा अतिशय उपयोग होईल. या व्याख्यानचे आयोजन प्रा. कु. निवेदिता बोडस यांनी केले.

रविवार दिनांक २८ । २ । ८८ रोजी कॉम्प्युटेशनल जॉमेट्री या विषयावर प्राध्यापकांसाठी एक दिवसाचे अभ्याससत्र आयोजित करण्यात आले. या अभ्यासासाठी प्राचार्य श्री. रायरीकर (एच. ए. एल इन्स्टीठयूट ऑफ अॅप्लाईड इलेक्ट्रॉनिक्स, ओझर), प्रा. सौ. भोपटकर (आबासाहेब गरवारे कॉलेज, पुणे) प्रा. श्री. निमकर (वाडिया कॉलेज पुणे ) प्रा. श्री. आठवले व प्रा. श्री. चं. गु. कुलकर्णी ( मॉडर्न कॉलेज, पुणे ) यांनी मार्गदर्शकांचे काम केले. पुणे विद्यापीठाच्या परिसरातील सतरा महाविद्यालयांतील एकतीस प्राध्यापकांनी या अभ्याससत्रात उत्साहाने भाग घेतला. डॉ. एन. के. ठाकरे गणित विभाग प्रमुख व डॉ. ए. डी. जोशी, रीडर गणित विभाग, पुणे विद्यापीठ यांनी या सत्रास भेट देऊन समाधान व्यक्त केले.

सत्र पूर्णपणे यशस्वी झाले. यासाठी प्राचार्य रायरीकर, प्रा. मंगला भोपटकर आणि प्रा. चारूदत्त निमकर यांचे त्यांनी घेतलेल्या परिश्रमाबद्दल आम्ही विशेष आभारी आहोत.

या सत्राचे संयोजन प्रा. चं. गु. कुलकर्णी, गणित विभाग प्रमुख यांनी केले. प्रा. श्री. अ. वि. रायरीकर, प्रा. सौ. पद्मा पिंगळे . व प्रा वि. के. आठवले यांनी त्यांना सहकार्य केले.

**प्रा. सी. जी. कुलकर्णी**
(विभाग प्रमुख)

## नाटच शास्त्र विभाग

नाटयशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे हे दुसरे वर्ष. याही वर्षी या अभ्यासक्रमाला उत्तम प्रतिसाद लाभला. पुण्यातील विविध महाविद्यालयातील आणि त्या व्यतिरिक्तचे विद्यार्थी या अभ्यासक्रमात सहभागी होतात. यंदा ही संख्या २० होती. काही विद्यार्थी परगावाहूनही येत असत.

या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी सर्वश्री दीनानाथ टाकळकर, दामू केंकरे, लक्ष्मण देशपांडे, माधव वाटवे, भास्कर चंदावरकर, प्रभाकर भावे, राजा नातू इत्यादी मान्यवर आलेले होते. व्याख्याने आणि प्रात्यक्षिके असे एकूण अभ्यासक्रमाचे स्वरूप होते.

अभ्यासक्रमपूर्ती नंतर या सर्व विद्यार्थ्यांनी तीन एकांकिका सादर केल्या. १) गहान २) पद्मपत्रं... ३) अभ्यासक्रमाच्या कालावधीत या विद्यार्थ्यांना विविध नाटकांचे प्रयोग दाखवण्यात आले. काही चर्चा, कार्यक्रमांना उपस्थित राहण्यासंबंधी योजना केलेली होती.

या अभ्यासक्रमांच्या प्रमाणपत्रांचे वितरण सुप्रसिद्ध अभिनेते डॉ. मोहन आगाशे यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. जब्बार पटेल यांनी मार्गदर्शनपर भाषण केले.

**वि. भा. देशपांडे**

# प्राध्यापक मंडळ अहवाल

बऱ्याच वर्षांपासून मनात असलेला महाविद्यालय कर्मचाऱ्यांच्या स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम दिनांक १८ फेब्रुवारी रोजी अतिशय उत्साहात पार पडला. महाविद्यालयाच्या स्थापनेपासून त्याचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे. आणि त्यानुसार त्याच्या कर्मचाऱ्यांची संख्याही बरीच मोठी होत गेली आहे. ह्या सर्व कर्मचाऱ्यांनी एकत्र यावे एकमेकात मिळून मिसळून एखादा दिवस खेळीमेळीने आनंदात घालवावा, आपल्या अंगच्या कलागुणांचे दर्शन इतरांना घडवून त्यांच्या मनोरंजनाचा आनंदाचा लाभ घ्यावा, ही मनीषा होती. तिला प्रत्यक्ष रुप यंदा लाभू शकले. असा एक दिवस साजरा करण्याचा मनोदय आम्ही प्राचार्यांपुढे मांडला आणि वरिष्ठ कनिष्ठ विभागांचे प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, आणि सेवकवर्ग या सर्वांनीच तो उचलून धरला. दुपारी दोन वाजल्यापासून रात्रीपर्यंत महाविद्यालयाच्या परिसरातच वेगवेगळे कार्यक्रम करण्याचे निश्चित झाले.

संमेलनाच्या मुख्य दिवसापूर्वीच कॅरम, बॅडमिंटन, बुद्धिबळ, टेबलटेनिस, व्हॉलीबॉल इत्यादी खेळांच्या स्पर्धा झाल्या. दिनांक १८ रोजी दुपारी २ वाजल्या पासून ५ वाजेपर्यंत मर्यादित षटकांचा प्राध्यापक विरुद्ध प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांचा क्रिकेटचा सामना खेळला गेला. प्राध्यापकांनी हा सामना एक गडी राखून ५ चेंडूनी जिंकला. क्रीडा-विषयक सर्व स्पर्धांचे आयोजन प्रा. किरण लागू यांनी केले होते.

संध्याकाळी ६ वाजता विविध गुणदर्शनपर कार्यक्रमाला स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या 'जयोस्तुते' या समूह-गीताने दिमाखदार सुरुवात झाली. प्रा. अनिल व्हनकळस आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हे समूहगीत आणि नंतरचे भारुड चांगलेच रंगविले. डॉ. सुषमा जोग, प्रा. गौरी चाफेकर, प्रा. लीना पाटणकर, प्रा. सुनेत्रा मराठे यांनी भजन भावगीत, लावणी, भक्तीगीत अशा विविध प्रकारचे सुगम संगीत सादर केले. प्रा. पद्मा पिंगळे, प्रा. विद्या प्रयाग प्रा. सुधीर वैशंपायन यांनी सुरेल सतारवादनात राग जनसंमोहिनी व चारुकेशी आळवून श्रोत्यांना मुग्ध केले, तर प्रा. नायडू यांच्या कथ्थक नृत्यातील चापल्याने, मुद्राभिनयाने प्रेक्षक थक्क झाले. प्रा. जयंत जोर्वेकरांनी एक नाट्यप्रवेश परिणामकारकरीत्या सादर केला तर प्रा. चंद्रशेखर यांनी प्राध्यापकांच्याच नकला करुन प्रेक्षकांना हसवले. श्री. बी. एस्. पाठक यांनी हार्मोनियमवर काही धून वाजविल्या. प्रा. अमृता सातभाई यांनी एक नाट्य-छटा केली. महाविद्यालयीन कर्मचारी श्री. वारोसे यांनीही आपल्या प्रवचनाने कार्यक्रमाला हातभार लावला, यानंतर कार्यक्रमाच्या शेवटी ज्याची सर्व प्रेक्षक उत्कंठतेने वाट पाहात होते तो विजय तेंडुलकर लिखित धमाल विनोदी एकांकिका 'चित्रगुप्त अहो चित्रगुप्त' सादर करण्यात आली. सर्व प्राध्यापिकांनी सादर केलेल्या या एकांकिकेत प्रा. लीना पाटणकर, प्रा. रेखा आगाशे, प्रा. वंदना नरगुंद प्रा. कांचन राजाध्यक्ष, प्रा. सुरेखा परब, प्रा. मंगला शिंदे प्रा. विद्या प्रयाग, प्रा. संजीवनी राहाणे, प्रा. निवेदिता बोडस, प्रा. सुनीता गोसावी, प्रा. सुनेत्रा मराठे, प्रा. रंजना देव, आणि प्रा. निर्मला मोने यांनी भाग घेतला होता. एकांकिकेचे दिग्दर्शन प्रा. निर्मला मोने यांनी व निवेदन प्रा. जयंत जोर्वेकर, यांनी केले होते एकूण कार्यक्रमाचे निवेदन डॉ. वि. भा. देशपांडे यांनी आणि सर्व व्यवस्थापन प्रा. जगदीश चिंचोरे यांनी केले होते. त्यांना प्रा. जयंत जोर्वेकर, प्रा दत्ता लिमये यांनी सर्वपरींनी मदत केली. कार्यक्रमाच्या मध्यंतरात प्राध्यापक मंडळाच्या स्नेहाचे प्रतीक म्हणून प्राचार्य चिरपुटकर यांना चिटणीस श्री. विजय जोशी यांनी पुष्पगुच्छ दिला. कार्यक्रमाच्या शेवटी आभार मानले. रात्री साडेनऊपर्यंत चाललेल्या, प्रेक्षकांना वेगळयाच सुखद वातावरणात नेणाऱ्या या कार्यक्रमानंतर सुग्रास भोजनाने ह्या स्नेहसंमेलनाची सांगता झाली. या निमित्ताने महाविद्यालयाच्या सर्व लहानथोर कर्मचारी वर्गाने एकत्र येऊन हसून खेळून आनंदात' एक दिवस घालवावा हेच या संमेलनाचे उद्दिष्ट होते ते यावेळी हजार हिश्शांनी सफल झाले. हेच या कार्यक्रमाचे यश होय.

दि. ३ मार्च रोजी स्टाफ क्लबतर्फे 'प्रेमा तुझा रंग कसा ?' हे संपूर्ण कौटुंबिक विनोदी नाटक ( ले. वसंत कानेटकर) भरत नाट्यमंदिरात सादर करण्यात आले. त्यात उपप्राचार्य पद्माकर आपटे, प्रा. निर्मला मोने, प्रा. जयंत जोर्वेकर, प्रा. दत्ता लिमये, प्रा. सुनीता गोसावी, प्रा. निवेदिता बोडस, जगदीश चिंचोरे यांनी भाग घेतला होता. नाटकाचे दिग्दर्शन नटवर्य श्री. दीनानाथ टाकळकर यांनी केले होते. नाटकाचा प्रयोग सुरू झाल्यापासून उत्तरोत्तर

रंगतच गेला. या सहकार्याबद्दलही सहभागी प्राध्यापकांचे अभिनंदन. अशा कार्यक्रमांनी प्राध्यापक आणि इतरही कर्मचारी वर्ग एका आपुलकीच्या भावनेने एकत्र येतात हे अधिक महत्त्वाचे !

स्नेहसंमेलनातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर विविध स्पर्धांचे विजेते पदाचे मानकरी व संघटक खालीलप्रमाणे

१) टेबल टेनिस– प्रा. चंद्रशेखर

२) डबल्स विजेते– प्रा. चंद्रशेखर व प्रा. दशपुत्रे
संघटक– प्रा. दाढे व प्रा. कांबळे

३) कॅरम– श्री. चंद्रचूड

४) डबल्स कॅरम– प्रा. छाब्रा व प्रा. जोर्वेकर
संघटक– चंद्रचूड व प्रा. छाब्रा

५) बॅडमिंटन पुरुष (एकेरी)– विजेते– प्रा. विनय शेरीकर
उपविजयी– प्रा. दत्ता लिमये
पुरुष (दुहेरी)– विजेते– प्रा. शेरीकर
प्रा. दत्ता लिमये
उपविजयी– प्रा. चिंचोरे
श्री. रवि काळे
मिश्र (दुहेरी)– विजयी– प्रा. शेरीकर
प्रा. सौ. सातभाई
उपविजयी– प्रा. दत्ता लिमये
प्रा. सौ. शैलजा नवाथे
महिला (एकेरी)– विजयी– प्रा. सौ. सातभाई
उपविजयी– प्रा. सौ. शैलजा नवाथे

या सर्व स्पर्धांचे नियोजन करण्यास पुढील प्राध्यापकांचे अमूल्य सहकार्य लाभले.

प्रा. मुथा, प्रा. दातार, प्रा. चिंचोरे, प्रा. शेरीकर, प्रा. दाढे, प्रा. झगडे

**प्रा. श्रीमती निर्मला मोने** **प्रा. विलास आल्हाट** **प्रा. विजय जोशी**
(प्राध्यापक–कक्ष कार्यवाह)

## प्राध्यापक–कार्य विशेष (व्यक्तिगत)

१) **डॉ. स. य. परांजपे** : १) 'DOE–ZSI' (कलकत्ता) या प्रकल्पास मुदतवाढ मिळाली असून ते कार्य गतीने चालू आहे.
२) सी. एस. आय. आर. च्यावतीने एक आणि विद्यापीठ अनुदान मंडळाच्या वतीने दुसरा असे दोन प्रकल्प नव्याने या वर्षी मान्य झाले आहेत.

२) **डॉ. अ. लु. पाथरे** : अर्थशास्त्र विषयात प्रकल्प अभ्यासासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाचे २५ हजार रुपयांचे अनुदान.

३) **डॉ. द. दि. पुंडे** : 'वाङ्मयेतिहासाची संकल्पना' या प्रकल्पास विद्यापीठ अनुदान मंडळाचे ५४ हजारांचे अनुदान.

४) **प्रा. प्रमोद पारखी** : १) इंस्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँड वर्क्स अकौंटंटस् ऑफ इंडिया, कलकत्ता या संस्थेच्या उपाध्यक्षपदी १९८७–८८ या वर्षासाठी निवड.

२) कॉसमॉस को. ऑप. बँक, पुणे यांच्या कार्याध्यक्षपदी १९८७–८८ साठी निवड. ही तिसऱ्यांदा निवड होत आहे.

३) जून १९८७ मध्ये झांबिया, टांझानिया या देशांना I. C. W. A. I. च्यावतीने भेटी दिल्या. तिथल्या शैक्षणिक कार्याशाळांमध्ये व्याख्याने दिली.

४) ऑक्टोबर १९८७ मध्ये टोकियो (जपान) येथे वर्ल्ड कॉंग्रेस ऑफ अकौंटस्च्या अधिवेशनात I. C. W. A. I. तर्फे सहभाग.

५) डिसेंबर १९८७ मध्ये दक्षिण आशिया फेडरेशन कोलंबो येथे अकौंटस् (SAFA) या संस्थेच्या कोलंबो येथे भरलेल्या बैठकीत भारताचे प्रतिनिधित्व.

५) **प्रा. मुकुंद महाजन :** पुणे विद्यापीठातील प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग यांच्या संचालकपदी नियुक्ती.

६) **प्रा. विजय जोशी :** ऑगस्ट १९८७ मध्ये दिल्ली येथे झालेल्या प्राध्यापक आंदोलनात सहभाग. त्या काळात पंतप्रधान श्री. राजीव गांधी यांची सदिच्छा भेट घेतली. पुणे विद्यापीठ शिक्षक संघटनेच्या कार्यकारिणीच्या निवडणुकांमधून सहचिटणीस म्हणून निवड.

## व्यवसाय मार्गदर्शन शिबीर

तृतीय वर्ष कला, वाणिज्य आणि शास्त्र या शाखेतील विद्यार्थ्यांसाठी नोकरी–व्यवसाय यासंबंधी मार्गदर्शनपर शिबीर महाविद्यालयात दिनांक २७ मार्च १९८८ ला आयोजित करण्यात आले होते.

प्रा. सीताराम रायकर, प्रा. सौ. शाळिग्राम, प्रा. गोसावी, अल्फा लाव्हल कंपनीच्या पर्सोनेल मॅनेजर सौ. रेखा फडके, ज्ञानप्रबोधिनी व्यवस्थापन संस्थेचे उपप्राचार्य प्रा. सुभाषराव देशपांडे, पुण्याचे सहाय्यक पोलिस आयुक्त श्रीकृष्ण राणे आणि पोलिस उपायुक्त श्री. धीवरे यांची मार्गदर्शनपर व्याख्याने झाली. उपप्राचार्य प्रा. आपटे यांनी समारोपाचे भाषण केले.

या कार्यक्रमासाठी प्राचार्य चिरपुटकर, प्रा. गोसावी यांनी मार्गदर्शन केले. डॉ. स्नेहल तावरे, प्रा. दाढे आणि प्रा. भालेराव यांच्या संयोजनाने हा कार्यक्रम झाला. सकाळी ९ ते ७ पर्यंत चाललेल्या या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

**डॉ. स्नेहल तावरे**
**प्रा. दाढे, प्रा. भालेराव**
संयोजक

## जठार स्मृती–व्याख्यान

कै. प्रभाकर विष्णू जठार यांच्या स्मृति प्रीत्यर्थ या वर्षीचे स्मृति–व्याख्यान स्टेट बँकेमधील विकास अधिकारी श्री. एम्. एस्. अभ्यंकर यांनी दिले. व्याख्यानाचा विषय होता ' बँकांच्या ठेवीतील स्थित्यंतरे.' बँकांच्या ठेव योजनेतील स्थित्यंतराचा आढावा घेऊन बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर या ठेव योजनेमध्ये कसा बदल होत गेला याचा चिकित्सक आढावा त्यांनी आपल्या भाषणात घेतला. भाषणा नंतर झालेली चर्चा ही अधिकच उद्‌बोधक होती.

- जठार स्मृती व्याख्यान समिती

## ' कै. डॉ. भीमराव कुलकर्णी स्मृती चर्चासत्र '

जून, १९७० मध्ये पी. ई. सोसायटीने मॉडर्न महाविद्यालयाची स्थापना करून विश्वविद्यालयीन शिक्षण क्षेत्रामध्ये प्रवेश केला. स्थापनेच्या वर्षा पासून डॉ. भीमराव कुलकर्णी हे मराठी विभागाचे प्रमुख म्हणून नियुक्त झालेले एक विद्यार्थीप्रिय नामावलेले प्राध्यापक तसेच नामवंत साहित्यिक होते. महाविद्यालयाच्या गुणात्मक प्रगतीमध्ये ज्या अनेक प्राध्यापकांचा महत्त्वपूर्ण वाटा होता त्यामध्ये डॉ. भीमरावांचा कार्यभाग सिंहाचा होता. थोड्याच कालावधीत ते महाविद्यालयाचे उप–प्राचार्य झाले. एका तपाहून जास्त काळ ' मॉडर्न ' ची सेवा करून डॉ. भीमराव मुंबईस एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठात मराठीचे विभाग प्रमुख म्हणून गेले. थोड्याशा आजाराने त्यांचे आकस्मिक निधन सर्वांनाच धक्कादायक होते. त्यांच्या स्मृती जतन करण्याचा आम्ही सहकाऱ्यांनी एक संकल्प केलेला आहे. डॉ. भीमरावांची 'मॉडर्न' मधील कारकीर्द ही अनेक व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद इ. ने विशेष अशी वैशिष्टचपूर्ण आहे. तेव्हा त्यांची स्मृती ह्याच माध्यमातून जतन करावी हे योग्य / उचितच ठरेल. डॉ. भीमरावांचे अत्यंत आवडते विषय म्हणजे मराठी भाषा / साहित्य, टीकाशास्त्र व मराठ्यांचा इतिहास. नुकतीच त्यांच्या ' पेशव्यांची बखर ' ह्या ग्रंथाची नवी आवृत्ती प्रकाशित झालेली आहे. हाच संदर्भ घेऊन कै. डॉ. भीमराव कुलकर्णी स्मृती चर्चासत्राचा प्रारंभ ' मराठ्यांच्या इतिहास लेखनाची वाटचाल ' ह्या विषयाने केला. महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये हे चर्चासत्र १६ आणि १७ जानेवारी १९८८ असे दोन दिवस आयोजित केले.

चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी प्राचार्य प. स. चिरपुटकर व डॉ. द. दि. पुंडे ह्यांनी कै. डॉ. भीमरावांच्या महाविद्यालयाशी निगडित अशा अनेक स्मृती सांगून चर्चासत्र आयोजित करण्यामागील कल्पना व पार्श्वभूमी विशद केली. आपल्या उद्घाटनाच्या भाषणामध्ये सुप्रसिद्ध कादंबरीकार श्री. ना. सं. इनामदार ह्यांनी स्वतःच्या कादंबरी लेखनामागील भूमिका सविस्तरपणे मांडली. कादंबरीकार झाला म्हणून त्यांनी केलेल्या संशोधन, अभ्यास, चिंतन इ. परिश्रमाकडे दुर्लक्ष करणे अथवा कमी लेखणे चुकीचे आहे, इतिहास लेखनाची साधने, साहित्य, कागदपत्रे इ. विविध अभ्यासकांना निरनिराळे अन्वयार्थ काढण्याच्या दृष्टीने कसे उपयुक्त ठरू शकतात हे त्यांनी सोदाहरण स्पष्ट केले.

दीड दिवसाचे चर्चासत्र एकूण तीन बैठकींमध्ये विभागलेले होते. डॉ. अ. रा. कुलकर्णी, श्री. स. भा. गर्गे आणि डॉ. कृ. ना. चिटणीस हे अनुक्रमे बैठकांचे अध्यक्ष होते. प्रथम सत्रात ' मराठ्यांच्या इतिहास लेखनाचा आरंभ तसेच त्याची सैद्धांतिक/वैचारिक पार्श्वभूमी ' ह्याच्या अनुरोधाने एकूण तीन निबंध वाचले गेले. मराठी बखर वाङ्मयातील इतिहास लेखनाचा आढावा प्राचार्य सदाशिव आठवले ह्यांनी घेतला.

पाश्चात्य इतिहासकारांच्या मराठ्यांच्या तसेच हिंदुस्थानच्या इतिहास लेखनामुळे भारतीयांच्यात प्रतिक्रिया सुरू होणे स्वाभाविक होते. ह्या प्रतिक्रियांचा मागोवा घेणारा निबंध प्रा. श्री. म. उर्फ राजा दीक्षित यांनी वाचला. त्यांनी ' न्या. म. गो. रानडे यांची इतिहास संकल्पना ' या अनुरोधाने ' मराठ्यांच्या इतिहास लेखनाची प्रेरणा' तात्त्विक व सैद्धांतिक बैठक याचा सविस्तर आढावा घेतला.

चर्चासत्राच्या दुसरे दिवशी प्रथम सत्रात एकूण तीन निबंध वाचले गेले. त्यापैकी पहिला डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी ह्यांनी वाचला. आपल्या निबंधात त्यांनी उर्दू, दख्खनी उर्दू, पर्शियन ह्या भाषेतील ' मराठ्यांच्या इतिहास लेखना ' चा एक विस्तृत असा आढावा घेतला.

ह्या सत्रातील दुसरा निबंध डॉ. मा. रा. कंटक ह्यांचा होता. त्यांनी मराठ्यांच्या इतिहास संशोधन व लेखन कार्यातील इतिहासाचार्य वि. का. राजवाडे ह्यांच्या कार्याचा परिचय आपल्या निबंधाद्वारे करून दिला.

' काव्येतिहाससंग्रह ' कार इतिहास संशोधक कै. काशिनाथ नारायण साने ह्यांच्या कार्याचा आढावा प्रा. रवींद्र लोणकर यांनी घेतला. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर व जनार्दन बाळाजी मोडक ह्यांचे सहकार्याने ' काव्येतिहाससंग्रह ' मासिक सुरू करण्यामागील कै. का. ना. साने ह्यांची प्रेरणा / कल्पना प्रा. लोणकर ह्यांनी सविस्तरपणे विशद केली.

दुपारच्या शेवटच्या सत्रात डॉ. कृ. ना. चिटणीस ह्यांनी मुंबई विद्यापीठाच्या कानडी विभागातर्फे प्रकाशित होत असलेल्या नव्याने उपलब्ध झालेल्या एका कानडी 'छत्रपती शिवचरित्रा' चा परिचय करून दिला. त्याचे अस्सलपण व विश्वसनीयता ह्याची त्यांनी सविस्तर चर्चा केली व ह्या चरित्रातील मुख्य मुद्दे, वेगळेपण यांचे विवेचन केले. याच सत्राचे वेळी पुणे विद्यापीठाचे प्र. कुलगुरु डॉ. शं. ना. नवलगुंदकर यांनी काही काळ चर्चा सत्रामध्ये भाग घेऊन 'राष्ट्रीय एकात्मतेची भावना जागृत करणारा, तरुणांच्या मनात देशप्रेमाची ज्योत प्रज्वलीत ठेवणारा इतिहास लिहिणे व शिकविणे असे आवश्यक आहे' हे मोठ्या प्रभावीपणे मांडले.

प्रत्येक निबंध वाचल्यानंतर त्यावर सविस्तर व प्रदिर्घ चर्चा झाली. त्यामधूनही अनेक नवे मुद्दे, नवे अन्वयार्थ, नवा दृष्टिकोन अनुभवास आला. उपप्राचार्य डॉ. अ. लु. पाथरे ह्यांनी सर्वांचे आभार मानले. पुण्याच्या मे. दास्ताने रामचंद्र आणि कंपनीच्या सौजन्याने सर्व अभ्यासकांना भोजन देण्यात आले.

**प्रा. म. अ. कुलकर्णी**

## आश्विन पुंडलीक आंतर–महाविद्यालयीन काव्यलेखन स्पर्धा

सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. विद्याधर पुंडलीक यांचा मुलगा कै. अश्विन पुंडलीक याच्या स्मरणार्थ मॉडर्न महाविद्यालय ही स्पर्धा आयोजित करीत असते.

१९८७–८८ च्या स्पर्धेकरिता २१ महाविद्यालयातील ४५ स्पर्धकांनी ९० कविता सादर केल्या होत्या. परीक्षक म्हणून प्रा. सीताराम रायकर, डॉ. वि. भा देशपांडे आणि प्रा. विजय जोशी यांनी काम केले होते.

या स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे–

प्रथम पारितोषिक – (१) दिनेश बोरसे, के. टी. एच. एम. महाविद्यालय, नाशिक

उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रके– (१) सुरुचि जोशी, एस. पी. कॉलेज, पुणे
(२) दशकांत पुजारी, एस. पी. कॉलेज, पुणे
(३) हर्षवर्धन पिंजरकर, मॉडर्न महाविद्यालय, पुणे
(४) अरुण सातपुते, न्यू आर्टस सायन्स कॉलेज, पारनेर
(५) योजना शहा, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर

पारितोषिक वितरण प्रा. मधुकर तोडरमल यांच्या हस्ते झाले. नेहमीप्रमाणेच काव्यस्पर्धेला भरघोस प्रतिसाद मिळाला. यशस्वी स्पर्धकांचे हार्दिक अभिनंदन.

**डॉ. स्नेहल तावरे**
(संयोजक)

## Department of Physics

# REPORT OF THE STUDENTS' ACTIVITIES

The following students have won the prizes in various competitions as shown below.

| Sr. No. | Name of the Student | Class | Name of Competition | Prize |
|---|---|---|---|---|
| 1. | Miss. Geeta Kulkarni | XI–Sc. | Indian Physics Association (P. C.) Dr. Raye Lecture Competition | FIRST |
| 2. | Mr. Tarak Railkar | T. Y. B. Sc. Electronics | ,, | THIRD |
| 3. | Miss. Manisha Pawar | ,, | Project Exhibition Rotary Club Pune (West) | SECOND |
| 4. | Mr. Jayant Phatak | XI–Sc. | Indian Physics Association (P. C.) Dr. Bhalla Essay Competition | THIRD |
| 5. | Mr. Suhas Kulhalli | XI–Sc. | Indian Physics Association (P. C.) Dr. Bhalla Essay Competition | THIRD |

Following Students participated in various competitions as shown below.

| Sr. No. | Name of the Student | Class | Name of Competition |
|---|---|---|---|
| 1. | Mr. Matkar Vivek | F. Y. B. C. Sc. | Project Exhibition Rotary Club Pune (West) |
| 2. | Mr. Joshi Rajesh | S. Y. B. Sc. | ,, |
| 3. | Mr. Parkhi Vinayak | ,, | ,, |
| 4. | Mr. S. S. Sudham | F. Y. B. Sc. | ,, |
| 5. | Mr. Chemate Rajesh | ,, | ,, |
| 6. | Mr. Abhijit Natu | XI-Sc. | Indian Physics Association (P. C.) Dr. Raye Lecture Competition |
| 7. | Mr. Harit V. Gopal | XI-Sc. | ,, |
| 8. | Miss. Manisha Pawar | T. Y. B. Sc. | ,, |
| 9. | Miss. Suchitra Muthe | T. Y. B. Sc. | ,, |
| 10. | Mr. S. S. Sudham | F. Y. B. Sc. | ,, |
| 11. | Miss. Anjali Chikate | XI-Sc. | Indian Physics Association (P. C.) Dr. Bhalla Essay Competition |
| 12. | Miss. Kavita Dubey | XI-Sc. | ,, |
| 13. | Mr. Tarak Railkar | T. Y. B. Sc | Indian Physics Association (P. C.) Physics Quiz Competition |
| 14. | Miss. Suchitra Muthe | ,, | ,, |
| 15. | Mr. Rajesh Joshi | S Y. B. Sc. | ,, |
| 16. | Miss. S. V. Sapatneker | ,, | ,, |
| 17. | Mr. S. S. Sudham | F. Y. B. Sc. | ,, |

Prof. Suhas Ghaisas, Prof. (Miss.) Ujjwala Thorat, Prof. S. Chandrashekhar Prof. S. Y. Vaishampayan & Prof. A. V. Deshpande had given valuable guidance to these students.

Prof. **A. V. Deshpande**
Department of Physics

# शिष्यवृत्ती व फी सवलती विषयीची माहिती

## राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती

| | |
|---|---|
| १) श्री. दुबे महारुद्र आत्माराम | प्र. व. शास्त्र |
| २) कु. गीते विनया अरविंद | प्र. व. वाणिज्य |
| ३) श्री. वडगांवकर गणेश पुरुषोत्तम | द्वि. व. शास्त्र |
| ४) कु. पवार सुषमा लक्ष्मण | –„– |
| ५) श्री. सोन्ना संजीव व्यंकटेश | द्वि. व. वाणिज्य |
| ६) कु. औटी अंबू दशरथ | तृ. व. शास्त्र |
| ७) श्री. पुरोहित तुषार विनायक | –„– |

## राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती

| | |
|---|---|
| १) श्री. ढोकले दिगंबर मारुती | ११ वी सायन्स |
| २) कु. देव शिल्पा मनोहर | –„– |
| ३) कु. निम्हण संगीता विठ्ठल | –„– |
| ४) श्री. रासकर अनिल दिनकर | –„– |
| ५) श्री. रसाळ किसन तुकाराम | –„– |
| ६) श्री. चंदने प्राजक्त प्रभाकर | –„– |
| ७) कु. हुसेन शिरीन अबिद | –„– |
| ८) श्री. अपशेटे सोमकांत केशव | १२ वी सायन्स |
| ९) कु. गवसणे माधुरी रेणवसिद्ध | –„– |
| १०) श्री. कुलकर्णी सारंग दिनकर | –„– |
| ११) श्री. पारगी मंदार सुधाकर | –„– |
| १२) कु. मोरे मीरा हरिभाऊ | प्र. व कला. |
| १३) कु. काळे शीला प्रभाकर | प्र. व. वाणिज्य |
| १४) कु. पुरंदरे प्रज्ञा अरविंद | –„– |
| १५) कु. गिते विनया अरविंद | –„– |
| १६) कु. देसवंडीकर मीना विठ्ठल | द्वि. व. कला. |
| १७) कु. पासी अनिता सुखनाथ | द्वि. व. शास्त्र |
| १८) कु. ठाकूर जयश्री नरेन्द्र | तृ. व. कला. |
| १९) कु. गवसणे मीनाक्षी रेवणसिद्ध | तृ. व. शास्त्र |
| २०) कु. फटके राजश्री श्रीधर | तृ. व. वाणिज्य |
| २१) कु. मराठे सुनिता अनंत | एम. कॉम. भाग–२ |
| २२) श्री. राजेन्द्र पुरुषोत्तम गोविंद | –„– |
| २३) श्री. जेधे राजेन्द्र तुकाराम | एम. कॉम. भाग–२ |
| २४) कु. भागवत मंजुषा चन्द्रकांत | –„– |

## राज्य सरकारची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती

| | | |
|---|---|---|
| १) | कु. चिकटे अंजली पद्माकर | ११ वी शास्त्र |
| २) | श्री. खाटोड मनीष बन्सीलाल | –,,– |
| ३) | कु. नातू मनीषा श्याम | ११ वी वाणिज्य |
| ४) | कु. दड्डी अपर्णा शिरीष | १२ वी शास्त्र |
| ५) | कु. गिडे विजया केशव | –,,– |
| ६) | कु. गर्दे माधुरी पुंडलीकजी | –,,– |
| ७) | कु. थोरात अपर्णा विलास | –,,– |
| ८) | कु. पारसनीस धनश्री धुंडीराज | –,,– |
| ९) | कु. सहस्त्रबुद्धे स्वाती वसंत | –,,– |
| १०) | श्री. रावडे उमेश भगवंत | प्र. व. कला |
| ११) | श्री. साका सत्यम सुदाम | प्र. व शास्त्र |
| १२) | कु. रेणूकदास पौर्णिमा रमेश | –,,– |
| १३) | श्री. जाधव रामदास धोंडीबा | द्वि. व. शास्त्र |
| १४) | श्री. जोशी राजेश सुरेश | –,,– |
| १५) | कु. दोदण्णावार सुधा शिवबसाप्पा | –,,– |
| १६) | कु. चौधरी कल्पना रामचंद्र | –,,– |
| १७) | कु. सापटणेकर सुहासिनी विनायक | –,,– |
| १८) | कु. शेवाळकर निलीमा प्रभाकर | –,,– |
| १९) | श्री. तिवारी अनिलकुमार सितलप्रसाद | –,,– |
| २०) | कु. पवार मनीषा भगवंतराव | तृ. व. शास्त्र |

## शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. कुंभार संजय दगडू | द्वि. व. शास्त्र |

## प्रज्ञावान विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. नातू अभिजित अनिल | ११ वी. शास्त्र |
| २) | श्री. फाटक जयंत प्रभाकर | –,,– |
| ३) | श्री. देशपांडे अविनाश सदाशिव | १२ वी शास्त्र |
| ४) | श्री. म्हसवडे पराग वासुदेव | –,,– |
| ५) | कु. रेखा नारायण | –,,– |

## प्रज्ञावान विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य

| | | |
|---|---|---|
| १) | कु. दड्डी अपर्णा शिरीष | १२ वी शास्त्र |

## (शाळेतील) राष्ट्रीय शिष्यवृत्ती कनिष्ठ महाविद्यालय

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. भोकरे राजेश यशवंत | १२ वी शास्त्र |

## ई. बी. सी. शिष्यवृत्ती

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. आल्हाट रोहीदास रघुनाथ | ११ वी शास्त्र |
| २) | श्री. रसाळ किसन तुकाराम | –,,– |

३) श्री. रासकर अनिल दिनकर — ११ वी शास्त्र
४) श्री. कोरडे अभिजित शंकर — –,,–
५) श्री. पवार सुरेश चंद्रकांत — –,,–
६) श्री. जयभाई बापूराव मारुती — –,,–
७) श्री. लोंढे पोपट नथू — ११ वी वाणिज्य

**स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत**

–कोणीही नाही–

**सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत**

१) श्री. खुणे सतीशकुमार — ११ वी वाणिज्य
२) श्री. खुशाबा नरेंद्र एम — १२ वी वाणिज्य
३) श्री. गुजर सुशिलकुमार पी. — प्रथम वर्ष कला
४) कु. खोदादे उज्वल एन. — –,,– विज्ञान
५) श्री. उत्तेकर विजय एस. — –,,– वाणिज्य
६) कु. बिश्वास शीला एम. आर. — द्वितीय वर्ष विज्ञान
७) श्री. रॉय रणजितकुमार — –,,–

**१) ई. बी. सी. फी सवलत**
कनिष्ठ महाविद्याल : ११३ — वरिष्ठ महाविद्यालय : ४४६

**२) प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत**
कनिष्ठ महाविद्यालय ३६ — वरिष्ठ महाविद्यालय : ७४

**३) एस. एस. सी. डी. एड. शिक्षकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत**
कनिष्ठ महाविद्यालय : १ — वरिष्ठ महाविद्यालय : ४

**४) माजी सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत**
कनिष्ठ महाविद्यालय : १९ — वरिष्ठ महाविद्यालय : ४१

**५) मुलींना मिळणारी मोफत शिक्षण योजना**
कनिष्ठ महाविद्यालय : ९००

**६) महाविद्यालयीन शिष्यवृत्ती**
कनिष्ठ महाविद्यालय : ८० — वरिष्ठ महाविद्यालय : १०२

**७) महाविद्यालयीन फी सवलत**
वरिष्ठ महाविद्यालय : २

**८) भारत सरकारची शिष्यवृत्ती (मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी)**
कनिष्ठ महाविद्यालय : ९० — वरिष्ठ महाविद्यालय : १२०

**९) महाराष्ट्र राज्य शासनाची फी सवलत (मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी)**
कनिष्ठ महाविद्यालय : १५ — वरिष्ठ महाविद्यालय : १२५

## नवीन नेमणुका–कनिष्ठ महाविद्यालय

१) कु. नीता मार्तंड कांबळे — इंग्रजी विषय
२) सौ. सुनीता निलेश गोसावी — वाणिज्य विषय
३) सौ. सुवर्णा अनिल उपाध्ये — –,,–

| | |
|---|---|
| ४) सौ. शर्मिष्ठा रमेश खेर | जर्मन विषय |
| ५) श्री. चंद्रकांत त्र्यंबक प्रधान | संस्कृत विषय |
| ६) श्री. मानसिंग सदाशिव साळुंके | भूगोल विषय |
| ७) श्री. रामचंद्र विठ्ठल झगडे | –,,– |
| ८) श्री. अनिल मसू व्हनकळस | रसायशास्त्र विषय |
| ९) श्री. दत्तात्रय कृष्णाजी दातरंगे | भौतिकशास्त्र विषय |
| १०) सौ. अपर्णा चंद्रशेखर मखळे | –,,– |
| ११) श्री. विनय मुरलीधर शेरीकर | शारिरीक शिक्षण विषय |
| १२) श्री. दत्तात्रय गोविंद वापट | ग्रंथालयशास्त्र विषय |
| १३) सौ. कांचन भरत राजाध्यक्ष | गणित विषय |
| १४) श्री. दत्तात्रय लक्ष्मण लिमये | अर्थशास्त्र |
| १५) कु. उज्वला सिताराम थोरात | इलेक्ट्रॉनिक्स विषय |
| १६) श्री. आनंद धनंजय पाध्ये | जीवशास्त्र विषय |
| १७) कु. संध्या राजेश्वर पांडे | अर्थशास्त्र |
| १८) कु. लतीका जगदेव जाधव | मराठी विषय |
| १९) श्री. अरविंद कृष्णराव भोसले | गणित विषय |

## नवीन नेमणुका–वरिष्ठ महाविद्यालय

| | |
|---|---|
| १) श्री. संजय सुधाकर थेंगडी | भौतिकशास्त्र विषय |
| २) श्री. गीताराम परशुराम गायकवाड | राज्यशास्त्र विषय |
| ३) कु. सुजाता विवेक कशाळकर | संख्याशास्त्र |
| ४) श्री. शरद रघुनाथ चौधरी | भौतिकशास्त्र विषय |
| ५) श्री. चंद्रशेखर श्रीकंठय्या | कॉम्प्युटरसायन्स विषय |
| ६) श्री. श्रीराम रुपा वाघ | भौतिकशास्त्र विषय |
| ७) कु. प्रमदा शंकर कुलकर्णी | –,,– |
| ८) सौ. ज्योती प्रदीप कुलकर्णी | भूगोल विषय |
| ९) श्री. आनंद यशवंत लेले | अर्थशास्त्र विषय |
| १०) कु. निवेदिता श्रीपाद बोडस | गणित विषय |
| ११) श्री. राजेंद्र शंकरराव झुंझारराव | वनस्पतीशास्त्र विषय |
| १२) सौ. अश्विनी अनिरुद्ध कुलकर्णी | संख्याशास्त्र विषय |
| १३) श्री. पंडीत सुधीर राजाराम | वाणिज्य विषय |
| १४) श्री. श्रीरंग दत्तात्रय जोगळेकर | –,,– |
| १५) सौ. प्रमिला रमेशचंद्र मल्ल्या | भौतिकशास्त्र विषय |
| १६) कु. शुभदा बाळकृष्ण येडगांवकर | गणित विषय |
| १७) श्री. शेखर डेव्हीड ए. | वाणिज्य विषय |
| १८) कु. निशीता आनंद प्रधान | अर्थशास्त्र विषय |
| १९) सौ. प्रार्थना श्रीधर देशपाडे | राज्यशास्त्र विषय |
| २०) श्री. अरूण वामन देशपांडे | भौतिकशास्त्र विषय |
| २१) सौ. विपुला अजित अभ्यंकर | –,,– |

| | |
|---|---|
| २२) श्री. अशोक विश्वनाथ कांबळे | वाणिज्य विषय |
| २३) श्री. विनायक केशव आठवले | गणित विषय |
| ३४) डॉ. सुधीर कृष्णराव उजळंबकर | रसायनशास्त्र विषय |
| २५) श्री. नरेंद्र मधुकर नायडू | जीवशास्त्र विषय |
| २६) श्री. बाळकृष्ण भागवन येंगे | भौतिकशास्त्र विषय |
| २७) श्री. दशरथ भिकोबा गायकवाड | –„ |
| २८) सौ. माधुरा जयप्रकाश कोरान्ने | मराठी विषय |
| २९) श्री. सुनील शरद पारसनीस | इनस्क्टर इन कॉम्प्युटर सायन्स |
| ३०) श्री. महेश दत्तात्रय करमरकर | –„– |

## अन्यत्र संधी मिळाल्यामुळे महाविद्यालय सोडून गेलेले

| | |
|---|---|
| १) सौ. अमृता श्रीकांत कुलकर्णी | वाणिज्य विषय |
| २) श्री. सुरेंद्र रघुपति कट्टी | –„– |
| ३) कु. गौरी शरद पाटील | वनस्पतीशास्त्र विषय |
| ४) सौ. पद्मजा संजय मेहेंदळे | इंग्रजी विषय |
| ५) सौ. जानकी ज. गुडलावेलेट्टी | अर्थशास्त्र विषय |
| ६) सौ. शीला भरतकुमार कोलटकर | मराठी विषय |
| ७) श्री. अरूण कोंडीभाऊ वाळुंज | भौतिकशास्त्र विषय |
| ८) कु. प्रमदा शंकर कुलकर्णी | –„– |

## डी. एच. ई / बी. एड्.

| | |
|---|---|
| १) कु. सुलोचना हिरालाल चव्हाण | गणित विषय |
| २) श्री. दत्तात्रय कृष्णाजी दातरंगे | पदार्थविज्ञान विषय |
| ३) कु. नीता मार्तंड कांबळे | इंग्रजी विषय |
| ४) श्री. अनिल मसू व्हनकळस | रसायनशास्त्र विषय |
| ५) सौ. सुनीता निलेश गोसावी | वाणिज्य विषय |
| ६) श्री. रामचंद्र विठ्ठल झगडे | भूगोल विषय |

## एम. पी. एड्.

श्री. किरण शंकर लागू

## पीएच्. डी. / एम. फील

सौ. प्रमिला रमेशचंद्र मल्ल्या

सर्व लेखक, जाहिरातदार आणि सहाय्यभूत

झालेल्या सर्वांचे

मनःपूर्वक आभार !






क्रीडा संघटना : पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी
**श्री. एन्. डी. नगरवाला** यांचा
प्राचार्य चिरपुटकर सत्कार करीत असताना




" मॉडर्न श्री "
**श्री. चंद्रकांत रावल**
तृ. वाणिज्य

# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी
# पुणे ५

□ □ □

| | संस्था | स्थापना |
|---|---|---|
| १ | मॉडर्न हायस्कूल, पुणे ५ | १९३४ |
| २ | प्राथमिक विद्या मंदिर, पुणे ५ | १९३६ |
| ३ | सर ससून डेव्हीड होस्टेल ( मुलांचे ) | १९४० |
| ४ | पी. ई. एस्. मुलींची प्रशाला | १९४६ |
| ५ | मॉडर्न हायस्कूल, पुणे ८ | १९६७ |
| ६ | शिशु विद्या मंदिर, पुणे ५ | १९६८ |
| ७ | मुलींचे वसतिगृह | १९६८ |
| ८ | मॉडर्न महाविद्यालय | १९७० |
| ९ | शिशु शाळा आणि प्राथमिक इंग्रजी माध्यमाची शाळा ( एन्. सी. एल्. परिसरात ) | १९७६ |
| १० | शिशु शाळा आणि प्राथमिक इंग्रजी माध्यमाची शाळा, पुणे ५ | १९८२ |
| ११ | शिशु विद्या मंदिर आणि प्राथमिक विद्या मंदिर, निगडी | १९८६ |